साप्ताहिक

# माणूस

१२ मार्च १९८३ किंमत दोन रुपये

चालणारा कॉम्प्युटर आणि बोलणारे आकडे!

## खोल समुद्राच्या तळाशी..



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : एकूणचाळीस ३९

१२ मार्च १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

। पत्ता ।

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

# इथून-तिथून

## गांजा पिकविणारा जिल्हा

केरळच्या इडुक्की जिल्ह्यातील थेक्कडी हे राखीव जंगल आहे. या जिल्ह्यातील उडुंबचोळा, मुन्नार पांडीपाडा, नेलीवायल, कवलंगड, उदयगिरी, मन्हाप्पारा आणि अशोकवणम यांसारखा अनेक ठिकाणी गांजा मोठ्या प्रमाणावर लावला जातो.

गांजाची लागवड करण्यासाठी हे शेतकरी जंगलाच्या आतल्या भागात विस्तीर्ण अशी जागा साफ करून गांजा वाढवितात. सहा महिन्यांनी तो पैसे पुरवणाऱ्यांना पाठविला जातो. छोटे शेतकरी दोन तीन रोपे लावतो, तर बडे शेतकरी कित्येक हेक्टर्स जमिनीचा उपयोग गांजा पिकविण्यासाठी करतात. या शेतकऱ्यांना मुंबईतील व इतर ठिकाणचे 'ड्रग किंग्ज' पैसा पुरवितात.

इडुक्कीत हा गांजा ७० ते १०० रुपये किलो या भावाने खरेदी करून तोच मुंबईत आणि इतरत्र ३०० ते ४०० रुपये किलोने विकला जातो.

अबकारी अधिकाऱ्यांनी या वर्षी अनेक ठिकाणी छापे घालून ठिकठिकाणची गांजा-पिके नष्ट केली; पण त्याचे प्रमाण फारच कमी आहे.

अजूनपर्यंत गांजा-उत्पादकांना चिंता करण्याचे काहीच कारण नव्हते. कारण त्यांना केवळ ५००० रु. दंड होऊ शकत होता; परंतु त्यांना दंड आणि शिवाय दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने गांजा उत्पादक आता चिंतेत पडले आहेत.

## याची नोंद घ्या

१९७७ पासून गेल्या तीन वर्षांत विवाहित स्त्रिया जळून मरण्याच्या २८७९ आणि नवविवाहित वधूने आत्महत्या करण्याच्या ६१ घटना निरनिराळ्या राज्यांतून घडल्या तर ११५७२ स्त्रियांवर बलात्कार करण्याच्या घटना घडल्याची माहिती लोकसभेत नुकतीच दिली गेली, त्याची आपण नोंद घेतली पाहिजे.

१९७९ साली पहिल्या दहा महिन्यांत स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण २८१८४ होते तर १९८० साली ह्याच काळात हे प्रमाण ३०१७६ इतके झाले.

## बुंदेलखंडाची 'फूलन'

उत्तरप्रदेश-मध्यप्रदेश येथे थैमान घालणाऱ्या फूलनने शरणागती पत्करल्यानंतर मध्यप्रदेश-उत्तरप्रदेश दरम्यान असलेल्या बुंदेलखंड भागात आणखी एक स्त्री-डाकू उदयाला आली आहे.

छत्तरपूर जिल्ह्यातील पुत्री गावाची सुरमनबाई (वय २५) हिने स्वतःला 'बुंदेलखंडची फूलन' म्हणून जाहीर करून टाकले!

१९ व २० फेब्रुवारीच्या रात्री तिने पाच साथीदारांसमवेत दिवाणजीका पुरवा येथल्या जलसिंचन कालव्यांच्या तीन छावण्या लुटल्या आणि आपल्या दरोडेखोरीच्या अध्यायाला सुरुवात केली.

## रासायनिक युद्ध

व्हिएटनाममधल्या आक्रमक युद्धात अमेरिकेने रासायनिक अस्त्रांचा सर्रास वापर केला होता. नारिंगी डिफॉलिअेंटचा २ कोटी २० लाख लिटरचा फवारा तिथे करण्यात आला. त्यामुळे हजारो शांतताप्रेमी नागरिक मृत्युमुखी पडले आणि विशाल भूप्रदेशाचे वाळवंट बनले! त्यांच्याच १६ हजार जवानांना या अस्त्रांची हानी पोचली.

या रासायनिक अस्त्रांच्या उत्पादनात बड्या कार्पोरेशन्स आणि छोट्या खाजगी कंपन्यांनाही गुंतवून अमेरिकेने या रानटी अस्त्रांच्या विकासाचा कार्यक्रम जोरदारपणे हाती घेतला आहे.

अमेरिकेच्या भूदलासाठी ४९ लाख डॉलर्सची तरतूद करणारे विधेयक अमेरिकन काँग्रेसने मंजूर केले आहे. 'रणांगणावर परिणामकारक वापरासाठी, पुरेशा प्रमाणात लशी व विषनाशक द्रव्यांचे संशोधन करण्यासाठी, खाजगी औषधीकंपन्यावर ही रक्कम खर्च केली जाणार आहे' असे 'न्यूजविक' या अमेरिकन साप्ताहिकाने म्हटले आहे.

यामुळे रासायनिक अस्त्रांचा वापर करणाऱ्या अमेरिकन सैनिकांना सुरक्षिततेची हमी मिळेल असे पॅंटागॉनच्या तज्ज्ञांचे मत आहे.

अमेरिकेत रासायनिक अस्त्रांचे प्रचंड प्रमाणावर साठे असूनसुद्धा या अस्त्रांच्या उत्पादन व संचयासाठी ३ अब्ज डॉलर्स खर्च करण्यात येणार आहेत.

### स्वयंपाक–इंदिरा गांधी

मी वयाच्या ११ व्या वर्षी स्वयंपाक करायला शिकले. माझे आजोबा मोतीलाल यांना मी स्वयंपाक करून खायला घालीत असे. मोतीलाल नेहरू हे खाण्याच्या बाबतीत चोखंदळ होते.

इंग्लंडमधील विद्यार्थीदशेत आणि लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काही काळात मी थोडा–फार स्वयंपाक करीत असे.

आता मात्र–अंड्याचे थोडे प्रकार, सॅलड किंवा तत्सम छोटे आणि सोपे पदार्थ यापुढे माझ्या पाककौशल्याची झेप नाही.

– ही माहिती पंतप्रधान इंदिरा गांधींनी सोफी महाविद्यालयात विज्ञानशाखेत पहिल्या वर्षात शिकणाऱ्या नेहरू तक हिला पाठविलेल्या पत्रात लिहिली आहे.

### देवाचं नाटक

केरळ पीपल्स आर्टस् क्लबच्या 'देवाचा पक्षबदल' या मल्याळी नाटकावरून तिथल्या साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात बरेच वादळ उठले आहे. लेख, जाहीर सभा, संपादकांना पत्रे ह्यातून ह्या वादग्रस्त विषयावर चर्चा चालू असताना हिंदू–मुस्लिम यांच्यात तणाव निर्माण झाल्याचीही बातमी आहे.

वारंवार देवळांतून मूर्ती जाण्याच्या विषयावर हे नाटक लिहिले आहे. माजी भाकप आमदार रामचंद्रन यांनी ते लिहिले आहे.

सावरीमलाच्या अय्याप्पा ह्या देवाच्या संदर्भात नाटकात शिव आणि विष्णू ह्या समलिंगी संभोगातून त्याचा जन्म झाल्याचा उल्लेख आहे. नाटकात मुस्लिम पात्र येऊन या घटनेचा उपहास करताना ते 'या अल्ला' म्हणते त्यावरून हा वाद झाला.

या नाटकाचे १२० यशस्वी प्रयोग झाले; परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषद यांनी निषेध करून प्रयोगात अडथळे आणले. दरम्यान मलपुरम व एर्नाकुलमच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नाटकावर बंदी घातली. सध्या हे प्रकरण न्यायालयात आहे.

□

# व्यक्ती, व्यवसाय, समाज

श्री. ग. मा.

पुण्याच्या एका प्रकाशनसंस्थेनें जोशी-अभ्यंकर-खून खटल्यातील एक गुन्हेगार मुनव्वर शहा याचे आत्मकथन पुस्तकरूपाने नुकतेच प्रसिद्ध केले आहे. या कथनाचा काही भाग 'केसरी' व 'सकाळ' या पुण्याच्या दोन प्रमुख वृत्तपत्रांनी आपल्या रविवारच्या अंकात देऊन, या विषयाला अधिक व्यापक अशी प्रसिद्धीही दिली आहे. ही प्रसिद्धी व मुळातले पुस्तक-प्रकाशन हे योग्य की अयोग्य, यावर सध्या चर्चा सुरू आहे व मुंबईच्या म. टाइम्सने हा सर्वच प्रकार आक्षेपार्ह आहे, अशी टीकाही केली आहे. समाज-हिताचा विचार डोळ्यासमोर ठेवून आपापला व्यवसाय करणाऱ्यांसमोर-सुद्धा अशा प्रसंगी नेमके कुठले धोरण बाळगायचे, कुठल्या मर्यादेपर्यंत व्यवसायस्वातंत्र्याचा, लेखन-प्रकाशन स्वातंत्र्याचा अर्थ ताणायचा, असे प्रश्न उभे राहतात व या प्रश्नांची यथायोग्य उत्तरे शोधणे हे स्वातंत्र्यसंरक्षणासाठी-देखील आवश्यक ठरते.

सध्या मंजुश्री सारडा-प्रकरण कोर्टात चालू आहे. या प्रकरणी आरोपी शरद सारडा याची बाजू घेऊन श्री. ब. ना. भिडे यांनी कोर्टात उभे राहावे की राहू नये? श्री. भिडे यांनी शरद सारडा याचे वकीलपत्र घेऊ नये म्हणून त्यांच्यावर लोकमताचे दडपण आणण्याचे प्रयत्न झाले. भिडे हे केवळ वकील नाहीत. ते रा. स्व. संघाचे प्रांतप्रमुखही आहेत. संघप्रमुख या नात्याने समाजासमोर चारित्र्याचे, नीतिमत्तेचे काही आदर्श उभे करण्याची जबाबदारी ते टाळू शकत नाहीत. पण वकील म्हणून त्यांचा व्यावसायिक निर्णयस्वातंत्र्याचा हक्कही समाजानें मान्य करायला हवा. अशा स्थितीत भिडे यांनी नेमकी कोणती भूमिका घ्यायला हवी ?

मुनव्वर शहाचे आत्मकथन प्रसिद्ध करणारी प्रकाशनसंस्था, केसरी-सकाळ ही वृत्तपत्रे व श्री. ब. ना. भिडे, वकील, यांच्यासमोरील प्रश्न एकच आहे. आणि या प्रश्नाचे सरधोपट हो किंवा नाही असे ठामठोक उत्तरही नाही. प्रश्न गुंतागुंतीचा आहे, व्यापक आणि कमी-जास्त प्रमाणात सर्वांनाच स्पर्श करणारा आहे. उद्या 'माणूस'कडे मुनव्वर शहासारखे एखादे हस्तलिखित प्रकाशनार्थ आले तर 'माणूस' ने ते प्रसिद्ध करावे की करू नये ?

'माणूस' निखळ स्वातंत्र्यवादी आहे. 'जो जे वांछील तो ते लिहो' हीं लेखन स्वातंत्र्यवादाची भूमिका आजवर तरी 'माणूस'ने उचलून धरली आहे. मग तो प्रसंग मनगटाच्या बळावर तेंडुलकरांचे नाटक बंद पाडण्याचा असो की आणीबाणीत इंदिरा-सरकारला नको असलेले साहित्य आवर्जून प्रसिद्ध करण्याचा असो. मुनव्वर शहाचे आत्म-कथन प्रामाणिक व गुन्हा-प्रवृत्तीवर काही वेगळा प्रकाश टाकणारे असेल तर असे साहित्य समाजासमोर यावे की येऊ नये ? अशा साहित्य-प्रकाशनामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला उत्तेजन मिळते, गुन्हेगारांना प्रतिष्ठा लाभते असा

आक्षेप आहे. हा आक्षेप कितपत बरोबर आहे ? श्री. ब. ना. भिडे यांच्यावरही हाच आक्षेप घेण्यात आला आहे. त्यांच्या वकिली कौशल्यामुळे अट्टल गुन्हेगार सहीसलामत सुटतात व निर्दोष समजले जातात. शिकवण एक व आचरण एक असाही एक आक्षेप निर्माण होतो. समाज सुसंस्कृत व्हावा अशी शिकवण वृत्तपत्रातून दिली जाते. मग त्यात येणारा मजकूर माणसातल्या गुन्हेगारप्रवृत्तींना उत्तेजन देणारा असून कसे चालेल ? श्री. ब. ना. भिडे चारित्र्यसंवर्धनासाठी संघकार्य उभे करणार आणि चारित्र्य-भ्रष्टांची वकीलपत्रेही घेणार ! हा सगळाच अंतर्विरोध नाही का ?

### मूल्यांचा क्रम

निश्चित आहे. तो कमी करण्यासाठी सामाजिक मूल्ये केवळ अमूर्त स्थितीत, तात्त्विक पातळीवर न ठेवता त्यांचा काही व्यवहार्य क्रम आखणे म्हणूनच आवश्यक आहे. स्वातंत्र्य हे अंतिम मूल्य आहे. पण व्यक्ती, व्यवसाय, समाज अशी काही चढती श्रेणी नक्की केल्याशिवाय हे मूल्य व्यावहारिक पातळीवर आणता येणेही कठिण आहे. सर्वतंत्रस्वतंत्र समाज अद्याप भूतलावर अस्तित्वात नाही. अगदी हिमालयातला एखादा योगीही पूर्णपणे, सर्वार्थाने कधीच मुक्त नसतो. हिमालयातली ही स्थिती तर दैनंदिन सामाजिक व्यवहारात पूर्ण बंधनमुक्ती कशी शक्य आहे ? संघप्रमुख भिडे महत्त्वाचे असतील तर वकील भिडे यांच्या स्वातंत्र्यावर काही बंधने ओघाने येतात. संघहिताच्या व्यापक उद्दिष्टासाठी व्यवसायहिताचा संकोच त्यांनी आपणहूनच पत्करायला हवा. व्यक्तीपेक्षा व्यवसाय मोठा, व्यवसाया-पेक्षा समाज मोठा आणि या क्रमाने अंतिमत: 'आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् !' राम हा केवळ एक साधा प्रजाजन असता तर सीतेचा त्याग करण्याची पाळी त्याच्यावर आलीच नसती. पण सीझरच नाही, सीझरची पत्नीदेखील संशयातीत हवी असा सर्वच प्राचीन राजसत्तावादांचा दंडक होता. रामाने हा दंडक पाळला. सीतेवरचा अन्याय अपरिहार्य ठरला. व्यापक राजधर्म आणि मर्यादित व्यक्तिधर्म या दोन धर्मांचा, मूल्यांचा संघर्ष रामासमोर उभा ठाकलेला आहे. त्याने राजधर्मा-पुढे व्यक्तिधर्म गौण मानला. कालिदासाने हा संघर्ष रघुवंशात दाखवलेला आहे. भवभूतीने तर यावर नाटकच लिहिले ! राजा असून राम सर्वांत परतंत्र-पराधीन असा ठरला–किंबहुना राजा असल्यामुळेच ही पाळी त्याच्यावर आली. पण एक मूल्य येथे निश्चित झाले, आदर्श उभा राहिला. सार्वजनिक हितापेक्षा व्यक्तिहित गौण ! मग यासाठी केवढीही किंमत मोजावी लागो ! अगदी 'हृदयं द्वितीयं' असणाऱ्या प्रियपत्नीचा त्याग देखील ! रामायणातला हा अगदी टोकाचा प्रसंग. पण असे प्रसंग लहान-मोठ्या पातळ्यांवर सर्वांसमोर, सर्वच काळात येत असतात. यातून मार्ग निघायचा तर समाजासमोर मूल्यांचा क्रम निश्चित असावा लागतो. या क्रमानुसार आचरण करणारे काही आदर्शही डोळ्यांसमोर हवे असतात. या दृष्टीने श्री. ब. ना. भिडे यांचा मूल्यक्रम, कोणाचीही वकीलपत्रे घेण्याचा निर्णय चुकीचा, तेच पुरस्कृत करीत असलेल्या आदर्शांची हानी करणारा ठरतो.

प्रकाशन क्षेत्रालाही हाच विचार लागू व्हायला हवा. मुनव्वर शहाचे आत्मकथन प्रामाणिक व नवे वाटले तर प्रयोगादाखल एखाद्या प्रकाशन-संस्थेने ते प्रसिद्ध करण्यात गैर काहीच नाही. "सुखी व समाधानी मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेला मुनव्वर शहा, चांगल्या शिक्षणाचे व धर्माचरणाचे संस्कार असूनही, खुनासारख्या निर्घृण गुन्ह्याकरिता, फाशीच्या पायरीपर्यंत कसा पोचला ?" हे दाखवण्याचा प्रकाशकाचा हेतू असावा, असे पुस्तकाच्या मागील बाजूस दिलेल्या मजकुरावरून वाटते. हा हेतू कितपत साध्य होतो न होतो हे पाहायचे. न झाला तरी असे व्यावसायिक धाडस करण्यास कुठल्याही लोकशाहीवादी देशाने मोकळीक ठेवणे आवश्यकच आहे. परंतु ज्यांना अशा धाडसाची फारशी गरज नाही, ज्यांचे नाव व प्रतिष्ठा मोठी आहे, ज्यांचा खप लाखांवर आहे अशा प्रमुख व मान्यवर वृत्तपत्रांनीही अशी अर्धीकच्ची आत्मकथा, घाईघाईने प्रसिद्ध करून तिला व्यापक पातळीवर नेण्याची आवश्यकता होती का ? एखाद्या सनसनाटी, पिवळ्या प्रवृत्तीच्या वृत्तपत्राला हा प्रश्न कोणी विचारू नये. कारण लोकशिक्षणाचे, जागृतीचे, प्रबोधनाचे असे कुठलेच कंकण अशा वृत्तपत्राने बांधलेले नसते. लोकही अशी वृत्तपत्रे करमणूक म्हणून प्रवासात घेतात आणि अशांचा खप मोठा असला तरी लोकमतावर त्यांचा प्रभाव नसतो. अनेक पाहण्यातून हे आजवर स्पष्ट झालेले आहे. अशा वृत्तपत्रांना जे अनिर्बंध स्वातंत्र्य आहे ते लोकशिक्षण करू पाहणाऱ्या वृत्तपत्रांना घेता येते का ? ¤

जो विचार श्री. ब. ना. भिडे यांच्यासारख्या सामाजिक–सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्तीला लागू आहे तोच लोकशिक्षण करू पाहणाऱ्या वृत्तपत्रांनीही ध्यानात बाळगणे आवश्यक आहे ! □

# लाक्षणिक संपाने काय होणार ?

भारत सरकारने ज्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले त्या अनेक धंद्यांतील व्यवस्थापक व कर्मचारी यांचे नाते दिवसेंदिवस दुरावत चालले आहे. या धंद्यात सरकारला कमालीचा फायदा मिळत असूनदेखील सरकारने कर्मचाऱ्यांच्या सेवासवलतीत व पगारात कपात करण्यास सुरुवात केल्याने दोघांच्यातील तेढ वाढत असून कर्मचारीवर्गात असंतोष धुमसत आहे.

अशाच धंद्यांपैकी आयुर्विमा व सर्वसाधारण विमा हे दोन धंदे ! या धंद्यांपासून सरकारला मिळणारा फायदा दिवसेंदिवस वाढत असतानाच दुसरीकडे सरकारने कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात करण्यास सुरुवात केल्याने दोन्हीही धंद्यातील कर्मचारी समदुःखी आहेत. आयुर्विमा महामंडळाने आपले नवे धोरण पूर्वीच जाहीर करून त्याची अंमलबजावणी होत असतानाच आता सर्वसाधारण विमामहामंडळातील कर्मचारी संघर्षासाठी सिद्ध झाला आहे.

सर्वसाधारण विमामहामंडळाचे म्हणजेच 'जनरल इन्शुअरन्स कार्पोरेशनचे' राष्ट्रीयीकरण १ जानेवारी १९७३ साली झाले. त्यापूर्वी भारतामध्ये सुमारे १०७ देशी–विदेशी कंपन्या हा धंदा करत होत्या. १३ मे १९७१ रोजी एक वटहुकूम काढून सरकारने या १०७ कंपन्यांची व्यवस्था आपणाकडे घेतली आणि नंतर १ जाने. ७३ रोजी हा संपूर्ण धंदाच आपल्या हातात घेऊन या उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण केले.

आज १ जाने. १९८३ रोजी या राष्ट्रीयीकरणाला १० वर्षे पूर्ण झाली आहेत. या दहा वर्षांचा जर आढावा घेतला तर राष्ट्रीयीकरणाचा सरकारचा हेतू सफल झालेला दिसतो. आज देशाच्या कानाकोपऱ्यात जनरल इन्शुअरन्स कार्पोरेशनच्या शाखा वाढत आहेत· कार्पोरेशनच्या शाखा म्हणजेच या महामंडळाच्या नियंत्रणाखाली काम करत असलेल्या न्यू इंडिया इन्शुरन्स, ओरिएंटल जनरल अँड फायर इन्शुअरन्स, युनायटेड इंडिया आणि नॅशनल इन्शुअरन्स या चार कंपन्या ! सर्वसाधारण विमामहामंडळाने या चार कंपन्यांद्वारा आपला विस्तार देशाच्या अनेक भागात केला आहे.

या धंद्यापासून महामंडळाला जो नफा झाला त्याची ताजी आकडेवारी पाहिली तरी राष्ट्रीयीकरणाचा हेतू सफल झाल्याचे दिसते. महामंडळाला १९७३ साली ३८ कोटी रुपये नफा झाला होता. (टॅक्सपूर्वीचा नफा.) प्रत्येक वर्षी हा नफा वाढतच गेला. आज १९८१ साली हा नफा १२३ कोटीच्या घरात गेलेला आहे. १९८२ साली नफ्याचा हा आकडा १९० कोटीच्या घरात जाईल असा अंदाज वर्तवला जात आहे.

नफ्याची ही आकडेवारी आणि कंपनीच्या प्रगतीचा क्रमाने वर जाणारा तक्ता पाहिला तर वरवर पहाता राष्ट्रीयीकरणाचा उद्देश सफल झालेला दिसतो; पण याबरोबरच याची दुसरी बाजू पाहिली की, अनेक समस्या उभ्या राहतात.

राष्ट्रीयीकरणाने सर्व व्यवस्थापन सरकारच्या हाती गेल्याने कर्मचाऱ्यांचे लहान–मोठे सर्व प्रश्न सोडविताना महामंडळाला एकाच प्रकारचा निर्णय घ्यावा लागला. अशा काही निर्णयांमुळे इतर कर्मचाऱ्यांचे जे नुकसान झाले ते कधीही न भरून येणारे आहे !

राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी व सेवासवलतींसाठी महामंडळाने २७ मे १९७४ रोजी एक 'स्कीम' तयार केली. डिसेंबर १९७६ पर्यंत ही स्कीम चालू राहील असे सांगून महामंडळाने याद्वारे सर्वांचे पगार व सेवासवलती निश्चित केल्या.

या नवीन 'स्कीम'ने आपला थोडाबहुत फायदा झाला असा आनंदाचा सुस्कारा कर्मचाऱ्यांनी टाकला न टाकला इतक्यातच महामंडळाने आपणच तयार केलेल्या स्कीममध्ये कपात करण्यास सुरुवात केली. आणीबाणीचा मोका साधून मंडळाने अनेक सवलती रद्द केल्या तर अनेकांत कपात जाहीर केली !

### न्यायालयात आव्हान

या धंद्यातील कर्मचाऱ्यांस १९७५ पर्यंत एकूण पगाराच्या ८ टक्के इतका 'प्रॉव्हिडंड फंड' द्यावा लागे. इतकीच रक्कम मंडळालाही त्या कर्मचाऱ्याच्या 'प्रॉव्हिडंड फंड' खात्यावर जमा करावी लागे. पण सरकारने १९७५ साली यात कपात करून मूळ पगाराच्या फक्त १० टक्के इतकीच रक्कम प्रॉ. फंडासाठी जमा करण्याचा निर्णय घेतला.

या विमा कंपन्यांतील कर्मचाऱ्यांचे मूळ पगार खूप कमी आहेत. या मूळ पगाराच्या १० टक्के इतकी रक्कम प्रॉव्हिडंड फंडासाठी जाणे म्हणजेच प्रॉ. फंड काहीच नसल्यासारखा ! आज नव्याने भरती झालेला एखादा कर्मचारी आणखी ३० वर्षांनंतर जर सेवानिवृत्त झाला तर त्याच्या हाती प्रॉव्हिडंड फंडाची रक्कम २० हजारदेखील पडणार नाही ! म्हणूनच कर्मचाऱ्यांत संतापाची लाट उसळली.

या एकाच कपातीवर महामंडळ थांबले नाही तर पुढल्याच वर्षात म्हणजे १९७६ मध्ये मंडळाने कर्मचाऱ्यांची आजारीपणाची रजा निम्मी केली. पूर्वी या कर्मचाऱ्यांना वार्षिक ३० दिवस आजारीपणाची रजा मिळत असे. नवीन धोरणानुसार ती १५ दिवस झाली ! याच्याच जोडीला कर्मचाऱ्यांचा बोनस कमी झाला. पूर्वी सर्वांना सरसकट २० टक्केइतका बोनस मिळायाचा. महामंडळाने यात फेरबदल करून ज्यांचा पगार १६०० रुपयांपेक्षा जास्त आहे त्यांना बोनस नाकारला, तर इतरांना १३५० रु. इतकीच मर्यादा ठेवली; पण हे करताना बोनस हा शब्दप्रयोग काढून 'सानुग्रह अनुदान' हा शब्दप्रयोग महामंडळाने त्यात जाणीवपूर्वक वापरला !

पहिल्या स्कीमची मुदत संपूनही नवीन करार तयार करण्यात आला नाही. आज या गोष्टीला ७ वर्षे होत आहेत. १९७४ नंतर या धंद्यात नवीन करार अथवा स्कीम होऊ शकली नाही. कर्मचारी पूर्वीचेच फायदे घेत आहेत.


या सर्व गोष्टींनी संघटित झालेला २५ हजार कामगार संघर्षासाठी सिद्ध झाला आहे हे माहिती असूनदेखील महामंडळाने ३० सप्टेंबर १९८० रोजी नवीन करण्यात

# ममता

आपल्या कुटुंबीयांच्या संरक्षणासाठी
आयुर्विम्याच्या छत्राचा लाभ अुठविण्याची
तुम्हाला प्रेरणा देणारी शक्ती.

# नैपुण्य

तुमच्या विशिष्ट गरजा सर्वोत्कृष्टपणे
भागविण्यासाठी आयुर्विम्याची समुचित
योजना बनविण्यासाठी आवश्यक गुण



**मुलांसाठी शिक्षण व जीवनात पदार्पण योजना • पत्नीसाठी तहहयात अुत्पन्नाची योजना • सुरक्षित सन्मानित वृद्धापकाळासाठी तरतुदीची योजना • वारसाकर व अितर कर यांतून सूट मिळविण्यासाठी योजना**

तुमच्या कुटुंबाच्या गरजांनुसार योग्य अशी योजना बनविण्यासाठी मदत करावयास आमचा आयुर्विमा प्रतिनिधी सदैव तत्पर असतो.
आजच पाअुल टाका आणि तुमच्या वाढत्या गरजांसाठी सोयिस्कर आयुर्विमा खरेदी करा.

**भारतीय आयुर्विमा महामंडळ**

**आयुर्विम्याला पर्याय नाही.**

आलेली स्कीम कामगारांसमोर ठेवली. या नवीन स्कीमद्वारे महागाईभत्त्यात कपात होते, कोणत्याही कर्मचाऱ्याचा पगार कितीही महागाई झाली तरी २७५० रुपयांच्या वरती जाणार नाही हे पाहून येथे काम करीत असलेल्या युनियननी या नव्या स्कीमला ऑक्टोबर ८० मध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले !

ऑक्टोबर १९८० पासून सर्वसाधारण विमा महामंडळात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न न्यायालयात गुंतून राहिले आहेत. नवीन भरती करण्याचे धोरण सध्या बंद आहे. अनेक कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी थांबल्या आहेत. नव्याने भरती झालेल्या कर्मचाऱ्यास पदवी–उत्तीर्णतेच्या दोन श्रेणी मिळाल्या नाहीत. असे अनेक प्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहेत.

याविरुद्ध येथे काम करत असणाऱ्या तीन युनियन्स सतत लढत आहेतच; पण महामंडळाने १९८२ सालचा महागाईभत्ता कर्मचाऱ्यांस दिला नाही म्हणून त्यांनी संयुक्तपणे २३ फेब्रुवारी रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप केला. हा संप पूर्णपणे यशस्वी झाला खरा; पण त्याने महामंडळावर काही परिणाम होईल असे म्हणणे शहाणपणाचे ठरणार नाही !

या एक दिवसाच्या संपाने कर्मचाऱ्यांचा सुमारे १० लाख रुपये इतका पगार बुडाला; पण महामंडळाचे काय नुकसान झाले ? १९८२ सालचा महागाईभत्ता द्यावा हा सर्वोच्च न्यायालयाचा महामंडळाला हुकूम होता. ते महामंडळाला आज ना उद्या देणे भागच होते; पण तेवढ्यासाठी एक दिवसाचा संप हे उत्तर होऊ शकत नाही. २॥ लाख गिरणीकामगार आपल्या न्याय्य मागण्यांसाठी गेले वर्षभर लढत असताना जे सरकार ठप्प आहे त्यावर एक दिवसाच्या लाक्षणिक संपाचा काय परिणाम होणार ? म्हणूनच येथे काम करीत असलेल्या तीन युनियन्सना संघर्षासाठी वेगळी व्यूहरचना करावी लागेल. अन्यथा त्यांच्या संघर्षाचा सरकारवर काहीच परिणाम होणार नाही !

—रामगणेश

# दिल्लीचा उंट : दूरदर्शनवरील राष्ट्रीय प्रसारण

मुंबई मराठी पत्रकारसंघाच्या नेतृत्वाखाली 'दूरदर्शन मराठी अन्याय विरोधी संघर्ष समिती' स्थापन झाली आणि ७ मार्चला मोर्चाही झाला. या संघर्षाला पाठिंबा देण्याचे किंवा सामील होण्याचे समितीने आवाहन केलं आणि त्याला जोरदार प्रतिसाद मिळाला. अगदी सर्व थरांतून. मराठी चित्रपट महामंडळ, मराठी नाट्यनिर्माता संघ, ग्रंथाली, नाट्यपरिषद या संस्थांप्रमाणेच स्थानीय लोकाधिकार समिती, शिवसेना, विद्यार्थी परिषद विविध महिला संघटना अशा राजकीय सामाजिक संघटना संघर्षसमितीत सामील झाल्या आहेत. संघर्षसमितीच्या कार्यक्रमास पाठिंबा देणारी शंभरहून अधिक संस्था आणि व्यक्तींची पत्रे समितीकडे आल्याची माहिती समितीचे अध्यक्ष कुमार कदम यांनी सांगितली. सर्वश्री सुधीर फडके, सुधीर जोशी, दाजी भाटवडेकर, अनंत काणे, आत्माराम सावंत, राजन चव्हाण ( कार्यवाह ) आदी प्रमुख मंडळी संघर्षसमितीच्या कृतिसमितीवर आहेत.


गेले चार-पाच महिने मराठी प्रेक्षकांत खदखदतोय. असंतोष ऑक्टोबर८२ मध्ये दिल्लीचा 'राष्ट्रीय प्रसारण' नावाचा प्रकार सुरू झाला, तेव्हापासून हा असंतोष आहे. स्थानिक भाषांचा चक्क दीड तास या 'राष्ट्रीय प्रसारण'ने व्यापला. या दीड तासाचे दोन तास करण्याचा जेव्हा प्रयत्न झाला तेव्हा हा असंतोष रस्त्यावर उतरला. दक्षिण भारतातील राज्यांनी मात्र यावाबत आधीपासूनच जागरूकता दाखवली. अरबाच्या उंटाप्रमाणे या राष्ट्रीय प्रसारण नावाच्या दिल्लीच्या उंटाचं आक्रमण वाढताच या राज्यांनी त्याला वेळीच जागा दाखवून दिली. दक्षिणेचा हिंदी–विरोध तीव्र असल्याने दीड तासाच्या या राष्ट्रीय प्रसारणावर जोरदार प्रतिक्रिया उमटल्या आणि दिल्लीचा लगाम बसला. त्या राज्यांच्या दूरदर्शनकेंद्रांवरून फक्त तासभरच हा कार्यक्रम प्रसारित होऊ लागला. इतर राज्यांच्या म्हणजे विशेषत: महाराष्ट्राच्या तंबूत मात्र या दिल्लीच्या उंटाने व्यवस्थित शिरकाव केला. राष्ट्रीय प्रसारणातल्या हिंदीतल्या बातम्या दक्षिणेने वेळीच बंद पाडल्या; पण बाकीच्या केंद्रांना त्याच त्याच बातम्या पुन्हा पुन्हा ऐकण्याची शिक्षा त्यांच्या समजूतदारपणामुळे मिळाली.

महाराष्ट्र सरकारची वरताण म्हणजे दूरदर्शनसंच बाळगणाऱ्यांवर शंभर रुपये करमणूककर लादण्यात आला आणि त्या मोबदल्यात मुंबई दूरदर्शनकेंद्रावर निम्मे कार्यक्रमही मराठीतून नाहीत. त्या त्या राज्यांच्या केंद्रांवर त्या त्या राज्यांच्या भाषेला प्राधान्य मिळाले पाहिजे ही माफक आणि न्याय्य मागणी; पण नंबर दोनच्या या प्रसारणमाध्यमावरही जास्तीत जास्त केंद्रीकरण लादण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकारला तसा विचारही शिवत नाही. त्यात मुंबई हे विविध भाषिकांचं महानगर. त्यामुळं अन्य भाषांना कार्यक्रमात जागा देणं ओघानंच आलं. आता त्यांना अशी जागा देणं हेही पूर्णत: न्याय्य; तरी त्या नावाने मराठी कार्यक्रमांची पार पीछेहाट करून उर्वरित महाराष्ट्राच्या जनतेवर अन्याय करणं समर्थनीय ठरत नाही.

बरं, दमून–भागून संध्याकाळी घरी परतणाऱ्या मुंबईकरांना जेवण करून निवांतपणे कार्यक्रम पाहता येतील अशीही सोय नाही. या राष्ट्रीय प्रसारणाची वेळ काय ? साडेआठ ते साडेदहा. आपल्या भाषेतील कार्यक्रमही ज्यांना वेळेत पाहता येणार नाहीत त्यांनी करमणूक कर का भरावा, असा प्रश्न उभा राहतो.

## फसवी आकडेवारी

मुंबई दूरदर्शनकेंद्रावर मराठीवरील अन्याय आताच सुरू झालेला नाही. मराठी कार्यक्रमांचं प्रमाण मुळातच कमी होतं. दूरदर्शनच्या ताज्या खुलाशातच यापूर्वी हे प्रमाण ३३ टक्के होतं असं म्हटलं आहे. त्या वेळी मात्र तत्कालीन संचालक अरुण श्रॉफ यांनी मराठी कार्यक्रम ४० टक्के असल्याचे म्हटले होते. तेव्हा आणि आता, दोन्ही बनवाबनवीचेच प्रकार ! राष्ट्रीय कार्यक्रमाचे प्रसारण सुरू होण्यापूर्वी मराठी कार्यक्रमांचे प्रमाण ४२ टक्क्यांवर वाढविण्यात आले आणि नंतर ६ फेब्रुवारीच्या नव्या कार्यक्रमपत्रिकेनुसार हे प्रमाण ४६ टक्के झालं आहे असा खुलासा भारत सरकारच्या पत्रसूचना कार्यालयाच्या पत्रकात करण्यात आलाय, तर मुंबई दूरदर्शनचे संचालक श्री. तातारी यांनी ५४ टक्के मराठी कार्यक्रम सादर केले जाणार असल्याचे म्हटले आहे. पत्रकारसंघाने याबाबत स्पष्ट केलेली वस्तुस्थिती अशी :— गेल्या ६ फेब्रुवारीपासून 'ज्ञानदीप' २० मिनिटां-



# श्रम एव जयते

नेतृत्व, शिस्त आणि कठोर परिश्रम यामुळेंच ९वा आशियाई क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यात नेत्रदीपक यश मिळाले आणि त्यामुळेंच प्रचंड योजनांची आंखणी आणि त्वरित अंमलबजावणी याबाबतीत भारताच्या क्रियाशीलतेचा साऱ्या जगातर्फे गौरव करण्यात आला.

ठराविक मुदतीत क्रीडा मैदाने उभारण्यात आली देशात तसेंच देशाबाहेर लक्षावधि घरांतून लोकांना रंगीत दूरचित्रवाणीवर क्रीडा स्पर्धा आणि सामने पाहणे शक्य झाले. गणकयंत्रें, विद्युतकण विस्तार केंद्रे, मायक्रो-व्हेवआणिउपग्रह शृङ्खला यांचा प्रचंड विस्तार करून. त्याचा विविध सेवांसाठी सुरळीत आणि कार्यक्षमतेने उपयोग करण्यात आला.

# ही ज्योत जळत ठेवा

राष्ट्रीय उत्थानाच्या भव्य क्षेत्रात, आपण आशियाई क्रीडा महोत्सवातील प्रेरणेंचा विस्तार करू या.



आमचा आर्थिक विकास चालूच आहे. ही प्रगति जलद करून आपल्या लक्षावधि बांधवांवरील बोजा कमी करणे आमच्या हातांत आहे. आपण प्रत्येकाने कटिबद्ध होऊन हा प्रयत्न करावयाचा आहे.

खांद्याला खांदा लावून करू काम
आपल्या राष्ट्राला करू बलवान.

davp 82/592

वरून ३० मिनिटे करण्यात आला. रविवारच्या मराठी बातम्यांची वेळ पाच मिनिटांनी वाढविण्यात आली. ( नवी वेळ १५ मिनिटे ) 'मराठी वृत्तचित्र' हा नवा साप्ताहिक कार्यक्रम सुरू झाला आहे, तर दर पाचव्या सोमवारी अधिक एक मराठी चित्रगीत सादर होणार आहे. १९८३ सालात असे फक्त चार 'पाचवे सोमवार' येणार आहेत.

दूरदर्शनकडून देण्यात येणारी आकडेवारी किती फसवी असते ते पहा. 'तुम्ही यांना पाहिलंत का?' 'उद्याचे व आजचे कार्यक्रम' आणि पुन्हा पुन्हा प्रसारित होणारे शालेय कार्यक्रम यांची वेळही या टक्केवारीत धरली जाते आणि हीच दिशाभूल करणारी आकडेवारी प्रथमपासून देण्यात येत होती. त्यामुळे मराठी कार्यक्रमांवरील अन्याय जाणवत नव्हता. 'राष्ट्रीय कार्यक्रमां'च्या प्रसारणाने मात्र त्यांची जाणीव होऊ लागली.

### वाढता विरोध

मराठी प्रेक्षकांमधला हा धुमसणारा असंतोष आता संघटितरीत्या व्यक्त होऊ लागला आहे. आंबेजोगाई येथे झालेल्या ५७ व्या मराठी साहित्य संमेलनाने दूरदर्शनवरील मराठी कार्यक्रमांची वेळ वाढवून मागणारा ठराव केलाय. मुंबई दूरदर्शनवरून ८० टक्के कार्यक्रम प्रसारित होईपर्यंत पत्रकार संघ आणि संघर्ष समिती आपलं आंदोलन चालू ठेवणार आहे. दक्षिणेतील राज्यातील दूरदर्शनकेंद्रांवरून ८५ टक्के कार्यक्रम स्थानिक भाषांतून प्रसारित होतात. त्या पार्श्वभूमीवर दूरदर्शन मराठी अन्याय विरोधी संघर्ष समितीची ८० टक्क्यांची मागणी माफक आहे दोन तासांच्या राष्ट्रीय प्रसारणांतून अर्धा तास आता कमी करण्यात आला असला तरी दक्षिणेतील राज्यांमध्ये राष्ट्रीय प्रसारण एक तासापुरतेच मर्यादित आहे हे लक्षात घेतले पाहिजे शिवाय राष्ट्रीय प्रसारणातून कमी करण्यात आलेला अर्धा तास मराठीच्या वाट्याला किती येणार हे अद्यापही स्पष्ट झालेलं नाही.

मुंबईतील असंतोषाचं लोण आता पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे आदी शहरांतून आणि ज्या ज्या जिल्ह्यांत दूरदर्शनचे कार्यक्रम पोचतात, तेथे पोहचू लागले आहे. हा असंतोष अधिक संघटित झाल्याशिवाय ८० टक्के मराठी कार्यक्रमांची मागणी मान्य होणार नाही. 'राष्ट्रीय प्रसारणा'च्या नावाने स्थानिक लोकभाषांवर अन्याय होतोच आहे; पण 'राष्ट्रीय प्रसारणां'च्या निमित्ताने दूरदर्शन नावाच्या प्रसारणमाध्यमावरील केंद्राचं वर्चस्व वाढत आहे हीही तितकीच चिंतनीय बाब आहे, हे विसरता नये.

# मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा यंदा वेळेवर ?

यंदा मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा वेळेवर पार पडतील आणि त्यांचे निकालही जूनपूर्वी लागतील असं कुलपतींनी जाहीर केलंय !

मे-जूनपर्यंत परीक्षा आणि ऑगस्ट-सप्टेंबरपर्यंत निकाल हे चित्र मुंबई विद्यापीठात यंदा दिसणार नाही, अशी योजना मुंबई विद्यापीठाचे कुलपती म्हणून राज्यपाल इद्रिस हसन लतीफ यांनी जाहीर केली आहे. गेल्या वर्षी पेपरफुटीची साथच आल्याने परीक्षांचा गोंधळ उडाला आणि विद्यापीठावर जोरदार टीकाही झाली. परीक्षांना होणारा उशीर आणि त्यात होणारे गैरव्यवहार नवे नाहीत; परंतु गेल्या वर्षीच्या गोंधळामुळे विद्यापीठ आणि सरकार खऱ्या अर्थाने जागे झाले असावे.

मुंबई विद्यापीठाने यंदाच्या परीक्षांचे वेळापत्रक टाटा व्यवस्थापन संशोधन केंद्राच्या तज्ज्ञांकडून तयार करून घेतलंय, तर उत्तरपत्रिका तपासण्यासाठी परीक्षकांकडे न पाठविता परीक्षकांनाच एका जागी मुंबई विद्यापीठ बोलविणार आहे. त्यासाठी जुन्या विधानभवनाच्या सभागृहाची जागा आणि काही महापालिकेच्या शाळा विद्यापीठाने घेतल्या आहेत. या ठिकाणी प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासतील. अवघ्या पंधरा दिवसांत त्या त्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासल्या जातील आणि एक महिन्याच्या आत त्या परीक्षांचे निकाल जाहीर केले जातील. विद्यार्थ्यांना दिलासा देणारी ही योजना आहे !

गेल्या वर्षीच्या गोंधळाचे खापर कुलगुरु राम जोशी यांच्या माथी मारलं गेलं असलं तरी या योजनेचं श्रेय त्यांनाच द्यावं लागेल. परीक्षापद्धतीत सुधारणा व्हाव्यात आणि ती कार्यक्षम व्हावी यासाठी शास्त्रशुद्ध योजना तयार करण्याच्या प्रयत्नात कुलगुरु राम जोशी गेली दोन वर्षे आहेत. त्या योजनेचा हा पहिला भाग यंदा अंमलात येतो आहे.

मुंबई विद्यापीठाला १९७४ साली ठाणे, कुलाबा ( रायगड ), रत्नागिरी जोडण्यात आल्यानंतर त्याचं कार्यक्षेत्र वाढलं; पण त्या प्रमाणात सेवकवर्ग किंवा खर्चासाठी अनुदान वाढविण्यात आलं नव्हतं. गेली सहा वर्षे १०+२+३ या नव्या अभ्यासक्रमाबरोबरच जुन्या अभ्यासक्रमांच्या परीक्षाही संपलेल्या नाहीत. परीक्षांची आणि परीक्षार्थींची संख्या वाढल्याने गोंधळ वाढत गेला. त्यात चिदंबरम्-सारख्या भ्रष्टाचारी महाभागांनी विद्यापीठ पोखरलं होतं. एप्रिल-ऑक्टोबरच्या मिळून ४०४ परीक्षा मुंबई विद्यापीठ घेतं. ६५०० हून अधिक प्रश्नपत्रिका ४५ लाख विद्यार्थी लिहितात आणि या परीक्षा घेणारा शिक्षक ( ३०० ) आणि बिगरशिक्षक ( १५०० ) असा सेवकवर्ग आहे फक्त १८०० !

मुंबई विद्यापीठाचा वाढता व्याप आणि गोंधळ लक्षात घेऊन परीक्षाविभागाची शास्त्रीय पाहणी करण्याचा आणि कामाची पद्धत कार्यक्षम करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. राज्यसरकारने आणि विद्यापीठ अनुदान मंडळाने या कामासाठी एक लाखाचं अनुदान मंजूर केलं. टाटा संशोधन केंद्राकडे हे काम सोपविण्यात आलं. यंदाच्या परीक्षा या नव्या योजनेनुसार होणार आहेत.

यंदाच्या परीक्षापद्धतीमुळे दोन महत्त्वाचे फायदे होतील; एक, परीक्षा वेळेवर पार पडतील आणि निकाल वेळेवर लागतील. दोन, उत्तरपत्रिकांमध्ये फेरफार करून गुणांची टक्केवारी वाढविण्याच्या गैरव्यवहारांना आळा बसेल. यंदा उत्तरपत्रिका परीक्षकांच्या घरी पाठविल्या जाणार नसल्याने विलंब आणि गैरव्यवहार थांबेल. बड्या 'क्लास'मधून शिकणारी श्रीमंत बापांची मुले परीक्षकांना पैसे चारून आपल्या गुणांची टक्केवारी वाढवून घेत असतात किंवा सरळ हुशार विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका आपल्या उत्तरपत्रिकेस जोडून घेतात. हे गैरव्यवहार करणारे 'एबीसी' ( ABC ) नावाचे एक रॅकेटच मुंबईत आहे याबाबत मी कुलगुरूंशी चर्चाही केली होती; परंतु या लोकांना कायद्यात पकडणे कठीण होते. त्यांच्या उद्योगांना नव्या पद्धतीने आळा बसेल. मात्र अशा संशयित परीक्षकांची काळी यादी विद्यापीठाला तयार करता येईल. ती केली म्हणजे त्यांना परीक्षक नेमता येणार नाही.

मुंबई विद्यापीठाचा वाढता व्याप लक्षात घेता ही नवी परीक्षापद्धतीही पुरेशी ठरणारी नाही. मुंबई विद्यापीठाची पुनर्रचना करणारी एक योजना कुलगुरूंनी तयार केली आहे. ही योजना आहे विद्यापीठाच्या भौगोलिक विकेंद्रीकरणाची. विद्यापीठाचे विभाजन नव्हे तर परीक्षांचे तीन-चार विभागांत विकेंद्रीकरण करण्याची यामागे कल्पना आहे. ही योजना कुलगुरूंनी सरकारकडे पाठविली असून त्याबाबत एक उच्चाधिकार समिती नेमण्याची विनंती केली आहे. त्याबाबत अद्यापही पुरेसा विचार झालेला दिसत नाही.

संशोधन व अध्यापन याकडे विद्यापीठाने लक्ष पुरवावं आणि नवनवीन शैक्षणिक प्रयोग करावेत हे विद्यापीठाचे अपेक्षित कार्य आहे; परंतु फक्त परीक्षा घेणारी यंत्रणा अशी स्थिती मुंबई विद्यापीठाबाबत निर्माण झाली आहे ! विद्यापीठाकडून कार्य व्हायचे असेल आणि मुंबई विद्यापीठाचा दर्जा उंचावयाचा असेल तर परीक्षापद्धतीच नव्हे तर विद्यापीठाच्या एकंदर कार्यपद्धतीत आणि धोरणातही बदल करावे लागतील.

—कपिल पाटील

# सणकीत

## ' कोशातून कोशाकडे '

**मा**गच्या आठवड्यात औरंगाबादला पारध्यांच्या अधिवेशनाला गेलो होतो.
पारधी ही जमात आपल्याकडे गुन्हेगार-जमात म्हणून ओळखली जाते. माणसांचे समूहच्या समूह ' विशिष्ट ' पद्धतीने तपासायचे,वाढवायचे हा आपल्या विविधतेने नटलेल्या परंपरेचा विशेष आहे. असो.
तर या अधिवेशनात या जमातींनी आम्ही आमचं गुन्हेगारी, भिक्षेकरी आयुष्य सोडण्याची शपथ घेतली व सरकारने आमच्या पुनर्वसनाची जबाबदारी घ्यावी असं त्यांनी जाहीर केलं. अधिवेशनाच्या इतर तपशिलात मी शिरत नाही; पण अनुभवकथनाच्या वेळी काही तरुण कार्यकर्त्यांनी केलेली निवेदने, आवाहने, आव्हाने ' तरुण रक्ता ' च्या नात्याने माझ्याही शरीरात पसरत गेली.

माझ्यासारखेच दिसणारे, बोलणारे पदवीधर, वकिलीसारखा व्यवसाय करणारे या देशाचे स्वतंत्र नागरिक म्हणून हे वाढणारे तरुण ' जन्मजात गुन्हेगार ' होते !
शिकून-सवरून पदवीधर होऊन वकिली करणारा टकारी समाजातला एक तरुण ' जन्मजात गुन्हेगार ' आहे ! वकिलीची सनद मिळविताना किंवा तो व्यवसाय करताना अथवा आजवरच्या सपूर्ण जीवनात त्याच्या नावे गुन्हा नाही, फक्त तो या विशिष्ट जातीत जन्मला हाच त्याचा 'गुन्हा' आणि हा डाग वकिलीचा काळा डगला अंगावर चढविला तरी त्याला घालविता आला नाही !
' चोरी हा आपला धर्म आहे तेव्हा चोरी केलीच पाहिजे ! ' असा कानमंत्र लहान मुलांना त्यांच्या आईबापांकडून दिला जातो व पाटीवर ' श्री ' गिरवावी तसा तो पुढे पिढ्यान् पिढ्या गिरविला जातो
हे सगळं नवीन होतं कानाला !
कधी तरी बस, गाडीत एखादा ' पाकिटमार ' सापडला तर ' अमिताभ ' चा आवेश आणून ' जनधुलाईत ' हात धुऊन घेणाऱ्यात मीही असायचो कधीमधी. त्या पाकिटमाराच्या ' नग्नधिंडी ' चे वीरशाली वृत्त स्वैपाकघरातल्या आईपासून ते कॉलेज-कॅन्टीनच्या कोपऱ्यापर्यंत सविस्तर पोचविण्यातही ' बी. बी. सी. ' ची कार्यक्षमता असायची.
पण त्या वेळी ' चोरी ' ही एक वृत्ती आहे,
मानसिक विकृती, विध्वंसक वृत्ती, असंस्कृतपणा किंवा आपल्या कसबी हस्तकलेचा पराकोटीचा आत्मविश्वास किंवा मनगटातला जोर इ. इ. कारणमीमांसा केल्या जायच्या.
माणसं ' जन्मजात गुन्हेगार ' या प्रकारातूनही जन्मतात हे माहीत नव्हतं.
' चोरी ' करणं हे पाप आहे,
' खोटे कधी बोलू नये ' असले धडे शिकत एका विशिष्ट परिस्थितीत वाढलेले आम्ही गरीब/श्रीमंत, गुजराथी/मराठी, मराठा/भट असे फरक किमान पातळीवर किंवा मोठ्यांच्या बोलण्यातून आकलन व्हायचे त्या वेळी; पण हा प्रकार मात्र काल-परवापर्यंत आकलन झालेला नव्हता.
कॉलेजजीवनात 'सबमिशन'च्या वेळेस किंवा परीक्षेच्या वेळेस रात्ररात्र जागताना आणि मध्यरात्री किंवा अपरात्री चहा मारायला जाताना कधी तरी ' स्पेशलवाल्यां 'शी गाठ पडायची.
' काय रे भडव्यांनो...' अशीच रानगट पृच्छा असायची.
डोक्यावरचे बारीक केस, तारवटलेले तांबट डोळे, दाट मिशा आणि ' पोसलेलं अंग. ' साधासा शर्ट व चार प्लेटची ढिगळ पॅन्ट किंवा लेंगा. ' दोन्ही हात पाठीशी. त्यात विशिष्ट पद्धतीने पकडलेला सोटा ' असा तो महाकाय देह समोर उभा राहिला की काळजाचे ठोके आपोआपच स्पीड घ्यायचे.
' इतक्या रात्री कुठे ?'
' अभ्यास करत होतो. '
' अभ्यास ? दारू पीत होतो असं सांगा ना ! '
या प्रश्नाबरोबर ग्रुपमधला एखादा अगदी सोवळा पोरगा तोंडावर केविलवाणा भाव आणून ' नाही साहेब. खरंच अभ्यास करत होतो......'
असं अगदी विनवून सांगू लागे की जणू काही आम्ही आत्ताच दुधाच्या बाटल्या बाजूला ठेवून आलोत !
' बरं बरं जास्त हिंडू–फिरू नका. चांगल्या फॅमिलीमधले दिसता. नीट वागा ! '
त्याने आपल्याला ' चांगल्या फॅमिली 'तले म्हटले याचा केवढा अभिमान वाटे आणि त्याने आपल्याला कपड्यांवरून का चेहऱ्यावरून ' चांगले ' म्हटले याचा आम्ही विचार करीत असू.
' चांगलं ' याची व्याख्या किती वरपांगी असू शकते हे आता जाणवतं.
हे सगळं डोळ्यांसमोरून सरकत होते. समोर ते तरुण कार्यकर्ते आपल्या व्यथा मांडत होते.
' पोलिसांचा ससेमिरा ' काय असू शकतो हे ज्यांनी पोलिसांचा अनुभव घेतला असेल त्यांनाच समजू शकेल !
केवळ एका विशिष्ट जातीत.
आई–बापाच्या पोटी जन्म घेतला म्हणून कुठल्याही चोरीच्या, दरोड्याच्या, बलात्काराच्या, दंगलीच्या अगदीच नाही तर कायदा व सुव्यस्थेच्या नावाखाली तुम्हाला अटक होऊ शकते, कस्टडी मिळू शकते आणि आपण निरपराध आहोत हे वकिली बाण्यानं सिद्ध करता आलं नाही तर २ वर्षे सक्तमजुरीपासून ते थेट

जन्मठेप–फाशीपर्यंत कुठलीही शिक्षा तुम्हाला होऊ शकते. कारण तुम्ही ' जन्मजात गुन्हेगार ' आहात. तुम्ही, तुमचे आईबाप, तुमचा समाज, तुमची वस्ती सारे ' गुन्हेगार ' आहेत !
' ब्रिटिशांनी तयार केलेली ही जमात स्वातंत्र्यानंतर वीस वर्षांनी आम्ही कायद्याने रद्द केली असली तरी ठिकठिकाणच्या पोलिसस्टेशनवर असलेले या जमातींचे ' पंजे ' अजून पुसले गेले नाहीत !'

शहरात वावरताना, बस–गाडीत बसताना, हॉटेलात खाताना, बाजारहाट करताना, सार्वजनिक बागेत हिंडताना बाजूच्या माणसाची जात, जमात, वर्ण, वर्ग शहराच्या यांत्रिक आयुष्यात चक्कीत आटा पिसावा तसा पिसला जातो. ' येथे सर्व जाति–धर्मांच्या, वंशांच्या लोकांना मुक्त प्रवेश आहे– डे. पो. क. ' असले बोर्ड.
एक प्रथा किंवा नियम म्हणून लावायचे असतात व चहा वेटरने आणून देईपर्यंतच्या वेळात ते कधीमधी ' टाइमपास ' म्हणून वाचायचे असतात, अशा वातावरणात आपण वाढत असतो.
' पोलीस ' या प्रकरणाचा संबंध फक्त ' गुन्हेगारां 'शी असतो आणि पोलीस ज्याला पकडतात तो गुन्हेगारच असतो. (पुढे तो सुटला तर त्याचा ' वकील ' चांगला असतो, असा निष्कर्ष काढला जातो.) या वृत्तीने आपला पोलिसांशी काय संबंध असं म्हणून ' ह्याच्याशी आपल्याला काय ?' ' त्यामध्ये आपण कशाला लक्ष घालायचं ?' असं एकेका प्रश्नातून अंग काढून एक ' गाळीव ' सुरक्षित आयुष्य जगण्याची सवय लागून जाते आपल्याला.

आणि मग आईच्या उदरातून एक पिशवी फाडून बाहेर आलो असलो तरी जगताना अशी अनेक सुरक्षित आवरणे स्वतःभोवती गुंडाळून आपण पुन्हा एका कोशातले सुरक्षित आयुष्यच जगत असतो. मग त्या आयुष्याबाहेर किती का मोकळे आकाश किंवा तितकाच खोल समुद्र असे ना !

—संजय पवार

---

ह्या ना त्या निमित्ताने...

# योग्य प्रतिशब्द व योग्य प्रतिसाद

फिरोझ रानडे

दुसऱ्या महायुद्धानंतरचे इंग्लंडमधले दिवस होते म्हटल्यावर तेथल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीची जास्त खोलात जाऊन माहिती द्यायला नको. सगळीकडे युद्धावर गेलेली पुरुषमंडळी परत येत होती. बेकारी भक्कम होती व वाढतच होती. युद्धात कोटचवधी पौंड खर्च झाले होते. पूर्वीसारखे आयुष्य आता रहाणार नव्हते. चैन, हौस-मौज अगदी थांबवली जरी गेली नाही तरी खूप कमी करायला लागणार होती.

अशी हौस-मौज कमी करण्याच्या मागे सरकार लागले होते. लोकांची एकंदर स्थिती पाहून चैनीच्या, हौसे-मौजेच्या वस्तू बनवणारे कारखानदार आता कमी खर्चाच्या वस्तू तयार करण्याकरता आपले तांत्रिकीज्ञान, अनुभव कामी लावत होते. त्याप्रमाणे आपली आपली उत्पादने काढत होते.

इंग्रजी समाजात मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी गोष्ट म्हणजे मोटार. रोलसराइससारख्या मोठ्या कंपनीने आपले मोटारींचे उत्पादन थांबवले होते. त्यांच्या अलिशान गाड्यांना आता गिऱ्हाईक मिळणार नव्हते. त्यांचा कारखाना आता विमाने बनवणार होता.

रोलसराइसवाल्यांनी विमाने बनवण्याचे ठरवून आपला प्रश्न सोडवला होता; पण सगळ्या मोटारकंपन्यांना तसे करणे शक्य नव्हते. मॉरिस वगैरे लहान कंपन्यांनी काय करावयाचे हा प्रश्नच होता.

मॉरिसच्या मालकांनी लहान-सर्व वर्गांच्या लोकांना परवडेल अशी छोटी-गाडी काढावयाचा निर्णय घेतला. लहान असल्यामुळे तिची किंमत कमी असणार होती व तिला पेट्रोल पण कमी लागणार होते. ही गाडी लहान असली तरी तिला SMALL–CAR म्हणणे योग्य दिसणार नव्हते. विकत घेणाऱ्यांच्या भावना दुखवल्या जाणार नाहीत असा काही तरी चांगला, चपखल बसेल असा शब्द निवडणे आवश्यक होते.

मॉरिस–कंपनीच्या साहेबाला एक चांगला शब्द सुचला व तो म्हणजे MINI हा होय. ह्या पुढल्या सगळ्या मॉरिस गाड्यांना MINI–MORRIS म्हटले जाणार होते.

मॉरिशससाहेब फक्त हे नावच सुचवून थांबला नाही तर त्याने एक भविष्य पण वर्तवले. ' ह्यानंतरच्या काळात MINI हे विशेषण फार प्रसिद्धी पावणार आहे. लोकप्रियता मिळवणार आहे !'

हे भविष्य किती तंतोतंत खरे ठरले हे सिद्ध करायला उदाहरणे देण्याची गरज नाही. मिनी-स्कर्टपासून मिनी-थिएटरपर्यंत ह्या ' मिनी 'ने काय धुडगूस घातला आहे हे सर्वांना माहीत आहेच.

श्यामला आत्ता हे सगळे आठवायचे कारण म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त झालेल्या एका भाषणाच्या कार्यक्रमात अध्यक्षमहाराजांनी वक्त्यांची ओळख करून देताना हा ' मिनी ' शब्द वापरला होता.

स्वातंत्र्यवीरांच्या भाषणाचा हा कार्यक्रम कोणा ब्राह्मण-सभेत होता हे वेगळे सांगायला नकोच. तसेच भाषणांचे कार्यक्रम पार्ले, दादर, गिरगाव वगैरे ठिकाणी होते व स्थळे होती त्या त्या ठिकाणची ब्राह्मण–सेवा वा सहाय्यक मंडळेच. हा भाषणाचा कार्यक्रम भवानी-शंकररोडवरच्या ब्राह्मण-सेवासंघात होता.

भवानीशंकररोडवरच्या ब्राह्मण-सभेच्या इमारतीच्या तळमजल्यावरचे सभागृह विजेच्या

प्रकाशात अगदी चमकत होते. त्या सभागृहाला तशी चमकण्याची नेहमीची सवय होती. तेथे सकाळी लग्न झालेल्यांचा संध्याकाळी, सुपारी-पानाचा कार्यक्रम होत असे. तेव्हा असा विजेचा झगमगाट हवाच!

पण नेहमीच्या झगमगाटात व सजावटीत आज एक-दोन फरक होते.

आजसुद्धा ध्वनि-क्षेपकावर मोठ्याने गाणी लागली होती; पण आज 'जिसकी बिबी लंबी उसका भी बडा नाम है' वा 'कभी कभी मेरे दिलमे खयाल आता है' अशी गाणी नसून 'जयोस्तुते महामंगले' हे सावरकर-गीत होते. खरे म्हणजे इतक्या स्फूर्तिदायक काव्याला गाणे गीत अगदी काव्य वगैरे नावे कशी विशविशीत वाटतात नाही? काय त्या कीर्ति-गीताचे शब्द, चाल व काय ते मंगेशकर कुटुंबाचे आत्मीयतेने म्हणणे! ब्राह्मण सहाय्यक संघ थोडा दूर असूनही त्या गाण्याच्या नुसत्या स्वरांनी श्याम त्या दिवशीच्या कार्यक्रमाशी समरस झाला.

जशी ध्वनि-क्षेपकावर गाणी वेगळी होती तशी सभागृहात मंचावरची रचना पण वेगळी होती. आज मंचावरल्या थोराड खुर्च्यांवर एक दिवसांचे नटले-थटलेले सुखी जोडपे नव्हते. नव्हते त्यांच्या आजूबाजूला एक वराकडला व एक वधूकडला चुटचुटीत माणूस भेटवस्तूंची यादी करायला. काही खास प्रकाशयोजना नव्हती की सतत डोळे मिचकवणारी विजेची रोषणाई नव्हती.

आज मंचावर पांढरी चादर टाकलेले एक मेज होते. त्याच्या मागे तीन-चार खुर्च्या होत्या. मंचावर डाव्या बाजूला स्वातंत्र्यवीरांचे एक मोठे छायाचित्र होते. त्याला साधा पुष्पहार घातला होता व आजूबाजूला विजेच्या लहान-लहान दिव्यांची जुजबी आरास केली होती.

श्यामने सावरकरांना अक्षरशः शेकडो वेळा पाहिले होते. विद्यार्थी असताना तो दादरलाच सावरकर-सदनापलीकडे दोन-चार घरे टाकूनच्या घरात रहात असे. त्याचा जाण्या-येण्याचा रस्ताच मुळी सावरकर-सदनावरून होता! सदनावरून जाताना त्यातल्या त्यात संध्याकाळचे सावरकर आपल्या घराच्या सज्जात उभे असलेले त्याला खप वेळा दिसायचे.

का कोणास ठाऊक, स्वातंत्र्यवीरांचा चेहरा त्याला नेहमी फार उदास असा वाटावयाचा-निराश माणसासारखा.

सावरकर त्या वेळी मोठ्या काळचा-छायेत होते. गांधीहत्येच्या आरोपातून ते सही-सलामत व मोठ्या मानाने सुटले होते तरी त्या सगळ्या प्रकारणाचा त्यांच्या मनावर काही परिणाम झाला असेल का? असा प्रश्न त्यांचा उदास चेहरा पाहून श्यामच्या मनात येत असे.

सावरकरांचे भाषण मात्र श्यामने एकदाच ऐकले होते. काही तरी ५१-५२ सालची गोष्ट. माटुंग्याच्या खालसा कॉलेजच्या सभागृहात 'भाषाशुद्धी' ह्या विषयावर त्यांचे भाषण होते. त्यांना राजकारणावर बोलण्याची बहुधा बंदी असावी.

कित्येक वर्षांत सावरकरांचे जाहीर भाषण झाले नव्हते. सभेला तोबा गर्दी होती. श्याम व त्याचे मित्र त्या वेळी कॉलेज-विद्यार्थी. अशा विषयावर असलेल्या सभांना जाणे वगैरे 'विद्यार्थीपणात' बसणारे नव्हते; पण एक तर सावरकरांसारखा थोर माणूस बोलणार आहे व त्यांच्या वक्तृत्वाबद्दल फार ऐकलेले. म्हणून श्यामने सभेला जावयाचे ठरवलेले. आता खरं सांगायला हरकत नाही, सावरकरांची भाषाशुद्धी हा त्या वेळी थोडा कुचाळकीचा विषय झाला होता. रेल्वे-स्टेशनला त्यांनी 'अग्नि-विश्रामधाम' असा लांबलचक प्रतिशब्द दिला आहे असे उदाहरण देऊन त्यांची कुचाळकी होत असे.

पण सावरकर त्या दिवशी ज बोलले व त्याचा श्यामच्या मनावर झालेला परिणाम शब्दात वर्णन करणे अगदी कठीण आहे. असा 'शब्दात वर्णन करण्यास अगदी कठीण' श्यामवर आलेला दुसरा प्रसंग म्हणजे बद्री-केदारचा!

श्याम आपल्या म्हाताऱ्या आईला घेऊन बद्री-केदारला गेला होता. बद्री-केदार म्हणजे हिमालयात ७८ हजार फुटांवर आदि शंकराचार्यांनी वसवलेले महादेवाचे मंदिर. श्याम व त्याची आई तेथे संध्याकाळचे उशिरा पोहोचले. असे त्यामुळे तेथल्या घनघोर थंडीशिवाय तेथली बाकी कोणतीही गोष्ट त्यांना जाणवली नव्हती. रात्री अर्थातच दारं-खिडक्या पक्क्या बंद करायला लागल्या!

सकाळी-सकाळी श्याम उठला व खिडकी उघडून बाहेर पहातो तो काय? त्याचे समोर हजारो फूट उंचीचा पांढऱ्याशुभ्र बर्फाचा मोठा पर्वत! त्या पांढऱ्याशुभ्रावर सूर्याचे कोवळे ऊन पडले होते. त्यामुळे तो सोन्यासारखा चकमकत होता!

हजारो फुटांचे ते चकमकणारे सोने ज्याने पाहिले तो धन्य! सावरकरांचे भाषण ज्याने आयुष्यात ऐकले तो एक धन्य!

त्या दिवशी सावरकर तासभर बोलले, दीड तास बोलले की, दोन तास बोलले हे श्यामलाच नाही तर तेथे जमलेल्या हजारो श्रोत्यांच्या ध्यानीसुद्धा नाही!

'भाषा-शुद्धी' हा तसा बघायला गेलं तर क्लिष्ट विषय व त्यातून टवाळी झालेला. सावरकरांनी तो साधा व सोपा तर करून सांगितलाच; पण आपल्या भाषेतले शब्द वापरणे हे अभिमानास्पद आहे ह्याची जाणीव त्यांनी प्रखरतेने करून दिली.

सावरकरांची भाषा-शुद्धी जर प्रथम कोणी उचलली असेल तर ती चित्रपट-व्यवसायातल्या भालजी पेंढारकरांनी! चित्रपट, दिग्दर्शक, रंगमंच, रंगभूषा, वेषभूषा असे किती तरी साधे-साधे शब्द त्यांना सावरकरांनी बनवून दिले. चित्रपट, रंगभूषा, रंगमंच वगैरेला आपण मराठी शब्द नाहीत म्हणून इंग्रजी शब्द वापरत होतो हे आता खरेसुद्धा वाटत नाही!

स्वातंत्र्यानंतर तर आपण इंग्रजी वा फारसी शब्दांचे प्रतिशब्द अगदी पाण्यासारखे वापरू लागलो आहोत. दूरध्वनी, दूरदर्शन, क्रमांक, महाविद्यालय, दिनांक, स्थानक वगैरे शब्द सावरकरांनी सुचवले नसतील कदाचित; पण त्याच्यामागची प्रेरणा मात्र त्यांची होती हे निश्चित!

त्या दिवशीचे मुख्य वक्ते होते श्री. अप्पा कासार. रत्नागिरीपर्वापासून हा 'हनुमान' सावरकरांबरोबर होता. त्यांचा हुद्दा शरीर-संरक्षणाचा; पण ते नुमते शरीर-संरक्षक राहिले नाहीत. त्यांनी भागलपूरच्या लढ्यात मोठे कार्य केले होते. बिहारमध्ये बेकायदा ठरलेल्या हिंदूमहासभेच्या अधिवेशनाचा ध्वज त्यांनी प्राणाची पर्वा न करता फडकावला होता! त्यांची पांढरीशुभ्र दाढी, ६०-६५ वर्षांचे वय व चेहऱ्यावरचे अत्यंत

प्रामाणिक भाव ह्याने सगळे सभागृह अगदी भारावून गेले.

'राम हा एकटा देवाचा अवतार नव्हता. त्याच्याबरोबरच्या वानरात थोडे थोडे देवपण होते म्हणून रामाचा विजय झाला!' सभेचे अध्यक्ष धों. वि. देशपांडे प्रास्तविक बोलत होते अध्यक्षाने कसे व किती बोलावे ह्याचा देशपांडे अगदी आदर्श मानायला हरकत नाही. 'शिवाजी हा एकटा शिवाजी नव्हता. थोडे थोडे शिवाजीपण इतर शेकडो मावळचात– तानाजीत, येसाजीत, बाजी प्रभूत होते म्हणून तो छत्रपती झाला! नेपोलियन यशस्वी झाला ह्याचे कारण फ्रान्समध्ये There were hundreds of little Nepoleons.

सावरकर यशस्वी झाले ह्याचे कारण त्यांचे आजूबाजूला श्री. कासारांसारखे कित्येक MINI सावरकर होते!'

सावरकरांवरच्या भाषणाला अध्यक्षपद स्वीकारणाऱ्या ह्या गृहस्थांना MINI ह्या शब्दाला मराठी प्रतिशब्द सुचू नये ना? श्यामच्या मनात विचार आला.

'सावरकरांची शेवटची यात्रा निघाली होती त्याला हजारो लोक जमले होते. त्यांच्या पार्थिव देहामागून ते चालले होते.' कासार आपल्या सावरकरांच्या आठवणी सांगत होते.' नंतरच्या भाषणात कोणी वक्ता म्हणाला, 'जिवंत असताना जर इतके लोक सावरकरांच्या मागे असते तर?'

ह्या अध्यक्षमहाराजांना MINI ह्या शब्दाला प्रतिशब्द सुचला नाही हे काही फार महत्त्वाचे नाही; पण सावरकरप्रेमींना त्यांच्या कार्याला प्रतिसाद देण्याचे सुचले का? कासार आता रत्नागिरीच्या पतितपावनमंदिराबाबत बोलत होते. श्यामच्या मनात आले. सावरकरांच्या पतितपावनमंदिराचे इतके कौतुक होते – व ते साहजिकच आहे; पण इतर किती ठिकाणी सावरकर-भक्तांनी अशी मंदिरे काढली? पुण्याचे एक जाऊ दे; पण सावरकरांची कर्मभूमी – नाशिकला तरी?

उलट नाशिकला त्यांच्या चाहत्यांनी काळचा रामाच्या देवळात प्रवेश करणाऱ्या दलित बांधवांवर दगडाच्या शिळा टाकल्या!

'सावरकरांनी हिंदु समाजाला नवी दृष्टी दिली.' कासार सावरकरगुणगान करत होते. हिंदु समाजाला तर नवी दृष्टी वगैरे सोडूनच द्या; पण ब्राह्मणवर्गालाही नवी दृष्टी आली नाही!

शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकाला महाराष्ट्रातल्या ब्राह्मणमंडळींनी नकार दिला म्हणून महराजांना मोठी दक्षणा देऊन काशीहून गागाभट्टाला बोलवावे लागले! काश्मिरच्या महाराजाने आपल्या राज्यातले मुसलमाम हिंदु व्हायला तयार आहेत, त्यांना हिंदू करून घ्या म्हणून काशीच्या ब्राह्मणांना विनंती केली तर त्या ब्राह्मणांनी 'तसे होणे नाही!' म्हणून सांगितले.

ह्या झाल्या जुन्या गोष्टी, तर अगदी १९५१ सालची गोष्ट ऐका! मध्यवर्ती सरकारातल्या काँग्रेस पुढाऱ्यांनी म्हणजे सरदार पटेल, राजेंद्रप्रसाद, कन्हैयालाल मुनशी वगैरे लोकांनी सोमनाथाचे देऊळ परत बांधावयाचे ठरवले. सोमनाथाच्या देवळाचा विध्वंस हा हिंदू समाजावरचा डाग आहे, तो धुतला गेला पाहिजे ही त्यांची भावना. काही लाखो रुपये खर्च करून ते देऊळ परत बांधले जावयाचे होते. त्याकरता काही ब्राह्मणांना बोलावले होते. सरदार पटेलांची एकच अट होती व ती अगदी रास्त होती की, नव्या देवळात हरिजनांना प्रवेश मिळेल!

झाले. तर सगळे ब्राह्मण रुसले अगदी सावरकरभक्त! नाशिकचे ब्राह्मणसुद्धा रुसले! त्यांनी सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा करण्यास, त्याला हजर रहाण्यास सरळ नकार दिला! शेवटी त्या पूजेची सांगता रॉयवादी लक्ष्मणशास्त्री जोश्यांच्या हस्ते केली गेली! ही ह्यांची नवी दृष्टी!

अप्पा कासार आपले स्वातंत्र्यवीरांबद्दलचे अनुभव सांगत होते. सगळे हिंदु कसे एक वगैरे! गायकवाडवाड्यात लोकमान्यांच्या पुत्रांनी – श्रीधरपंत टिळकांनी ब्राह्मण, ब्राह्मणेतर व हरिजनांना चहापान दिले तर त्यांच्यावर टीका केली – निंदा केली भालाकार भोपटकरांनी!

सावरकरांच्या कोणत्याही कार्याला कल्पनेला, चळवळीला त्यांच्या भक्तांनी प्रतिसाद दिला नाही हेच खरे. उद्या इतिहास म्हणेल'

'Sawarkar failed because, there were no little Sawarkars!' □

---


"गाडीने घोडनदी–शिरूर ओलांडून अहमदनगर जिल्ह्यात प्रवेश केला. पारनेरफाट्याला गाडी डावीकडे वळली. पाच-सात किलोमीटरनंतर कुकडीचा प्रचंड कोरडा कालवा पार करून आम्ही राळेगणशिंदी ह्या गावात शिरलो.

"गाडीतून उतरल्यावर पहिला प्रश्न पडला, 'हातामधील सिगरेटचं थोटुक कुठं टाकू?'– इतका सर्व परिसर स्वच्छ होता. मला एकदम जगातील सर्वांत स्वच्छ शहर सिंगापूरची आठवण झाली. सिंगापूर हा अफाट सधन देश. राळेगणशिंदी दुष्काळी, जिरायती शेती असलेलं लहानसं खेडं! –मग इथं इतकी स्वच्छता कशी?

# मग इथं इतकी स्वच्छता कशी?

**या स्वच्छतेचा पोवाडा ऐकवत आहेत**

**विजय परूळकर**

**माणूस : पुढील अंकी**




# पोलंडचा पुरुषोत्तम लेक वालेसा

गेलं वर्ष तसं अभूतपूर्व घटनांनी ठासून भरलेलं. यातली प्रत्येक घटना त्या त्या देशाचंच नव्हे तर साऱ्या जगाचं लक्ष वेधून घेणारी ठरली. या साऱ्या घटना केवळ इतिहासात नोंद होऊन थांबण्याजोग्या नव्हत्या तर इतिहासाचा चेहरामोहरा बदलून टाकणाऱ्या होत्या. म्हणूनच ८१ साल हे या शतकातलं अत्यंत महत्त्वपूर्ण साल ठरलं आहे.

जगाला शांती आणि मानवी हक्क मिळवून देण्यासाठी चार वर्षं सातत्यानं झगडा करणाऱ्या जिमी कार्टरचा प्रचंड पराभव करून लढाऊ वृत्तीचे रेनॉल्ड रीगन हे अमेरिकेच्या अध्यक्षपदी ८० साली विराजमान झाले आणि त्यांनी पदावर येताच अमेरिकेची पेंगुळलेली अस्मिता जागी केली. अमेरिका हे जगातले सर्वश्रेष्ठ राष्ट्र आहे हे दाखवून देण्याचा त्यांनी विडा उचलला. वर्षभरात त्यांची लोकप्रियता शिगेला पोहोचली. 'टाइम' या जगातल्या सर्वाधिक नामांकित साप्ताहिकानं रीगनसाहेबांची 'मॅन ऑफ दी इयर' अशी ८० सालासाठी निवडही करून टाकली. लोकप्रियतेचा उच्चांक गाठलेला असतानाच ८१ च्या मार्च ३० ला एका समारंभाहून परतत असताना रीगनसाहेबांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. ते गाडीत चढत असताना जॉन हिंक्ले नावाच्या एका पंचविशीच्या तरुणानं त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. एका गोळीनं नेमका त्यांच्या फुप्फुसाचा वेध घेतला. इंचाभरानं गोळीनं जागा बदलली असती तर अमेरिका आपल्या अध्यक्षांना मुकली असती! लिंकन, केनेडी या भूतपूर्व अध्यक्षांच्या मालिकेत त्यांचं नाव बसलं असतं; पण सुदैवानं ते वाचले! या घटनेपासून अध्यक्षमहाशयांनी काय धडा घेतला हे जरी कळलं नसलं तरी हिंसेमुळं कुठलीच समस्या सुटत नाही, हे अमेरिकेला आणि साऱ्या जगाला निश्चितपणे कळून चुकलं!

बड्या नेत्यांचे खून करण्यास प्रयत्न फक्त अमेरिकेतच घडला असं नाही, इतरही देशात असलीच भयनाट्यं घडून आली. जगातल्या सर्व ख्रिश्चन धर्मियांना ललामभूत असलेले पोप दुसरे जॉन पॉल यांच्यावर रोममध्येच एका भडक माथ्याच्या इसमानं गोळ्या झाडल्या! ख्रिश्चन धर्मियांच्या सर्वश्रेष्ठ गुरूवर गोळ्या झाडल्या जाण्याचा हा तसा पहिलाच प्रसंग होता. म्हणून तर तो जितका धक्कादायक होता तितकाच अंतर्मुख करणाराही होता. एका गालावर थप्पड लगावली तर दुसरा गाल पुढं करा अशी शिकवण देणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या मनाला काय यातना झाल्या असतील हे एक आकाशातला बापच जाणे; पण धर्माच्या नावाखाली हिंसाचाराचा आश्रय घेणाऱ्या मानवजातीला या प्रकरणापासून शिकण्यासारखं खूपच होतं.

पोपच्या या खुनाच्या प्रयत्नामागं रशियाचा हात असावा हे आता जवळजवळ निश्चित झालं आहे. के. जी. बी. या रशियन हेरसंघटनेनं बल्गेरियन हेरांना हाताशी धरून एका भडक माथ्याच्या तुर्की दहशतवादी तरुणाकडून – अली आकाकडून–पोपचा काटा काढायचा प्रयत्न केला. याचं कारण काय? ... तर पोपनी आपल्या मातृभूमीची – पोलंडची कम्युनिस्ट राजवटीकडून चाललेली मुस्कटदाबी सहन न होऊन त्याविरुद्ध व्हॅटिकनच्या जागतिक धर्मपीठावरून जाहीर निषेध व्यक्त केला. धर्मपीठानं दिलेलं हे आव्हान रशियन सत्ताधिशांना मुळीच सहन झालं नाही.

सारं आयुष्य शांतीचा शोध घेण्यात घालविणाऱ्या इजिप्तच्या अध्यक्ष सादातना नोबेल पारितोषिकाचा मान देऊन जगानं त्यांना गौरवलं अन् त्यांच्याच प्रजाजनांपैकी अतिरेकी धर्मलंडांनी गोळ्या झाडून त्यांच्या शरीराची चाळण करून टाकली! रक्ताच्या थारोळ्यात पडलेला हा शांतिदूत पाहून सारं जग हळहळलं. जगाला शांती आणि अहिंसेची शिकवण देणाऱ्या शांतिदूतांतील अनेक जणांना हिंसाचारालाच बळी पडावं लागलं, या विचित्र विरोधाभासाला काय म्हणावं? मारेकऱ्यांच्या गोळ्यांची शिकार होण्याचा प्रसंग अमेरिकेचे अध्यक्ष, ख्रिश्चनांचे धर्मगुरु अन् इजिप्तचे अध्यक्ष या तिघांच्यावरही आला; पण पहिल्या दोघांचं नशीब बलवत्तर असल्यामुळं ते दोघंही बचावले! सादात मात्र तितके सुदैवी नव्हते. शांततेच्या या शिल्पकाराची अखेर दारुण अशा शोकांतिकेत झाली!

सादातच्या मृत्यूनं मध्यपूर्वेच्या क्षितिजावर उगवू पाहणारा शांतीचा सूर्य उजाडण्यापूर्वीच मावळला. त्यातच भर पडली इस्रायलच्या आक्रमक अन् अकल्पित कारवाईची. इराकच्या आसिराक अणुभट्टीवर बॉम्बहल्ला करून इस्रायलनं ती उध्वस्त करून टाकली. जगातील लोकमताची कदर न करता एखाद्या राष्ट्रानं दुसऱ्या

१९८१ सालात जगाच्या पाठीवर अनेक वादग्रस्त, वेधक घटना घडल्या; पण यातील एकाही घटनेची बरोबरी पोलंडमध्ये घडत असलेल्या चित्रथरारक, रोमांचकारी नाट्याशी होऊ शकली नाही. जय–पराजय, आनंद–क्लेश, स्थैर्य–अस्थिरता यांनी काठोकाठ भरलेल्या या नाट्याचा नायक होता लेक वालेसा !

## लेखांक तिसरा : लेखक : श्रीकांत मुंदरगी

एखाद्या राष्ट्राची इतकी मानहानी पूर्वी कधी केली नसेल ! तसंच बैरूतमधल्या पॅलेस्टाइन लिबरेशन ऑर्गनायझेशनच्या मुख्य कचेरीवर हल्ला चढविला. त्यात बळी गेलेल्या तीनशे लोकांपैकी बहुसंख्य निरपराध नागरिक होते. एका हिंसेतून दुसरी हिंसा निर्माण होते हे या उभय पक्षांना कधीच उमजू शकणार नाही हेच या गोष्टीवरून दिसून येतं.

या जशा साऱ्या जगावर दुष्परिणाम करणाऱ्या वाईट घटना या सालात घडल्या, तशाच साऱ्या जगाचं लक्ष वेधून घेणाऱ्या काही चांगल्या घटनाही याच कालखंडात घडल्या. ४४४ दिवस इराणच्या बंदिवासात ओलित म्हणून राहिलेले ५२ अमेरिकन नागरिक सुखरूपपणे मायदेशी परतले. अमेरिकनांना जबरदस्तीनं ओलित म्हणून ठेवून घेण्याच्या अविचारी कृत्यामुळं इराणनं साऱ्या जगाला जवळजवळ युद्धाच्या खाईतच लोटलं होतं असं म्हणायला हरकत नाही. वेळीच सुबुद्धी सुचल्यामुळं या अनर्थकारी घटनेचं पर्यवसान सुखान्तिकेत झालं. अन्यथा रीगनसाहेबांनी इराणची राखरांगोळी केली नसतीच असं कोणी छातीठोकपणे सांगू शकणार नाही. ओलितांचं मायदेशी पुनरागमन ही अमेरिकनांच्या दृष्टीनं अत्यंत आनंदाची गोष्ट समजली गेली.

त्याखालोखाल अमेरिकेला आणि साऱ्या जगालाही आनंद वाटावा अशी घडलेली दुसरी घटना म्हणजे कोलंबिया स्पेस शटल्चं यशस्वी अंतराळ-उड्डाण व पुनरागमन. अमेरिकेला अतिशय अभिमान वाटावा अशी ही गोष्ट होती. कारण अंतराळ-संशोधनात काही काळ रशियाच्या मागं पडलेली अमेरिका परत एकदा या गोष्टीमुळं आघाडीवर आली. स्पेस शटल्च्या या यशामुळं अज्ञात आणि अनंत अवकाश आपल्या नजीक येऊन ठेपलं ही गोष्ट अखिल मानवजातीला आनंददायी ठरली नसल्यासच नवल !

गेल्या पाच–सहा वर्षांत ग्रेटब्रिटनचे भावी सम्राट अन् सद्यःकालीन राजपुत्र प्रिन्स चार्लस् यांच्या अनेक गुलाबी प्रणयकथा ब्रिटिश प्रजाजन आणि जगातील तरुण–तरुणी मोठ्या चविष्टपणे चर्चित होते. या रोमांचकारी प्रणयप्रकरणांची सांगता अखेर राजपुत्राच्या विवाहानं झाली. उमलत्या गलाबकळीसारखं अन् यौवनानं मुसमुसलेलं सौंदर्य लाभलेल्या एकोणीस वर्षांच्या लेडी डायना स्पेन्सर या युवतीशी त्यांचा विवाह झाला ! साऱ्या जगाचे डोळे दिपून जावेत असा हा शाही सोहळा होता. या समारंभासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून तिथं आलेल्या पाहुण्यांना आपण साक्षात यक्षनगरीत उतरलो आहोत की काय असा भास झाला ! राजे अन् राजघराणी संपुष्टात आली तरी लोकशाहीचं सर्वश्रेष्ठ प्रतीक मानलं गेलेलं ग्रेटब्रिटन मात्र तेथील राजघराणं नामधारी असूनसुद्धा त्याला किती मानतं अन् किती प्रेम करतं हे या प्रसंगावरून दिसून आलं. एवढ्या झगमगाटात अन् लखलखाटात पार पडलेला हा स्वर्गीय सोहळा कदाचित शेवटचाच ठरू शकेल ! जगाची आर्थिक अन् सामाजिक परिस्थिती फार झपाट्यानं बदलत चालली आहे. दारिद्र्य, दैन्य आणि दुःख यांनी गांजून गेलेल्या जगातल्या बहुसंख्य लोकांना असले स्वर्गीय सोहळे पाहणं रुचणार अन् पचणार नाही. कारण त्यांना पैशाची ही उधळण अनावश्यक अन् अनाठायी वाटेल !

### ‘ मॅन ऑफ द इयर ’

१९८१ सालात जगाच्या पाठीवर घडलेल्या एकाहून एक विलक्षण अशा घटना जगाचं लक्ष वेधून घेणाऱ्या ठरल्या, जगातील लोकांच्या चर्चेचा विषय ठरल्या, वादग्रस्त तरीही वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या; परंतु, यातील एकाही घटनेची बरोबरी पोलंडमध्ये घडत असलेल्या चित्तथरारक अन् रोमांचकारी नाट्याशी होऊ शकली नाही. जय आणि पराजय, आनंद आणि क्लेश, स्थैर्य आणि अस्थिरता यांनी काठोकाठ भरलेल्या विलक्षण अशा नाट्याचा नायक होता लेक वालेसा ! इतिहासानं राजकारणाच्या रंगमंचावर जे काही थोडे सुपरस्टार्स पाहिले आहेत त्यातच याचीही गणना होईल.

गेल्या वर्षभराच्या काळात जगातील बहुतेक वर्तमानपत्रांनी जास्तीत जास्त मजकूर लेक वालेसाबद्दल लिहिला. आकाशवाणींनी जितका वेळ या व्यक्तीसाठी दिला तितका वेळ इतर कोणाच्याही वाट्याला आला नाही. जगातल्या टेलिव्हिजनवर तर त्याची छबी काही ना काही कारणांनी सारखी दिसत आली. या सर्वांवर कळस चढविला तो ‘ टाइम ’ या साप्ताहिकानं. हे साप्ताहिक जगातले

सर्वांत बुद्धिमान लोक, राजकारणी, शास्त्रज्ञ अन् विद्वान पंडित सात-त्यानं वाचतात. जगातल्या कोणत्याही क्षेत्रातील महत्त्वाच्या घटनांची नोंद या साप्ताहिकात झाल्याखेरीज रहात नाही. असंही म्हणतात की, परग्रहावर सजीवांचा वास असलाच तर पृथ्वीशी संपर्क साधण्यासाठी ते टाइमचे वर्गणीदार होतील. अशा या टाइम साप्ताहिकानं 'मॅन ऑफ दी इयर' म्हणून लेक वालेसाची निवड केली. हे भाग्य फार थोड्या लोकांच्या वाटयाला येतं. आपल्या कर्तृत्वानं जगातील जास्तीत जास्त लोकांचं लक्ष वेधून घेणाऱ्या अन् इतिहासाला कलाटणी देणाऱ्या व्यक्तींच्या वाटयालाच हा किताब येतो. आपल्या लोकांना स्वातंत्र्य वा हक्क मिळवून देण्यासाठी झगडणाऱ्या दोन व्यक्तींना त्या तुरुंगात डांबल्या गेलेल्या असताना हा सन्मान बहाल करण्यात आला. पहिल्यांदा १९३० साली ब्रिटिशांच्या कैदेत असताना महात्मा गांधींची निवड 'मॅन ऑफ दी इयर' या पदासाठी करण्यात आली. त्यानंतर बरोबर अर्ध्या शतकानंतर हाच मान कामगारांच्या कल्याणासाठी पोलिश राज्यकर्त्यांच्या कैदेत खितपत पडलेल्या पोलंडच्या पुरुषोत्तमाला देण्यात आला !

## तू आमचा नेता आहेस !

लोकनायक होण्याजोगे कोणतेच गुण त्याच्यात प्रकर्षानं आढळून येत नाहीत. तसा तो उंचापुरादेखील नाही तशी त्याची उंची जेमतेम ५ फूट ७ इंच भरेल. धट्टाकट्टा व तगडा म्हणावा तर तसादेखील तो नाही. बसक्या मानेच्या या माणसाचं पोट थोडंसं सुटलेलं आहे. खूप पावसाळे पाहिल्यामुळं अनुभवाची भलीमोठी शिदोरी जवळ आहे म्हणावं तर त्यातलाही प्रकार नाही. उणीपुरी चाळिशीदेखील उलटलेली नाही याची. लोकांना मोहवून टाकणारं लोभस अन् देखणं व्यक्तिमत्त्वसुद्धा याला लाभलेलं नाही. समुदायाला गुंगवून सोडणाऱ्या अमोघ वक्तृत्वाच्या जोरावर अनेकजण नेतेपदाच्या शिड्या चढतात; पण तीही कला याला साधलेली नाही. त्याची पोलिश भाषा तशी रांगडीच आहे. शहरी लोकांना लागणारी भाषेची शुद्धता याच्या बोलण्यात मुळीच आढळून येत नाही. कारण व्याकरणाशी याचं कधी जमलंच नाही. सारखं धूम्रपान केल्यामुळं याचा आवाज घोगरा आणि काहीसा कर्कश झाला आहे. म्हणजे हीही एक त्याची उणीच बाजू आहे. बरं, याच्यामागं मोठी परंपरा आहे म्हणावी तर तीही नाही. गेल्या सात पिढ्यांत याच्या घराण्यातील एकही माणूस राजकीय पुढारी झाल्याचं ऐकिवात नाही. त्यामुळं वारसा हक्कानं विनासायास चालत येणारं नेतृत्वही त्याच्या पदरात पडू शकलं नाही. कोणी विद्वान पंडित वा विचारवंत या घराण्यात जन्मले नाहीत. तरी सुद्धा सुमार बुद्धिमत्ता लाभलेला लेक वालेसा लोकांच्या गळयातला ताईत कसा बनला ही एक बुचकळयात पाडणारीच गोष्ट आहे !

दोन-चार वर्षांपूर्वी जगाला तर जाऊ द्याच, पोलंडलादेखील त्याचं नाव ठाऊक नव्हतं. सॉलिडॅरिटीच त्या वेळी अस्तित्वात नव्हती तर तिचा नेता कुठून असणार ? छोटया छोटया कामगार युनियन्सनी आपापली गाऱ्हाणी सरकारपुढं धाडसानं मांडण्यास सुरुवात केली होती. गडॅन्स्कच्या एका कामगार युनियनचा लेक वालेसा एक सदस्य होता. सरकारी अधिकाऱ्यांशी बोलणी करण्याची वेळ आली की त्या युनियनचे नेते कच खात असत. आपल्यावर सरकारी अधिकाऱ्यांचा रोष जाणून-बुजून ओढवून घेण्यात काय हशील आहे असाच विचार करून ते मागं सरत. चर्चेला बसल्यानंतर एखादा प्रश्न, आपली बाजू ठामपणे मांडून तो सोडवून घेणं त्यांना जमत नसे. आपलं नाव सरकारच्या काळया यादीत जमा व्हावं हे त्यांना मनापासून पसंत नसे. म्हणून प्रत्यक्षात एक रुपया घेऊन येतो असं आश्वासन कामगारांना देऊन गेलेले हे नेते चर्चेहून परतताना आणा-दोन आणेदेखील आणत नसत. अशीच एक चर्चा अयशस्वी झाली आणि पडेल चेहऱ्यानं युनियनचे नेते खोलीबाहेर आले. त्या वेळी लेक वालेसा सदस्यांच्या वतीनं नेत्यांना अपयशाचा जाब विचारू लागला. सेनिताव्ह नावाच्या नेत्याला या गोष्टीचा भयंकर राग आला. 'हिंमत असेल तर आत जाऊन त्या अधिकाऱ्यांशी चार शब्द बोलून ये. काय मिळवलंस हे आम्ही विचारणारदेखील नाही !' असं त्यानं लेक वालेसाला चिडून म्हणताच बाकीचे सदस्य लेक वालेसाला पुढं होण्याचा आग्रह करू लागले. लोकांचा आग्रह पाहताच तिरिमिरीनं लेक वालेसा ताड् ताड् पावलं टाकत एकटाच आत गेला. त्याच्या खोलीत अदृश्य होणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे कुत्सितपणे हसून पहात सेनिताव्ह म्हणाला, 'कुल्ल्यावर लाथ मारून कुत्र्याच्या पिल्लासारखं याला मिनिटाभरात बाहेर फेकतात की नाही पहा-! याला टाळकं नाही की चार शब्द धडपणे बोलता येत नाहीत आणि हा शहाणा म्हणे अधिकाऱ्यांशी चर्चा करणार !'

पाच मिनिटं उलटून गेली तरी लेक वालेसा बाहेर आला नाही. सारे सदस्य उत्सुकतेनं दाराकडे नजर लावून बसले होते. सेनिताव्हचं म्हणणं त्यांनाही पटलं होतं. कोणत्या अवस्थेत लेक वालेसा बाहेर येतो याची चिंता सदस्यांच्या मनात निर्माण झाली होती. युनियनचे नेते तर वालेसाला ढकलून बाहेर काढलं जाणार याची खात्रीच बाळगून होते. सलग चार वाक्यं बोलणं जिथं याला जमत नाही तिथं हा डोंबलाची चर्चा काय करणार अन् आपली बाजू काय मांडणार असंच त्यांना वाटत होतं.

......दहा मिनिटं होऊन गेली तरी वालेसाचा पत्ता नाही.

......पंधरा मिनिटं होऊन गेली तरी खोलीचं दार बंदच राहिलं.

......अर्धा तास उलटून गेला तरी खोलीतून कोणी बाहेर येण्याचं चिन्हं दिसेना.

......तास होत आला तसतसा युनियनच्या नेत्यांचा धीर सुटू लागला. त्याची जागा काळजीनं घेतली. ते अस्वस्थ झाले.

......तास उलटून गेला तशी सदस्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली !

...बरोबर एक तास दहा मिनिटांनी दार उघडलं गेलं अन् साऱ्यांच्या अधीर नजरा खोलीच्या आत घुसण्याचा प्रयत्न करू लागल्या.

लेक वालेसा हसऱ्या चेहऱ्यानं बाहेर आला अन् त्यानं आपला हात उंचावून सदस्यांना विजयाची खूण दाखवली. क्षणभर या गोष्टीवर कोणाचा विश्वासच बसेना; पण त्या खुणेचा अर्थ नीट डोक्यात शिरताच सारे सदस्य 'वालेसा, वालेसा ! तू आमचा नेता आहेस !' असं एकमुखानं ओरडू लागले. शहरी शिष्टाचार आणि कृत्रिम



**बॉडीगार्डबरोबर लोकांचा राजा – वालेसा**
**बॉडीगार्डची गरज भासावी**
**असंच ते वातावरण होतं !**

लीनता याची तोंडओळखदेखील नसलेल्या लेक वालेसानं पहिली फेरी जिंकली होती. त्यानं कसलाही विनय न दाखविता लोकांच्या अभिनंदनाचा स्वीकार केला अन् तो म्हणाला, 'होय, होय ! मी तुमचा नेता आहे, मीच यापुढं आपल्या युनियनचं पुढारीपण करीन!'

## लेक एव्हरीमॅन

वालेसानं युनियनच्या बहुतेक मागण्या अधिकाऱ्यांकडून मान्य करून घेतल्या होत्या. युनियनच्या नेत्यांचे चेहरे पाहण्याजोगे झाले होते; पण त्यांनाही अखेर शरणागती पत्करावी लागली होती. वालेसाचं नेतेपद मान्य करण्यावाचून दुसरा पर्यायच त्यांच्यापुढं राहिला नव्हता !

नेतेपद मिळूनही वालेसानं युनियनच्या पुनर्रचनेची फिकीर केली नाही. सेनिताव्हसारख्या विरोधातल्या माणसालासुद्धा त्यानं त्याच्या जागेवरून हलवलं नाही. ज्याचे त्याचे अधिकार त्या त्या लोकांकडे तसेच ठेवण्यात आले. विरोधकांची त्यानं कधी भीतीच बाळगली नाही या निर्भयतेतच कदाचित त्याच्या पुढच्या यशाचं रहस्य सापडू शकेल!

सदस्यांशी अन् सहकाऱ्यांशी चर्चा करताना रात्र उलटून चालली आहे याचंदेखील भान त्याला रहात नसे. साऱ्यांचं म्हणणं शांतपणे ऐकून घेऊन मग तो आपलं म्हणणं तुटक तुटक शब्दांत पण ठामपणं मांडत असे. तो तासंतास बोलत रहायचा. मधून-मधून त्याचं धूम्रपान चालू असायचं सारी खोली निळसर धुरानं भरून गेली की, सहकाऱ्यांना पहाटेचे तीन वाजून गेलेत हे लक्षात यायचं. सारेजण घरी परतण्याची गडबड करू लागले की, वालेसा विचारायचा, 'अखेर तुमचा निर्णय काय झाला ?' यावर उत्तर यायचं, 'तुम्ही घ्याल तो निर्णय योग्य असेल याची आम्हाला खात्री आहे !'

जसं त्याचं आपल्या युनियनमधलं प्रस्थ वाढत गेलं तसं त्याला इतर युनियनमधले लोकही मानू लागले. भाषणासाठी वा चर्चेसाठी त्याला बाहेरून आमंत्रणं येऊ लागली. गडॅन्स्कमधल्या बऱ्याच युनियन्ससमोर तो भाषणं करू लागला. प्रत्येक भाषणानंतर त्याचा आत्मविश्वास वाढीस लागला. भाषणं करताना किचकट मुद्दे टाळायचे, क्लिष्ट विवेचनं वगळायची अन् सारं काही साध्या अन् सोप्या भाषेत लोकांसमोर मांडायचं म्हणजे ते सर्वांना नीट आकलन होऊ शकतं हे त्याच्या लक्षात आलं. मुळात त्याच्या बोलण्याची पद्धत तीच असल्यामुळं त्याची भाषणं कामगारांना सहजपणे कळत. त्यामुळं त्याची लोकप्रियता वाढू लागली. तो निरनिराळ्या शहरांत अन् खेड्यांतूनदेखील भाषणं देऊन आपले मुद्दे लोकांना पटवून देऊ लागला. त्याचं भाषण म्हणजे एखादा एकपात्री प्रयोगच असायचा ! तो बोलता बोलता मध्येच थांबायचा, समुदायाच्या प्रतिक्रियेचा अंदाज घ्यायचा अन् मग आवाज चढवून, हातवारे करीत बोलू लागायचा. भाषणात काही विशिष्ट ठिकाणी बोलण्याला अभिनयाची साथ मिळायची. त्यामुळं त्याची भाषणं जशी श्रवणीय असायची तशीच प्रेक्षणीयदेखील ठरायची अन् म्हणूनच ती जास्तीत जास्त लोकांना ऐकावीशी वाटायची. त्याच्याकडे हजरजबाबीपणादेखील होता. भाषणानंतर विचारल्या गेलेल्या प्रश्नांना तो अत्यंत मार्मिक अन् अचूक उत्तरं देई. त्याचा एकंदरीत नूर पाहिला तर लोकांच्या भावना चेतवण्याची कला त्याला उत्तम जमली होती असं म्हटलं तर ते वावगं ठरू नये. त्याला 'डेमॅगॉग' म्हणण्यात येतं ते काही उगाच नव्हे !

सौजन्याचं आणि त्याचं फारसं कधी पटलं नाही. सहकारी आपलं म्हणणं मान्य करीत नाहीत असं दिसताच तो संतापून जात असे. 'आपलं म्हणणं मंजूर करून घेण्यासाठी आपण ते युनियनच्या सर्व सदस्यांसमोर मांडू अन् हे तुम्हाला मंजूर नसलं तर हा माझा राजिनामा !' अशा तऱ्हेच्या धमक्या सहकाऱ्यांना द्यायला तो मागंपुढं पहात नसे. नंतरच्या काळात सॉलिडॅरिटीच्या निवेदकानं, 'लेक वालेसा हा पोलंडचा चार्लस डी गॉल आहे' असं म्हटलं, त्यामागंही

बहुधा हेच कारण असावं. हुकुमशहाची प्रवृत्ती त्याच्यात लहानपणापासून होती की नाही हे सांगणं अवघड असलं तरी पुढं मिळत गेलेल्या यशामुळं ती त्याच्यात निश्चित दिसून येऊ लागली. त्याचा स्वत:वर जितका विश्वास होता तेवढाच विश्वास नियतीनं त्याच्यावर सोपवलेल्या कार्यावर होता. पुढच्या काळात एक कोटी कामगारांच्यावतीनं तो बोलू लागला की, नि:संकोचपणे आपलं म्हणणं हे त्यांचंच म्हणणं आहे अशा थाटात मांडायचा. डी गॉलशी त्याची तुलना करण्यात येते ती अशा गोष्टींमुळंच. 'मी म्हणजे फ्रान्स आणि फ्रान्स म्हणजे मी. फ्रान्समधल्या जनतेची गाऱ्हाणी माझ्या तोंडून खुशाल ऐकावीत' ही डी गॉलची दर्पोक्ती खोटी आहे असं म्हणण्याचं धाडस कोणालाही झालं नाही.

वालेसाला माहिती होतं, देशाला काय हवं आहे. त्याला खात्री होती, लोकांना काय पाहिजे आहे. म्हणून बऱ्याच वेळा त्याचं भाषण ऐकण्यासाठी जमलेल्या समुदायाला तो सांगायचा, 'आपण या मातीतच वाढलो, या मातीवरच खेळलो, मोठे झालो. या मातीतूनच उगवणारं धान्य आपण खातो आहोत. याच मातीत आपल्या साऱ्यांची अखेर होणार आहे. म्हणूनच लोकांना नेमकं काय हवं आहे याची मला जाण आहे. त्यांना नको असेल ते मी कधीही मागणार नाही!' त्याच्या या असल्या शब्दांमुळंच लोक त्याच्याशी एकरूप होऊन जात. जरी तो शहरात वाढला असला तरी त्याची पाळंमुळं खेड्यातलीच होती. त्याची कर्मभूमी शहरात असली तरी त्याची खेड्यातली जन्मभूमी तो कधी विसरला नाही. तो स्वत:ला अभिमानानं भूमिपुत्र म्हणवून घेतो ते उगाच नाही. 'मी केवळ कामगारांचाच नाही, शेतकऱ्यांचाही नाही, मी साऱ्यांचाच आहे. मला लेक वालेसा म्हणू नका, मला लेक एव्हरीमॅन म्हणा!' त्याचं हे म्हणणं साऱ्या पोलंडला पटलं आहे. साऱ्या पोलिश जनतेचाच तो लाडका नेता होऊन बसला आहे!

थॉमस कार्लाइल हा आंतरराष्ट्रीय ख्यातीचा तत्त्ववेत्ता लोकनायक आणि व्यक्तिपूजा या संदर्भात लिहिताना म्हणतो,

'Universal History is at bottom the History of the Great Men who have worked here.'

## क्रांतीचा थर्मामीटर

'जगाचा इतिहास हा थोर विभूतींच्या कार्यातूनच घडत असतो.' कार्लाइलचं हे म्हणणं वालेसाकडे पाहिलं तर कुणालाही पटणार नाही. वालेसा हा सर्वसामान्य माणसातूनच पुढं आला आहे. त्यानं कसलीही लढाई जिंकली नाही, मोठमोठी पुस्तकं लिहिली नाहीत, नवी तत्त्वं मांडली नाहीत, नवा धर्म स्थापला नाही; पण सर्वसामान्य लोकांच्या आशाआकांक्षांचं तो प्रतीक ठरला आहे म्हणूनच इतिहासही त्याच्या पायांशी विनम्रतेनं वाकला आहे!

रास्त हक्क मिळवण्यासाठी वालेसानं पोलंडच्या सरकारविरुद्ध जो लढा सुरू केला, त्यामागची प्रेरणा पोलंडच्या गेल्या हजार वर्षांच्या इतिहासात सापडते. सातव्या शतकात एका अनामिक बायझॅन्टिन इतिहासकारानं स्लाव्ह वंशाच्या गुणावगुणाची चर्चा करताना नोंदवून ठेवलं आहे, 'स्वातंत्र्याची जणू त्यांना सवयच होऊन गेली आहे. (They are accustomed to liberty.)' जर्मन आणि रशियन लोकांच्या वारंवार होणाऱ्या आक्रमणाला तोंड देण्याची पोलिश लोकांवर पाळी येई. त्यामुळं हे लोक पूर्वीपासूनच लढवय्ये बनले. शत्रूला कडवा विरोध करण्यासाठी संघटित होण्याचे धडे दुसऱ्यांकडून घेण्याची त्यांना कधी गरजच भासली नाही. त्यांच्यात मतभेद नव्हते असं नाही, भांडणं नव्हती असं नाही; पण परकीयांचा हस्तक्षेप होताच आपापसातले तंटेबखेडे विसरून पाहतापाहता पोलिश लोक एका झेंड्याखाली जमा होत अन् एकदिलानं शत्रूवर तुटून पडत. ऐक्य हा जणू त्यांचा स्थायीभाव होता! नेमकी हीच गोष्ट वालेसानं आपल्या लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. राज्यसत्ता, धर्मसत्ता आणि लोकसत्ता एका व्यासपीठावर गडॅन्स्क हुतात्मा स्मारकाच्या निमित्तानं एकत्र आलेल्या असताना याच गोष्टीची जाणीव त्यानं त्या वेळी जमलेल्या देशबांधवांना करून दिली.

परकीय आक्रमणांच्या पाठोपाठ फाळणीनंही पोलंडची पाठ सोडली नाही. १८ व्या शतकात तीन विभागांत झालेल्या फाळणीनं पोलंडची अक्षरश: चाळणी करून टाकली. जगाच्या नकाशातून पोलंडचं नावच नाहीसं करून टाकण्यात आलं! या फाळणीमागचा सूत्रधार होता रशिया! या फाळणीविरुद्ध पोलिश लोकांनी अनेक उठाव केले. कॅथेराइन दी ग्रेट हिनं १७९४ सालचा उठाव सहजपणे मोडून काढला. १८३१ साली झालेली बंडाळी मोडण्यासाठी पहिल्या निकोलसला निर्दय व्हावं लागलं. १८६४ साली झालेली क्रांती मात्र अत्यंत कडव्या नेतृत्वाखाली केली गेली. तिचा नायनाट करण्यासाठी दुसऱ्या ॲलेक्झांडरला नुसते निर्दय अन् निष्ठुर होऊन भागलं नाही तर निर्घृणपणे या क्रांतिकारकांचा संहार करावा लागला!

जगातील क्रांत्यांचा इतिहास लिहिताना कार्ल मार्क्स मोठ्या आदरानं पोलंडबद्दल गौरवोद्गार काढतो, 'पोलंड हा जागतिक क्रांतीचा थर्मामीटर आहे!'

## साखर, दूध, ब्रेडसाठी....

पोलंडमध्ये कामगारसंघटना स्थापन झाल्या या गोष्टीकडे तिथल्या सरकारनं प्रथमत: दुर्लक्ष केलं. कामगारांनी आपलं म्हणणं, आपली गाऱ्हाणी, आपल्या तक्रारी या गोष्टींचा विचार एकत्र बसून करावा याला सरकारची काहीच हरकत नव्हती; पण संघटनांनी आपल्या तक्रारी कारखाने वा खाणी यांच्या उच्च अधिकाऱ्यांसमोर मांडण्यास सुरुवात केली तेव्हा सरकार काहीसं अस्वस्थ झालं. ऑन्टॅारिओ, अमेरिका येथल्या मॅकमास्टर युनिव्हर्सिटीच्या पूर्वयुरोपीय राजकारणाचा अभ्यास व संशोधन करणाऱ्या विभागाचे प्रमुख ॲडाम ब्रोम्के यांच्या म्हणण्यानुसार कम्युनिस्ट राष्ट्रात कामगारांच्या कल्याणाचा मक्ता कम्युनिस्ट राज्यकर्त्यांच्याकडेच असतो. कामगारांनी स्वत:ची चिंता या राज्यकर्त्यांवर सोपवून स्वस्थ बसावं. कामगारसंघटना स्थापन करणं हेच मुळी कम्युनिझमला मान्य नाही. त्या त्या देशाचा कम्युनिस्ट पक्ष हा त्या देशातल्या कामगारांचं प्रतिनिधित्व करतो. तोच मुळी देशाचा सर्वेसर्वा असतो. ब्रोम्केच्या या म्हणण्यात कम्युनिस्ट सत्तांची तत्त्वप्रणाली प्रतिबिंबित होते.

कम्युनिस्ट देशात पक्ष सर्वांत श्रेष्ठ. त्याखालोखाल अधिकार असतात राज्यकर्त्यांना. राज्यकर्ते हे पक्षातूनच निवडण्यात आले असल्यामुळे त्यांच्यावरही पक्षाची सत्ता असते. त्यामुळं आपोआपच

हुकुशाही अपरिहार्य ठरते. पक्षाची निर्वेध सत्ता अन् निरंकुश अधिकारशाही याच पायावर मार्क्सिझम–लेनिनिझमचं मंदीर उभं करण्यात आलं आहे. रशियाचा राज्यकारभार याच तत्त्वावर चालतो. त्यांच्या पद्धतीनुसार सर्वश्रेष्ठ पक्षाधिकाऱ्यांनी आर्थिक तत्त्वांची आखणी करायची अन् ही आर्थिक व्यवस्था राज्यकर्त्यांकरवी देशावर लादायची. याला 'कमांड इकॉनॉमी' म्हणतात. या कमांड इकॉनॉमीत कामगारांचं संपूर्ण सहकार्य अपेक्षित असतं. कामगारांनी याला विरोध करणं हे केवळ चुकीचंच नव्हे तर देशद्रोहाचं लक्षण समजलं जातं. म्हणूनच पोलंडमध्ये सुरू झालेल्या कामगारचळवळीमुळं रशियन सत्ताधारी अस्वस्थ होऊन गेले आहेत. त्यांना भीती वाटते की, ही चळवळ पोलंडमध्ये स्थिर झाली तर तिचं लोण इतर पूर्वयुरोपीय कम्युनिस्ट देशात पोहोचेल अन् एकदा ही चळवळ सर्व कम्युनिस्ट राष्ट्रात पसरली की, त्याची झळ खुद्द रशियाला लागल्यावाचून राहणार नाही !

एवढ्यासाठीच ही चळवळ मूळ धरण्याअगोदरच खुडून टाकण्यात यावी म्हणून रशियानं पोलंडवर खूपच दडपण आणलं; पण पोलंडचे राज्यकर्ते कितीही रशियाधार्जिणे असले तरी स्वदेशप्रेमाची ज्योत त्यांच्या हृदयात कुठं तरी तेवत असावी. त्यामुळं त्यांनी कामगारचळवळ दडपून टाकण्याचं मुळीच मनावर घेतलं नाही.

बंडखोरी ही पोलिश लोकांच्या स्वभावाचं एक अविभाज्य अंग आहे. पोलिश लोकांची तुलना आयरिश लोकांशी करता येईल. बंडखोरी हा या दोघांच्याही रक्ताचा गुणधर्म आहे, असं म्हणणाऱ्या एका युरोपीय राजकीय निरीक्षकानं लिहिलं आहे, '

' The Poles and Irish are the bunch of anarchists. ' पोलिश आणि आयरिश लोक म्हणजे असंतोषाचे जनक आहेत. या तुलनेत थोडीशी अतिशयोक्ती असली तरी मूळ मुद्द्याचं महत्त्व मुळीच कमी होत नाही. पूर्वयुरोपीय कम्युनिस्ट देशातल्या इतर कोणत्याही लोकांपेक्षा पोलिश लोकांनी रशियन साम्राज्याला सातत्याने विरोध केला आहे. या विरोधाला, या उठावाला खतपाणी घातलं आहे पोलंडच्या धर्मपीठानं म्हणजेच कॅथॉलिक चर्चनं. जेव्हा जेव्हा परकीयांनी पोलंडवर आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तेव्हा कॅथॉलिक धर्मगुरूंनी पोलंडवासियांची विझत जाणारी देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला आहे. राजकारणातल्या धर्मपीठाचा सहभाग पोलंडच्या जनतेनं अन् राज्यकर्त्यांनीदेखील गृहीतच धरला आहे. कम्युनिस्ट राष्ट्रातला पोलंड हा एकच देश असा आहे जिथं धर्मसत्तेला राजकारणातून सर्वस्वी डावलण्यात आलेलं नाही. रशियाला अभिप्रेत असलेल्या कम्युनिझमला हे मुळीच मंजूर नाही. म्हणून पोलंड ही रशियाची सर्वांत मोठी डोकेदुखी आहे असं म्हणतात ते काही खोटं नाही.


खरं म्हणजे पूर्वयुरोपातले इतर कम्युनिस्ट देश पाहिले तर त्यांच्या मानानं पोलंडची परिस्थिती फारशी वाईट नव्हती. पोलंडमधल्या माणसाची सरासरी मासिक प्राप्ती १६०० रुपये होती. तसंच प्रत्येकाला सरासरी १५२ पौंड मांस खाण्यासाठी वर्षाला मिळत असे. फक्त पूर्वजर्मनी आणि झेकोस्लोव्हाकिया सोडले तर इतर कोणत्याही कम्युनिस्ट देशातल्या लोकांचं मासिक उत्पन्न इतकं नव्हतं व त्यांना वर्षाला सरासरी ७० पौंडांपेक्षा अधिक मांस मिळत नसे. पोलंडमध्ये नागरिकांना बँकेत खाजगी खाती काढण्याचा अधिकार होता, तसंच कारणाशिवाय या खात्यांची चौकशीही सरकारकडून केली जात नसे. पासपोर्ट मिळवणं म्हणजे आकाशातला चंद्र मिळवण्याइतकं कठीण आहे असा विनोद सर्व कम्युनिस्ट देशांत केला जातो, त्यात तथ्य नाही असं कुणीच म्हणू शकणार नाही; पण पोलिश लोकांना मात्र पासपोर्ट मिळायला फारशा अडचणी येत नसत. इतर कम्युनिस्ट देशांप्रमाणं या देशातही प्रत्येकाला नोकरी, मोफत वैद्यकीय सेवा, मोफत शिक्षण इत्यादी सोई होत्याच; पण पोलंडच्या जनतेला एवढ्यावरच समाधान नव्हतं. त्यांना आणखीन काही गोष्टी हव्या होत्या. त्या म्हणजे बोलण्याचं स्वातंत्र्य, मर्यादित मतप्रदर्शनाचं स्वातंत्र्य, रेडिओ–टेलिव्हिजनवर आपलं म्हणणं मांडण्याची संधी, वर्तमानपत्रांतून खऱ्याखुऱ्या बातम्या छापणं इत्यादी !

### क्यू सिस्टिम

दूध, साखर, ब्रेड, मांस आणि अन्नधान्य यासाठी रांगा लावाव्या लागणं ही कम्युनिस्ट देशातली नित्याचीच बाब आहे. याला पोलंडही अपवाद नव्हता. पोलिश जनतेला या 'क्यू सिस्टिमचा' भयंकर कंटाळा आला होता. ही क्यू सिस्टीम कम्युनिस्ट देशांचं अविभाज्य अंग समजली जाते. मरण्यासाठीसुद्धा इथं माणसांना क्यूमध्ये उभं रहावं लागलं तर कुणाला आश्चर्य वाटू नये असं विनोदानं म्हटलं जातं. राहण्यासाठी फ्लॅट हवा असेल तर आगाऊ रक्कम देऊन आठ ते दहा वर्षं वाट पहावी लागते, तेव्हा कुठं फ्लॅट पदरात पडण्याची शक्यता ! एखादी छोटीशी मोटर घेण्यासाठी वीस महिन्यांचा पगार मोजावा लागतो अन् शिवाय वीस महिने थांबावंही लागतं ! कोणतीही गोष्ट मिळविण्यासाठी जिथंतिथं रांगेतच उभं रहावं लागतं. काही ठिकाणी तर क्यू लावण्यासाठी क्यू करावा लागतो इतकी ही परिस्थिती त्रासदायक आहे ! या क्यू सिस्टीम्स बंद व्हाव्यात हीही एक महत्त्वाची मागणी कामगारांनी आपल्या चळवळीत अंतर्भूत केली आहे. संपावर गेलेला एक पोलिश कामगार अमेरिकेच्या एन. बी. सी. टेलिव्हिजन नेटवर्कला मुलाखत देताना म्हणाला, 'संपाची आम्हाला हौस आहे असं नाही; पण आजपर्यंत सीधेपणानं मागून काहीच मिळालं नाही. नाइलाज म्हणूनच आम्ही संपाची कास धरली आहे. आम्हाला सत्ता नको आहे, हवं आहे ते फक्त चांगलं राहणीमान! ' We don't want to run the government. We just want a decent life ! '

वार्सा युनिव्हर्सिटीच्या इतिहासविभागाचे प्रमुख झिगमंट हेमरलिंग मध्यंतरी उन्हाळ्यात झालेल्या उठावाचं समर्थन करताना औद्योगिक स्टालिनीकरणावर तुटून पडतात, 'ही पद्धत आता कालबाह्य ठरली आहे हे राज्यकर्त्यांच्या लक्षातच येत नाही. जे दुसऱ्या महायुद्धानंतर स्टालिननं रशियात घडवून आणलं ते पोलिश राज्यकर्त्यांना आता पोलंडमध्ये घडवून आणायचं आहे; पण ते हे लक्षात घेत नाहीत की, त्या गोष्टीला आता तीन तपांहून अधिक काळ

**आम्हाला सत्ता नको आहे, हवं आहे ते फक्त चांगलं राहणीमान !**



**श्रोत्यांना तो आपल्याबरोबर ओढून नेत होता !**

◻

उलटून गेला आहे. त्या वेळी जे यशस्वी झालं ते आताही यशस्वी होईल असं म्हणणं मूर्खपणाचं ठरणार आहे !'

या औद्योगिक स्टालिनीकरणातच पोलिश राज्यकर्त्यांनी स्वतःच्या कल्पना घुसडून त्याचं आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न केला. १९७१ साली पोलिश सरकारनं भांडवलशाही राष्ट्रांकडून भरपूर भांडवल कर्ज म्हणून घेऊन ते आपल्या उद्योगधंद्यात गुंतवलं. त्याच्या जोडीला त्यांनी प्रगत राष्ट्रांकडून आधुनिक तंत्रांचीही आयात केली. पार्टीप्रमुख एडवर्ड गिरेक यांना तर पोलंडमध्ये तयार झालेला पक्का माल प्रगत राष्ट्रांत निर्यात करण्याची स्वप्नं पडू लागली. आपण त्यांच्याकडून घेतलेलं कर्ज या निर्यातीमुळं हा हा म्हणता फेडू शकू असं त्यांना वाटू लागलं; पण दुर्दैवानं यातली दानं त्यांच्या मनासारखी पडली नाहीत. भांडवलशाही राष्ट्रांकडून आयात करण्यात आलेली तंत्रविद्या अन् भांडवल या दोघांशीही इथल्या कार्यपद्धतीचा मेळ बसू शकला नाही. त्यामुळं पोलंडच्या विविध तऱ्हेच्या कारखान्यांतून तयार झालेला माल अत्यंत कमी दर्जाचा व निकृष्ट होता. प्रगत राष्ट्रांनी असला माल घेण्यास साफ नकार दिला. त्यातच इंधनटंचाई, गलथान कारभार अन् पश्चिम युरोपात आलेली आर्थिक मंदीची लाट या गोष्टींची भर पडली. कर्ज फिटण्याची गोष्ट तर सोडाच; पण त्यावरचं व्याजदेखील देणं पोलंडला अवघड होऊन बसलं. २३०० अब्ज डॉलर्सचं कर्ज पोलंडच्या शिरावर बसलं आहे ! त्यातलं १·५ अब्ज डॉलर्सचं कर्ज रशियानं फेडलं; पण उरलेलं कर्ज फेडणं सर्व कम्युनिस्ट राष्ट्रांनी एकत्र येऊन फेडायचं ठरवलं तरी शक्य नाही ! अशा अशुद्ध अन् अवघड परिस्थितीत सापडलेल्या पोलंडची अवस्था चिखलात सापडलेल्या हत्तीसारखी झाली आहे. जेवढा वर येण्याचा प्रयत्न करावा तेवढा पोलंड कर्जाच्या गाळात जास्तीच रुतत चालला आहे !

सॉलिडॅरिटीचा सर्वश्रेष्ठ नेता लेक वालेसा १९६७ साली एक साधा इलेक्ट्रिशियन म्हणून गडॅन्स्कच्या लेनिन बोटकारखान्यात कामाला लागला. कारखान्याच्या तिय्यम दर्जाच्या मॅनेजरनं त्याला मुलाखतीसाठी बोलावलं होतं. एका सडपातळ बांध्याच्या, मिशा राखणाऱ्या वालेसाकडं पाहून त्या मॅनेजरनं विचारलं, 'तुला नेमून दिलेलं काम तू नीट करू शकशील असं तुला वाटतं का ?'

'हो. हो...मला...मला असं वाटतं की...की मी ते...ते काम नीट करू शकेन !' बरंच अडखळत वालेसानं कसंबसं उत्तर दिलं.

'तुला दोन वाक्यं काही नीट बोलता येत नाहीत,' वालेसावर धारदार नजर रोखून तो मॅनेजर बोलू लागला, 'अन् म्हणे तू नीट काम करणार ! कसं काय जमणार रे तुला ?'

'नाही...नाही साहेब, मी जरी...मी जरी असं...असं बोलत असलो तरी.. तरी वायरिंगचं काम मी चांगलं करू शकतो.' आपल्याला ही नोकरी गमवावी लागणार की काय या शंकेनं घाबरलेल्या वालेसानं आणखीनच चाचपडत त्या मॅनेजरचं आपल्याकडून समाधान करण्याचा प्रयत्न केला.

जो माणूस एका क्षुल्लक नोकरीसाठी आपल्यापुढं वाकतोय तो काही वर्षांनी साऱ्या देशाला आपल्यापुढं वाकायला लावणार आहे हे ठाऊक असतं तर त्या मॅनेजरनं वालेसाला असले निरर्थक प्रश्न विचारण्याचं धाडसदेखील केलं नसतं ! जो आपल्याशी चार शब्द धडपणे बोलू शकत नाही तो हजारोच नव्हे तर लाखो लोकांना आपल्या बोलण्यानं मंत्रमुग्ध करून सोडणार आहे हे त्या वेळी कसं समजणार ? नियतीच्या लीला अगाध असतात अन् तिच्या खेळी अज्ञात असतात हेच खरं ! वालेसावर गुरकावणारा तो मॅनेजर पोलंडच्या जनसागरात कुठं लुप्त झाला आहे हे कुणाला ठाऊकदेखील नाही !

'तुला नोकरीवर घेण्यापूर्वी थोडासा विचार करावा लागेल असं दिसतं.' एवढं म्हणून त्या मॅनेजरनं इंटरव्ह्यू संपल्याचं सूचित केलं.

'साहेब...साहेब, कृपा करा...काहीही करा पण...पण मला कामावर घ्या ! मला...मला नोकरीची अत्यंत गरज आहे !' एवढं सांगून वालेसा खालच्या मानेनं बाहेर पडला.

( क्रमशः )

## सर्चलाइट

अमृत पुरंदरे

# बोलणारे आकडे

कशी गंमत असते पहा! एखाद्याला न आवडणारी गोष्ट सारखी त्याच्या मागे लागायला लागली, तर काय होईल ? तसं सांगणं मोठं अवघड आहे. कारण काय वाटेल ते होऊ शकेल. लक्षात नाही आले ? नाही, म्हणजे जरा समजून सांगतो. मग आपल्या थोडे लक्षात येईल.

आता हेच बघा. मला गणित अजिबात आवडत नाही. ( हे वेळोवेळी मी जाहीर करीत असतो. ) त्यातली आकडेमोड म्हणजे तर जाम डोकेदुखी ! मी जेवढे शक्य आहे तेवढे या विषयापासून लांब पळायला बघतो. इतके की, दुकानात, बसमध्ये किंवा हॉटेलात परत येणारे पैसेसुद्धा मी मोजत नाही. कोण उगाच कटकट करीत बसणार ? काय थोडे पैसे इकडे तिकडे, येवढेच.

परंतु मी वर प्रतिपादन केल्याप्रमाणे गणित माझा पिच्छा सोडीत नाही. परवा तर सगळ्याचा कळस झाला. मी गरिबासारखा घरी बसलो होतो. कोणाच्या अध्यात ना मध्यात बापडा. तर तिथे अचानक साताऱ्याच्या अजिंक्य प्रकाशन संस्थेचे मालक व चालक श्री. अशोकराव वाळिंबे उपटले...

' काय अमृतराव, काय म्हणताय ? '.

' उत्तम , आपण काय म्हणताय ? काही विशेष ?'

' हो, थोडसं विशेषच आहे. तुमच्याकडे थोडं काम होतं. '

आता इथपर्यंत सर्व ठीक होतं. मला कोणत्याही धोक्याची जाणीव होण्याचं काहीही कारण नव्हतं. त्यामुळं मी बेधडक बोलून गेलो. ' बोला, नुसतं बोला, की काम झालंच म्हणून समजा! '

' आपण ' माणूस ' मध्ये सध्या एक सदर लिहिता, ते मी आवर्जून वाचतो. मला ते आवडते. ' खलास. आम्ही विरघळलो. खरं म्हणजे असं म्हणतात की, कोणी स्तुती करू लागले तर त्याच्याशी जास्त काळजीपूर्वक वागा. हे माहीत असून आणि प्रत्येक वेळेला तसं वागायचं ठरवून आपल्याच्यानं कधी ते जमलेलं नाही !

' तुम्ही फार... म्हणजे बरीच स्तुती. ( आता एकदम मुद्द्याकडे वळतो. ) तर आज संध्याकाळी तुम्ही शिक्षणशास्त्रसंस्थेत, ' गणित ' या विषयावर बोलायला यायचं. '

खलास ! माझे डोळे एकदम फिरले. भुवया आश्चर्याने वर उडाल्या. चेहरा बहुधा लाल होऊन नंतर काळ्या-निळ्या रंगात बदलता झाला आणि तोंडातून ' आँ ' एवढाच भयोद्गार बाहेर पडला. मी या ' पोझ 'मधून सावरेपर्यंत त्यांनी माझ्यावर अजून काही माहिती सोडली.

' तेथे श्री. श्याम मराठे हे द्रुतगणिती तुमच्यानंतर बोलतील. त्यांच्या द्रुतगणितातील अद्भुत रीती ' या नावाच्या पुस्तकाचे त्याच वेळेला प्रकाशन होणार आहे. '

' व्वा, फारच छान! पण तिथे मी कशाला पाहिजे ?' मी थोडं गोडीगुलाबीने संकट टाळण्याचा प्रयत्न चालू केला. ' अहो वाळिंबे, भाषण वगैरे करणं हा आमचा प्रांत नव्हे, त्यात पुन्हा गणित वगैरे म्हटल्यावर...' माझं वाक्य वाळिंबेंनी अर्धंच होऊ दिलं. ते म्हणाले, ' हे बघा, जे काही येईल ते बोला. मला बरीच निमंत्रणं करायला जायचं आहे. मी निघतो. अच्छा ! '

अहो, खोटे नाही सांगत, खरंच निघून गेले ! मी एकदम बधिर झालो माझ्यावर चांगलीच गेम पडली आहे हे समजायला मला वेळ लागला.

आता सांगायला हरकत नाही. मी त्या दिवशी खरोखर गणित या विषयावर बोललो त्या प्रसंगी मी काय बोललो, कसं बोललो, माझी अवस्था कशी झाली इ. 'सर्चलाइट ' मध्ये नंतर कधी तरी फोकस करीन; पण खरी गंमत माझ्या भाषणानंतरच झाली.


छत्रपती राजमाता श्रीमती सुमित्राराजे भोसले यांनी पुस्तकाचे प्रकाशन केल्याचे जाहीर केले आणि स्वतः श्याम मराठे बोलायला उभे राहिले.

' मला द्रुतगणिती म्हणतात म्हणून मी कोणी असामान्य आहे असे नाही. माझे मत तर असे आहे की, प्रत्येक माणसाच्या मनात कुठे तरी एक द्रुतगणिती लपलेला आहे. थोड्याशा सरावाने कोणीही हे करू शकेल. आता हेच बघा ! '

### बाप रे !

स्टेजवर एक फळा, खडू इ. आधीच आणून ठेवले होते. त्यांनी पटापट काही छोट्या आकडेमोडी करून त्या वैदिक पद्धतीने कशा पटकन सोडवता येतील हे सांगितले. नंतर त्यांनी प्रेक्षकांकडून काही प्रश्न मागविले. या प्रश्नांमध्ये काही बारा बारा आकडी संख्यांचे गुणाकार होते. हे गुणाकार त्यांनी बघितल्याबरोबर सोडविले ! एका सेहेचाळीस आकडी संख्येचे तेविसावे मूळ त्यांनी केवळ तीन सेकंदात सोडवून दाखविले. ती संख्या अशी होती– ३७, ९२, ६४, ३४, ८८, ००, ६८, २९, ८९, ३२, २१, ३९, ९४, ४०, ९९, २२, १४, ६०, ४५, ४४, ३१, १. उत्तर ७१. ही संख्या एकदम एकाच वेळेला वाचता यावी म्हणून मराठे स्टेजवरून उतरून दहा मीटर अंतरावर गेले. त्यांनी पाहिले आणि त्यांनी गणित सोडविले. नंतर त्यांनी नऊ या संख्येचा नववा घात आणि त्याचा पुन्हा नववा घात (९) त्यांनी काढून दाखवला. ( हे सर्व तोंडी, कोणतीही आकडेमोड न करता आणि काही सेकंदात चालले होते.

याच्यानंतर तर त्यांनी कमालच केली ! एक ते चाळीस आकडे त्यांनी फळ्यावर लिहिले आणि प्रेक्षकांपैकी एकाला त्यातील कोणतेही आकडे कोणत्याही क्रमाने खोडायला सांगितले. आकडे खोडताना मोठ्याने म्हणायचे एवढाच नियम. काही आकडे खोडून झाल्यावर त्यांनी खोडलेले आकडे सोडून उरलेले आकडे चाळीसपासून एकपर्यंत उलटे म्हणून दाखवले. बरं, यात काही गोची आहे असं मला सुरुवातीला वाटलं; परंतु श्यामरावांनी एक वेगळीच गंमत केली. त्यांनी आकडे खोडून झाल्यावर दहा मिनिटे एका वेगळ्याच विषयावर भाषण केले व त्यानंतर खोडलेले आकडे सोडून उरलेले आकडे सांगितले आणि याची हाइट अजून



आकडे माझ्याशी बोलायला लागतात...

¤

व्हायचीच होती ती काय ते मी थोडं पुढं गेल्यावर सांगेन. या प्रयोगाला त्यांनी 'स्मरणशक्ती' असं नाव दिले होते. कार्यक्रम संपला तेव्हा लोकांनी त्यांना उस्फूर्त दाद दिली.

या प्रयोगांनी मी इतका प्रभावित झालो की, मी श्यामरावांची माहिती अधिकाधिक जमवू लागलो आणि जसजशी मला जास्त माहिती मिळू लागली तसतसा मी अजूनच प्रभावित होत गेलो. हा माणूस खरोखरच ग्रेट आहे याची मला साक्ष पटली.

श्री. श्याम मराठे यांचे अमेरिकेमधील अनेक शास्त्रज्ञांनी जेव्हा स्वागत केले तेव्हा अनेक भारतीयांचे त्यांच्याकडे प्रथम लक्ष गेले.

अमेरिकेतल्या कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या डॉ. स्मिथ या डायरेक्टरांनी मराठेंना असे आवाहन दिले की, आमच्याकडे येऊन आपण द्रुतगणिताचे प्रयोग करून दाखवावेत, आमचे तज्ज्ञ आणि कॉम्प्युटर आपली परीक्षा घेतील ! हे डॉ. स्मिथ म्हणजे कोणी साधी असामी नव्हे ! गेली बरीच वर्षे ते द्रुतगणित व त्याच्या पद्धती यावर संशोधन करत आहेत.

मराठेंनी आव्हान स्वीकारले. काय होईल ते होईल. त्यांनी जायचा निश्चय केला आणि केवळ दोन महिन्यात मराठे डॉ. स्मिथ यांच्यापुढे येऊन उभे राहिले !

त्यानंतर सहा दिवस मराठे यांची चांगलीच उलटतपासणी झाली. एका बाजूला डॉ. स्मिथ यांचे चार – पाच सहकारी व त्यांनी एक महिनाभर आधीपासून करून ठेवलेली क्लिष्ट उदाहरणे आणि कॉम्प्युटर, तर दुसऱ्या बाजूला एक मध्यमवयीन, किंचित ढगळा ड्रेस घातलेले, एक हात पोटाला चिकटवून बोलण्याची सवय असलेले, भारतीय गृहस्थ मराठे आणि त्यांच्या सोबत फक्त खडू आणि फळा ! परंतु त्यांनी अनेक वेळेला मनातल्या मनात उदाहरण सोडवून कॉम्प्युटरला सुद्धा मागे टाकले ! काही काही उदाहरणे तर इतकी मोठी होती की, ती कॉम्प्युटरला तपासायला देताना सुद्धा दोन टप्प्यांमध्ये द्यावी लागली.

शेवटी डॉ. स्मिथ यांनी असा निष्कर्ष काढला की, श्री. श्याम मराठे हे जगातील पहिल्या चार द्रुतगणितींपैकी एक आहेत. (डॉ. स्मिथ यांनी यापूर्वी जवळजवळ शंभर द्रुतगणितींची कसोटी घेतलेली होती.) त्यातले इतर तिघे म्हणजे–१) शकुंतलादेवी २) नेलसन ३) मॉरिस डॉगबर्ट.

यानंतर मराठे यांनी अमेरिकेमध्ये बरेच कार्यक्रम केले. त्यांचे तिथे प्रचंड कौतुक झाले जेम्स प्रेस नावाचे एक पंडित तर म्हणाले, 'ज्याप्रमाणे काही लोक एका दृष्टिक्षेपात एक पॅरेग्राफ वाचू शकतात त्याप्रमाणे श्री. मराठे एका दृष्टिक्षेपात एक गणित सोडवत असावेत !'

मराठे यांनी नॉर्थाप, स्टॅनफोर्ड, नेवाडा इ. विद्यापीठांमध्ये आपले कार्यक्रम केले. डॉ. जॉन डी फिलिप हे सध्याचे अमेरिकेतले प्रमुख गणितींपैकी एक. त्यांनी तर असे म्हटले 'श्री. मराठे यांचे गणिताचे जग वेगळे आहे. ते नुसते शॉर्टकट घेत नाहीत तर त्यामागे काही तंत्र आहे. ते भारतीय तंत्र आहे. हे तंत्र आपण यापूर्वीच का आत्मसात केले नाही याचे मला नवल वाटते !'

आणि आता इथे आपल्या भारतीयांची वृत्ती दिसते. जेव्हा श्री. श्यामरावांचे परदेशात कौतुक झाले, नाव झाले, गौरव झाला तेव्हा आपले डोळे उघडले. 'अरे, हा आपला वाटतं ? वा, एवढा मोठा झाला, मग आम्हाला कळलं कसं नाही ?'

कसं कळणार ? जोपर्यंत परदेशात एखादी गोष्ट मान्यता पावत नाही, तोपर्यंत आपण

तिचा स्वीकार करायला धजतच नाही!

असो. मराठेंचे अमेरिकेत टी. व्ही. वर सुद्धा काही कार्यक्रम झाले. त्या कार्यक्रमात त्यांनी अमेरिकन जनतेला छान कोपरखळी दिली आहे. एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, 'मला खरं म्हणजे ॲव्हरेज ब्रेन आहे; परंतु तुमची वर्तमानपत्रेच असं म्हणतात की सरासरी बुद्धीला येऊन पोचलेला हा पहिलाच माणूस आहे!'

आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळालेले हे गृहस्थ साताऱ्याला रहातात असे मला कळल्यावर मी लगेच त्यांना भेटायला साताऱ्याला गेलो. म्हटलं 'माणूस'चा 'सर्चलाईट' साताऱ्याकडे वळवावा...

¤

मुक्काम सातारा. वेळ रात्री आठ. एल. आय. सी. ऑफिसरांच्या कॉलनीमधल्या एका फ्लॅटमध्ये मी बसलो होतो. उद्देश-मुलाखात, एका मोठ्या द्रुतगणितीची. मनात, माझी कुठे उलटतपासणी होईल का काय? अशी भीती. एवढ्यात मराठेसाहेब आले. सुरुवातीला ओळख-पाळख झाल्यावर ते मुलाखतीस लगेच तयार झाले. प्रथमच मला त्यांचा एक गुण जाणवला. तो म्हणजे नम्रता. गर्वाचा, मोठेपणाचा लवलेश नाही!

डोळ्यांवर चष्मा, ढगळे कपडे, एक हात पोटाला चिकटवून बोलायची विशिष्ट ढब. बोलताना पहिलं वाक्य किंचित अडखळत बोलणार. बहुधा पुढे जे काय बोलायचे ते ठरवण्यासाठीच ते असे अडखळत असावेत. घर व्यवस्थित लावलेलं, बसायच्या खोलीमध्ये एक मोठे पुस्तकांचे रॅक संपूर्णपणे गणिताच्या पुस्तकांनी भरलेले होते.

आमचा संवाद चालू झाला. प्रथम काही तरी सुरू करण्यासाठी मी प्रश्न विचारला—

**मराठेसाहेब, आपणास लहानपणापासूनच गणिताची आवड होती, का काही विशेष प्रसंग घडून आपल्याला गणित आवडायला लागला?**

: मला लहानपणापासून गणिताची आवड होती. मला आकडे मित्राप्रमाणे वाटत. मला आठवतं मी १११×१११ हा गुणाकार तोंडी सोडवून आमच्या चौथीमधल्या शिक्षकांना चकित करून टाकलं होतं.

**: हे द्रुतगणित किंवा वेगाने केलेली आकडेमोड आपण कोणाकडून शिकलात? याचा श्रीगणेशा कसा झाला?**

: आमच्या घरी लहानपणी एक पाहुणे आले होते. त्यांनी मला गणितातल्या चार दोन गमती सांगितल्या. त्या मी दुसऱ्या दिवशी शाळेत करून दाखवल्या. सगळेच मित्र एकदम आश्चर्यचकित झाले. सरांनी कौतुक केलं आणि मग मला अशा गमती सूत्रं, जमवायचं वेडच लागलं. ज्याप्रमाणे लोक स्टॅम्प्स्, नाणी वगैरे जमवतात त्याप्रमाणे मी ही गणिती सूत्र जमवू लागलो.

**लहानपणी खरं म्हणजे माणसाला आकड्यांची जरा भीतीच वाटत असते. मला अजूनही वाटते. आपल्याला अशी भीती वगैरे वाटली नाही?**

: नाही. उलट मला आकड्यांबद्दल आकर्षणच आहे. होतं., मी स्वतः तीसच्या पुढचे पाढे पाठ केले होते.एकदा तर गंमतच झाली. मी वर्गात सरांना एकदम ९१ चा पाढा धाडधाड म्हणून दाखवला. कल्पना करा. त्या सरांचा चेहरा कसा झाला असेल? खरं म्हणजे मी काही फार वेगळं केलं नव्हतं. मी नऊचा पाढा म्हणून त्यासमोर जितक्यानं गुणायचं तो आकडा म्हणायचो. म्हणजे समजा ९१ आठे = ७२८, तर नवा आठा बहात्तर आणि पुढे फक्त आठ लिहायचे; पण ऐकणारा एकदम चकित होऊन जातो!

**छोट्या आकड्यांचे गुणाकार जरी करायचे असले तरी ते आम्हाला मनातल्या मनात करता येत नाहीत. आपण तर बारा बारा आकडी संख्यांचे गुणाकार-भागाकार चुटकीसरशी मनात सोडवता. हे कसं शक्य होतं?**

: माझ्याजवळ आकड्यांच्या वैशिष्ट्यांचा आणि परस्पर नात्यांचा मोठा लवाजमा आधीच तयार झालेला आहे. त्यामुळे बहुतेक गणितात त्यातला बराचसा मोठा भाग तयारच मिळतो. उदा. $९^२=८१$ आणि $९९^२=९८०१$ हे मला आधीच माहीत असते. त्यामुळे $९९९^२=९९८००१$ हे उत्तर मी वरील ज्ञानाचा उपयोग करून बरोबर देऊ शकतो. म्हणजे असं की, नऊच्या वर्गामध्ये आठ आणि एक हे आकडे आहेत. ९९ च्या वर्गामध्ये ८ च्या आधी आणि नंतर अनुक्रमे ९ आणि ० हे आकडे येतात. त्यामुळे ९९९ हा आकडा घेतला की ८ च्या आधी दोन वेळेला ९ व नंतर दोन ० घातली की उत्तर मिळते. थोडक्यात संख्यांच्या परस्परांशी असलेल्या नात्यांची मला जाण आलेली आहे.

**आपले शिक्षण किती झालेले आहे?**

: मी बी. ए. बी. कॉम. एलएल. बी. झालेलो आहे.

**मग आपण बी. ए. गणितामध्येच झालेले असाल?**

: साफ चूक. मी अर्थशास्त्रामध्ये पदवी घेतलेली आहे.

**म्हणजे गणितात आपण कोणतीच पदवी घेतली नाही?**

: नाही. कारण छंद म्हणून मी एखादा विषय घेतला तरच मी त्या विषयाला अधिक न्याय देऊ शकेन असे मला वाटते. आणि रूढ शिक्षणाच्या चाकोरीमध्ये अडकून बसायची माझी तयारी नव्हती आणि नाही. उपलब्ध ज्ञान मी निश्चितपणे प्राप्त केले आहे. पण त्यात परीक्षा देण्याचा माझा उद्देश नाही.

**थोडं विषयांतर करतो, आपण गणिताच्या पद्धतीवर काही संशोधन वगैरे केलं आहे का?**

: मी गणनाच्या (कॅल्क्युलेशनच्या) अनेक पद्धती विकसित केलेल्या आहेत. या पद्धती मुळात गोवर्धनपीठाच्या शंकराचार्यांच्या! त्यांचे वैदिक गणित हे पुस्तक वाचल्यावरच मला खरी दिशा सापडली. खरं तर या विकसित केलेल्या पद्धतींचे श्रेय मी माझ्याकडे घेतच नाही. माझं असं मत बनलेलं आहे की, शंकराचार्यांना या सर्व पद्धती आधीपासूनच अभिप्रेत असाव्यात!

**आपण आकड्यांशी ओळख असल्याचे सांगता किंवा आकडे तुमच्या लक्षात राहतात, असे म्हणता. आपण पुण्यातल्या पुस्तकांच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमाला ४६ आकडी संख्येचे २३ वे मूळ काढले होते. त्यामध्ये काही क्लृप्ती वापरली होती का?**

आहो, मी पहिले तीन आकडे आणि शेवटचा आकडा पाहिला. आता त्या दिवशीच्या उदाहरणात पहिल्यांदा ३७९ हा आकडा होता आणि शेवटी १ हा आकडा होता. आता ३७९ हा आकडा २७० आणि ५९० च्या मध्ये येतो. ५९० ने सुरुवात असल्यास मूळ संख्या ८० असते व २७३ ने सुरुवात असल्यास मूळ संख्या ७० असते हे मला आधीच माहिती होतं. त्यामुळं

आपले उत्तर ७० ते ८० च्या मध्य आहे हे मी लगेच ओळखले. आता मला अजून एक गोष्ट माहिती होती, एकं स्थानी जर ५, ६, ९ हे आकडे असतील, तर तेविसाव्या घातातसुद्धा तोच आकडा शेवटी येतो.

**हाच प्रश्न जर कॉम्प्युटरला करायला दिला तर तो किती वेळात सोडवेल ?**

वरील उदाहरण कॉम्प्युटरला देण्यासाठी किमान तीन हजार छिद्रपत्रिका (पंच-कार्डस्) कराव्या लागतील. यावरूनच एकूण वेळाचा अंदाज बांधावा.

**आजच्या या कॅल्क्युलेटर्सच्या युगात तोंडी आकडेमोड जवळजवळ कोणीही करतच नाही. जे काम कॅल्क्युलेटर विनासायास आणि सहज लवकर करतो, त्या कामासाठी किचकट आकडेमोडी कागदावर करत बसण्याची काय गरज आहे ? म्हणजे ही गणनशक्ती हवीच कशाला ?**

औद्योगिक क्रांतीने स्नायूंचे महत्त्व कमी केले. त्याचप्रमाणे कॉम्प्युटरक्रांतीने गणनशक्तीचे म्हणजे बुद्धीचे चापल्य कमी केले, असं म्हणण्याची एक पद्धत आहे; परंतु औद्योगिक क्रांतीने खरच स्नायूंचे महत्व कमी केले का ? हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही. औद्योगिक क्रांतीने जीवनपद्धती मात्र नक्की बदलली गेली. कॉम्प्युटर–क्रांतीबद्दल मात्र असं म्हणता येणार नाही. कॉम्प्युटर हे मूलतः आकडेमोड करण्याचे एक साधन आहे. त्याच्यामध्ये मानवी शक्तीच्या किती तरी पट शक्ती आणि वेग आहे; परंतु कॉम्प्युटर विचार मात्र अजिबात करू शकत नाही. कोणी तरी म्हटलंच आहे की, कॉम्प्युटरचा विचार हा अडाण्याचा विचार आहे. तो फक्त दिलेल्या सूचना पाळतो. उदाहरणच द्यायचं झालं तर माणूस आणि कॉम्प्युटर दोघेही बुद्धिबळ खेळू शकतात. कॉम्प्युटर हा मानवी बुद्धिबळपटूपेक्षा जास्त वेगाने जास्तीत जास्त खेळींचा अंदाज घेऊन एक अंतिम खेळी निश्चित करू शकेल; पण मानवी बुद्धिबळपटू एखादी नवी खेळी जन्माला घालू शकेल. त्याचे नवीन नियम तयार करू शकेल.

ही नवनिर्मिती कॉम्प्युटरच्या कक्षेतच येत नाही. ही नवीन खेळी सारी परिस्थिती बदलू शकेल. त्या बदलत्या परिस्थितील तोंडही निदान त्या 'तयार' कॉम्प्युटरला देता येणार नाही.

ही नवनिर्मितीची क्षमता जशी शास्त्रात आणि कलेत आहे तशीच गणनातही आहे. खरा धोका कॉम्प्युटरमध्ये नाही; परंतु त्याला जे आपण अवास्तव महत्त्व देतो त्यात आहे.

जेव्हा ही मानवी बुद्धीची वाढ थांबेल–ती कधीच थांबणार नाही हा माझा विश्वास आहे–तेव्हा आपण या कॉम्प्युटरचे किंवा कॅल्क्युलेटरचे गुलाम झालेलो असू !

**आपल्या मघापासून चाललेल्या भाषणावरून असे दिसून येते की, आपण आणि आपले आयुष्य संख्यामय झालेलं आहे.**

(हसत) अहो, तुम्हाला खोटं वाटेल. माझ्या मुलीचं सुद्धा नाव मी संख्याच ठेवलेलं आहे !

**शंकराचार्यांनी एकूण सोळा पुस्तकं लिहिली होती. त्यातील एकच प्रकाशात आले आहे व बाकीच्या पुस्तकांची हस्तलिखिते अजून तरी अज्ञानात आहेत असे म्हणतात. याविषयी आपले काय म्हणणे आहे ?**

या संदर्भात मी माझे बडोद्याचे स्नेही प्रा. विजय साने यांच्या कष्टांचा उल्लेख करू इच्छितो. त्यांनी गुजरात, राजस्थान व दिल्ली येथे हिंडून याविषयी बरीच माहिती मिळवली आहे. दुर्दैवाने हे साहित्य आता उपलब्ध होऊ शकणार नाही या निष्कर्षाप्रत ते जवळजवळ आले आहेत. माझा मात्र या विषयाबाबत दृष्टिकोण थोडा वेगळा आहे. माझ्या मते स्वामीजींनी एक सोळांशसूत्रं लिहून पंधरासोळांश सूत्रं विकसन करण्यासाठी गणित–रसिकांना दिली आहेत. त्यांची पद्धती ही आम्हा लोकांना एक दिशाच आहे.

**या विषयावर आपण पुढे काय करू इच्छिता ?**

माझे सारे कार्य म्हणजेच स्वामीजींच्या सूत्रात लपलेल्या संशोधनबीजांना खत–पाणी घालून अधिक फुलविणे. त्यामुळे मला जे जे काही नवीन सापडले ते ते सारे या मूळ सूत्रांना फुटलेले नवीन अंकुरच आहेत असे मला वाटते.

यानंतर, अचानक गरम कांद्याच्या भज्यांचा वास येऊ लागला. त्यामुळे आमचे बोलणे गणितावरून भज्यांवर गेले ते वाचण्यात आपणास रस नक्कीच नसेल ! □




# ‘टू हेल विथ हॉकी’

भारताचा ऑलिंपियन हॉकीपटू अस्लम शेरखानचं हे आत्मचरित्र आहे. मागच्या अंकात याचा पहिला भाग दिला. या अंकात पुढील भाग–दुसरा. पुस्तकातले शब्द आहेत अस्लमशेरखानचे आणि लेखणी मतीनखानची !

अस्लमशेरच्या प्रवाही निवेदनशैलीतील सहजता हे या पुस्तकाचं वैशिष्टच.

त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे भारतीय हॉकीबद्दलच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं या आत्मचरित्रात सापडतात.

**इंग्रजी शब्दांकन : मतीनखान**

**मराठी रूपांतर : द्वारकानाथ संझगिरी**



**कोलालंपूर १९७५ – दमछाक झालीय पण विजयाच्या धुंदीत ती जाणवली तर !**

एर्नाकुलमवरून परतल्यावर काही दिवस मी आजारपणाचं ढोंग करून घरी बसलो. तसं करणं मला भागच होतं. नाही तर अम्मानं हॉकी खेळाल्याशिवाय मला स्वस्थ बसूच दिलं नसतं.

पण काही दिवसांतच माझ्या आजारपणाच्या ढोंगाचा तिला पत्ता लागला. ती जवळजवळ अंगावर खेकसलीच–

‘मला माहितीय तू आजारी नाहीस. तुझं ढोंग मी चालू देणार नाही. माझ्या मुलाला मी ढोंगी बनू देणार नाही. तुला हॉकी खेळ-लंच पाहिजे !’

माझा नाइलाज झाला. हॉकीचा तर मला तिटकारा आला होता. त्यामुळं मी नवीन आयडिया काढली. मी रोज संध्याकाळी घरातून बाहेर पडायचो आणि माझे चाचा हमीदशेरखान ह्यांच्या घरी जाऊन बसायचो. तिथे माझा चुलतभाऊ तौफिकशेरखान मला अलिगड विद्यापीठाचं आमिष दाखवायला लागला. त्याने तिथे ‘खेळाडू’ म्हणून प्रवेश मिळवला होता. त्याने सतत माझ्यापाठी घोशा लावला की तू अलिगडला चल. तिथे तुला हॉकीपटू म्हणून प्रवेश मिळेल...फीसुद्धा माफ होईल आणि वर हॉकीचं सर्व सामान मिळेल !...

ऑफर चांगलीच होती; पण तरीही जायला मन घेत नव्हतं. कारण चुलतभावाच्या आधाराने उध्वस्त झालेली करिअर पुन्हा उभारणं आईला आवडलं नसतं. माझ्या वडलांनाही कुणाच्या मद-तीनं किंवा वशिल्यानं उभं रहाणं पसंत नव्हतं ..

तरीही मनाचा हिय्या करून मी आईला त्यासंबंधी विचारलं... पण तिने स्पष्टपणे सांगितलं ‘दुसऱ्याच्या खांद्यावरून बंदूक चालवणं मला पसंत नाही !’

¤

असेच काही दिवस गेले आणि मग हळूहळू पटायला लागलं की ; हाती आलेली ही सुवर्णसंधी दवडता कामा नये...मनातल्या मनात अलिगडला जाणं मी पक्कं केलं होतं ..इतक्यात पुन्हा एकदा माझ्या करिअरला नाट्यपूर्ण कलाटणी मिळाली ..

एके दिवशी, मशिदीतून बाहेर पडून नेहमीप्रमाणे तौफिककडे जायला निघालो होतो. इतक्यात मशिदीच्या बाजूच्या मोकळ्या जागेत एक लाकूडतोड्या लाकडं तोडताना दिसला...

दुपारची वेळ होती. त्याच्या अंगातून घामाच्या धारा बाहेर पडत होत्या. त्या घामामुळं त्याचं शरीर उन्हात चक्क चमकताना दिसत होतं. माझं लक्ष त्याच्या हाताच्या स्नायूंकडे गेलं. प्रत्येक फटका मार-ताना, त्याचे ते भरदार स्नायू दिसायचे ..मला वडलांची आठवण आली...हॉकी सोडल्यावर शरीरसंपदा राखण्यासाठी ते काही वेळा लाकडं तोडत असत ..त्या दिवशी तौफिककडे जाण्याऐवजी मी त्या लाकूडतोड्याकडेच थांबलो ..त्याची आणि माझी तशी जान–पहचान होतीच. त्यामुळे ‘जरा कुऱ्हाड इकडे दे, मी तोडून पहातो’ म्हटल्या-वर त्याने ताबडतोब कुऱ्हाड माझ्या हातात दिली...

दोन–चार फटके मारल्यावरच माझ्या लक्षात आलं की, तंत्र कुठे तरी चुकतंय...ताकद लावून फटके मारूनही लाकडाचा साधा कप-चाही उडत नव्हता...त्या लाकूडतोड्याला माझे हाल बघून हसू फुटलं...त्याने मला मंत्र दिला...

‘एकदा उजवीकडून झोका दे आणि एकदा डावीकडून दे’ तो म्हणाला...

आणि जादूची कांडी फिरल्यागत तुकडे उडायला लागले...मग माझा आत्मविश्वास वाढला आणि मी लाकडं तोडण्यात रंगून गेलो. इतका रंगलो होतो की, माझ्या मागे एक मोटरसायकल उभी राहिली, त्यावरून एक माणूस उतरला वगैरे कशाचं मला भान नव्हतं...

'बघा, बघा अहमदशेरखानचे सुपुत्र ऑलिपियन व्हायच्याऐवजी लाकूडतोड्या होऊ पहातायत !' असा टोमणा अर्धवट ऐकला आणि माझी एकाग्रता भंग पावली.

मी मागे वळून पाहिलं तर ऐटीत एका लाकडाच्या ओंडक्यावर पाय ठेवून गुफ़ान आझम उभा होता...

## तुझे गुण फुकट जाणार नाहीत !

गुफ़ान आझम हे आमच्या सैफिया कॉलेजचं बडं प्रस्थ ! खेळाडू, क्रीडाविकासासाठी झटणारा, विद्यार्थी-नेता... अगदी 'सबकुछ' तो होता ! धडाडीचा, डेअरिंगबाज वगैरे असल्यामुळं शिष्यगणही बराच जमवला होता. सदान् कदा तो मुला-मुलींच्या घोळक्यात असायचा. त्याच्याच प्रयत्नामुळे अलिगड विद्यापीठाप्रमाणेच सैफिया कॉलेजमध्ये खेळाडूंना निव्वळ क्रीडागुणांवर प्रवेश मिळत होता. त्यांना फी माफ होती...शिष्यवृत्ती मिळायची...खेळाचं सामानही मिळायचं...

मी चेहरा टाकून त्याच्यापुढे उभा राहिलो...त्याच्या नजरेला नजर देणं टाळलं आणि दबलेल्या आवाजात म्हणालो, 'मला यापुढे कधीही हॉकी खेळायची नाही !'

तो लगेच गरजला, 'पळपुटे कधी जिंकत नसतात आणि जिंकणारे कधी पळत नाहीत !...

तुला माहितीय की माझ्यापासून काही लपून राहू शकत नाही... मला सर्व काही कळलंय...

पण मी जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत तुला काही काळजी करण्याचं कारण नाही... तुझ्या गुणवत्तेची मी राखरांगोळी होऊ देणार नाही !'

मी त्याला खूप समजवण्याचा प्रयत्न केला की, हॉकी वेगवेगळ्या क्लब्जच्या कचाट्यात आहे आणि कुठल्याही क्लबमध्ये गेलो तरी विकृत मंडळींना तिथे तोटा नाही. मग मी जाणार तरी कुठे ?

'सैफिया कॉलेजला' तो तत्काळ म्हणाला, 'हे बघ, मला मान्य आहे की, हॉकीचे क्लब घाणेरडे आहेत. तिथे विकृत मंडळी भरलीयेत; पण अशा वेळी यंत्रणेविरुद्ध लढायचं असतं की पळायचं असतं ... ? आपल्याला ह्या क्लब्जच्या मगरमिठीतून हॉकीला सोडवायचंय...

हे बघ, मी तुला आता वचन वगैरे काही देत नाही. फक्त एवढंच सांगतो की, तू मला भावासारखा आहेस आणि तुझी गुणवत्ता मी फुकट जाऊ देणार नाही.'

त्या दिवशी रात्री जेवण वगैरे आटोपल्यावर मी तौफिकला स्पष्टपणे सांगितले की, मी अलिगडला जाणार नाही!... त्याऐवजी सैफिया कॉलेजमध्ये प्रवेश घेणार! 'आणि तसाच तडक गुफ़ानच्या घरी गेलो.

गुफ़ान आणि त्याच्या काही दोस्तांनी आमच्या इथल्या मोती मशिदीजवळ एक चहाचं दुकान चालवलं होतं. दुकान चहाचं असलं तरी कार्य चालायचं खेळाडूंच्या उद्धाराचं ! विश्वास बसणार नाही; पण इथेच भारतीय हॉकी फेडरेशनचे अध्यक्ष अश्विनीकुमार ह्यांच्या विरुद्ध बंडाचा झेंडा उभारला गेला. ह्या फेडरेशनने भोपाळच्या हॉकीपटूंवर नेहमीच अन्याय केलाय. लतिफ उर रेहमान आणि अख्तर हुसेन हे भारतीय संघातर्फे ऑलिंपिकला गेलेले शेवटचे भोपाळचे हॉकीपटू आणि ते किती साली गेले होते ठाऊक आहे ? १९४८ साली. लंडन ऑलिंपिक्सला... अर्थात त्यांना संघात स्थान दिलं गेलं नव्हतंच म्हणा. आमच्या इनामला हॉकी जाणणारी मंडळी, भारतातला आजतागायतचा सर्वश्रेष्ठ 'इनसाईड-लेफ्ट' मानायचे; पण १९६०-६२ च्या सुमारास मोहन बगानतर्फे प्रेक्षकांचे डोळे दिपवणारा आणि प्रतिस्पर्ध्यांचे डोळे पांढरे करणारा खेळ खेळूनही १९६४ साली टोकियो ऑलिंपिक्सला इनामला नेलं नव्हतं.

भोपाळच्या हॉकीवर्तुळात खदखदत असलेल्या अन्यायाला वाचा फुटली १९६८ साली ! त्या वर्षी इंडियन एअर लाइन्सने हॉकीचा संघ उतरवायचं ठरवलं. त्यांनी आमच्या भोपाळच्या सात खेळाडूंची निवड केली. इनामला कर्णधार केलं आणि त्या वर्षी जवाहरलाल नेहरू स्पर्धेत इतर संघांची धूळदाण उडवली. त्यांच्या शॉर्ट पासिंग, चेंडूवरचा ताबा, प्रतिस्पर्ध्याला जाळ्यात अडकवण्याची किमया वगैरे गुणांवर प्रेक्षक, क्रीडातज्ज्ञ, क्रीडापत्रकार वगैरे मंडळी बेहद्द खूष झाली. इतकी वर्षं जाणून-बुजून लपलेली गुणवत्ता चक्क उजेडात आली... वर्तमानपत्रात त्यांची बाजू मांडण्यात आली आणि जवळजवळ २० वर्षांनी भोपाळच्या खेळाडूंचा मेक्सिकोला पाठवलेल्या ऑलिंपिक संघात समावेश झाला ! तो खेळाडू इनाम उर रहमान होता हे सांगायची गरज नाही ! अर्थात पुन्हा प्रत्यक्ष सामन्याच्या वेळी मात्र त्याला बाजूला काढण्यात आलं...

पण इनामच्या निवडीमुळं हॉकीमधल्या पंजाबी वर्चस्वाला जबरदस्त धक्का बसला. तोपर्यंत हॉकीमध्ये फक्त पंजाबी खेळाडूंचं राज्य होतं. भारतीय हॉकी संघ ही पंजाब्यांची खाजगी मालमत्ता झाली होती. इतर प्रांतातल्या खेळाडूंना चंचुप्रवेश करणंही कठीण झालं होतं. आता इतरांसाठीही दरवाजे सताड उघडले गेले !

## यादीतलं एकमेव नाव होतं ते !

इंडियन एअरलाइन्समध्ये भोपाळच्या खेळाडूंना नोकरी मिळवून देण्यात गुफ़ानचा वाटा सिंहाचा होता. भोपाळचे खेळाडू निव्वळ पैशासाठी इंडियन एअरलाइन्समध्ये शिरत नव्हते. त्या काळात आजच्यासारखा तिथे लठ्ठ पगार मिळत नव्हता. काही जणांनी तिथे हमालीसुद्धा केलीय. गुफ़ान म्हणतो, 'तुटपुंज्या पगारावर त्यांनी नोकरी स्वीकारली. कारण 'हॉकी' त्यांना धर्म वाटत होता. त्यांच्या संघातून खेळून आम्ही इतरांपेक्षा जास्त चांगल्या दर्जाचे खेळाडू आहोत हे दाखवण्याची जिद्द होती !'

दुसऱ्या दिवशी मी सैफिया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तरीही माझा वनवास काही संपला नाही. आजपर्यंत माझ्या आयुष्यात कुठलीही गोष्ट सरळसोट, अडथळे न येता झालेली नाही. सतत आपली अडथळ्यांची शर्यत सुरूच !

तिथे सुरुवातीला ज्येष्ठ खेळाडूंना मला त्रास दिला. माझ्याशी ते फटकून वागत; पण मला गुफ़ानचा आधार असल्यामुळं त्यांची मात्रा चालत नसे.

नंतर पुन्हा माझ्या जुन्या सांधेदुखीनं डोकं वर काढलं. तिकडे 'ऑल इंडिया ओबादुल्लाखान गोल्ड कप' स्पर्धेचं सिलेक्शन जवळ आलेलं आणि इकडे माझ्या पायाच्या सांध्यांनी मला जर्जर करून सोडलं. त्याचा इतका त्रास व्हायला लागला की, मला संघात घेऊ नये ह्याबाबत गुफ़ान सोडून सर्वांचं एकमत झालं. सैफिया एज्युकेशनल ट्रस्टच्या सेक्रेटरीनं तर त्याबाबत गुफ़ानला समजवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला; पण गुफ़ान ऐकायला तयार नव्हता. शेवटी फक्त गुफ़ानच्या हट्टाखातर माझा संघात समावेश करण्यात आला. सुदैवानं त्या स्पर्धेत माझा खेळ चांगला झाला आणि गुफ़ाननं दाखवलेल्या विश्वासास मी पात्र ठरलो.

त्यानंतर मद्रासला एम. सी. सी. गोल्ड कप स्पर्धा झाली. तिथे एकदा सराव संपल्यावर गुफ़ाननं मला बाजूला घेतलं आणि सांगितलं की, मी आघाडीच्या फळीऐवजी बचावाच्या फळीत खेळावं. माझ्या वडलांनीही लहानपणी तोच उपदेश केला होता; पण आघाडीच्या फळीत राहून गोल करण्यात एक वेगळीच मजा असते. एक गोल मारणाऱ्या खेळाडूला जेव्हढा 'भाव' मिळतो, तेव्हढा शंभर गोल प्राणपणाने अडवणाऱ्याला मिळत नाही; पण गुफ़ानला मी



अस्लम आणि सुरजितमधला एक ' टेन्स ' क्षण...
' रेने फ्रँक हॉकी टूर्नामेंट 'च्या अंतिम फेरीत
भारत विरुद्ध स्पेन

नाही म्हणू शकत नव्हतो. त्याच्याच आधाराने तर मी एकएक पायरी वर चढत होतो.

नंतर आंतरविद्यापीठ–स्पर्धा आली ... आमचं सैफिया कॉलेज विक्रम विद्यापीठाच्या कक्षेत येतं. विद्यापीठाच्या कोच कमार (Qamar) ने गुफ्रानकडे सैफिया कॉलेजच्या गुणवान खेळाडूंची नावं मागितली ... गुफ्रानने त्याला यादी दिली. त्या यादीत फक्त एकच नाव होतं ' अस्लम शेरखान ! '...

नाव वाचून कमार उडलाच. तो सरळ गुफ्रानला म्हणाला, ' तू घोडचूक करतोयस ... अरे, ह्या कालच्या छोकऱ्याकडे मोठ्या सामन्याला लागणारं टेंपरामेंट कुठे असणार ? त्याच्यापेक्षा किती तरी अनुभवी खेळाडू कॉलेजच्या संघात आहेत ' पण गुफ्रान आपला हेका सोडायला तयार नव्हता ... त्याने कमरलाच सुनावलं –

' तरुण रक्ताला वाव मिळालाच पाहिजे. त्याशिवाय प्रगती होणं शक्य नाही. '

वर असंही बजावलं – ' जर अस्लमला घेतलं नाहीत तर सैफिया कॉलेजचा एकही खेळाडू ह्यापुढं विक्रम विद्यापीठासाठी खेळणार नाही ! '

गुफ्रानने ' आवाज दिल्यावर ' कमार काही करू शकत नव्हता. विद्यापीठाच्या संघात माझा समावेश झाला ...

## मी स्वप्न बघायला लागलो !

सामने सुरू होण्यापूर्वी गुफ्रानने माझं बौद्धिक घेतलं ... मला म्हणाला, ' वडलांचा लौकिक, माझ्याबद्दल तुला असलेला आदर वगैरे सर्व विसरून जा ! कसलंही दडपण मनावर ठेवू नकोस. फक्त एव्हढंच लक्षात ठेव की, तू एक खेळाडू आहेस आणि भारतीय संघातर्फे ऑलिंपिक्समध्ये खेळणं हे तुझं ध्येय आहे ... तरुण खेळाडूतही गुणवत्ता ठासून भरलीय हेच तुला फक्त दाखवायचंय ! ... इट् इज् नाउ ऑर नेव्हर ! '

दिल्लीला जवाहरलाल नेहरूस्पर्धेत मी सैफिया कॉलेजतर्फे खेळलो ... त्या वेळी आम्ही नॅशनल स्टेडियममध्ये रहात होतो. गुफ्रान आमच्या संघाचा मॅनेजर होता. तिथे एका शुक्रवारी मशिदीतून आमची प्रार्थना आटपून परतलो तर खोलीत कॉटवर गुफ्रानबरोबर दोन सद्गृहस्थ बसलेले ...

' हे इंडियन एअरलाइन्सचे के. पी. रॉय ' त्यापैकी एकाची गुफ्रानने माझ्याशी ओळख करून दिली. माणूस दिसायला हट्टाकट्टा होता. शरीरावरून मल्ल वगैरे असावा असं वाटत होतं. माझा अदाज अचूक ठरला. लंडन ऑलिंपिक्समध्ये भारतीय मल्लांचं त्यानं नेतृत्व केलं होतं ... आता तो इंडियन एअरलाइन्समध्ये स्पोर्ट्स्–ऑफिसर होता ...

गुफ्रानने मला सांगितलं की, ' ही मंडळी तुझ्याकडे नोकरीची ऑफर घेऊन आलीयत ... मला आश्चर्याचा सुखद धक्का बसला. देहभान विसरून तिथल्या तिथे मी स्वप्न पहायला लागलो ...

... इनाम, अशोककुमार, गोविंदा वगैरेंबरोबर मी स्वतःला हॉकी खेळताना पाहू लागलो ... काही क्षण मी विमानातही बसून आलो. त्या वेळी विमानप्रवासाचं आकर्षणही फार मोठं होतं ...

रॉय गेल्यावर गुफ्रान मला म्हणाला, ' तुझं भवितव्य उज्ज्वल आहे असं त्यांना वाटतंय ... पण तू एव्हढ्यात नोकरीच्या भानगडीत पडू नकोस ... ते पुन्हा येतीलच ! '

मी हिरमुसलो. गुफ्रानबद्दल जरी मला आदर असला तरी त्याला माझ्या गुणवत्तेबद्दल जेव्हढा विश्वास वाटत होता तेव्हढा मला स्वतःला वाटत नव्हता. पुन्हा अशी संधी येईल का ह्याची काळजी वाटत होती.

पण पुन्हा एकदा गुफ्रान द्रष्टा ठरला ! दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात, पाकिस्तानदौऱ्यावर जाणाऱ्या भारतीय हॉकीसंघाच्या खेळाडूंची नावं झळकली होती ...

त्यात एक नाव होतं – ' अस्लम शेरखान. ' किती तरी वेळ मी त्या नावाकडे टक लावून पहात होतो. डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. आनंदाला पारावर उरला नव्हता ...

आणि हो, के. पी. रॉयही परतले ... इंडियन एअरलाइन्सला अस्लम शेरखान हवा होता ...

इंडियन एअरलाइन्स जॉइन करण्यासाठी मी दिल्लीला निघालो. त्या दिवशी ईदचा दिवस होता. ईदच्या दिवशी भोपाळमध्ये नुसता जल्लोष असतो. मुस्लिमांच्या खांद्याला खांदा लावून हिंदू मंडळीही ईदच्या उत्साहात सामील होतात. भोपाळच्या भर बाजारपेठेत जामा मशीद आहे. तिथे ईदच्या दिवशी हजारो भाविक नमाज पढायला येतात ... कित्येकांना रस्त्यावरच नमाज पढावा लागतो. आपल्या मुस्लिम बांधवांना त्रास होऊ नये म्हणून तिथले बहुसंख्य हिंदू कापडाचे व्यापारी चक्क रस्त्यावर कापड अंथरतात !

त्या दिवशी संध्याकाळी पक्षी आपल्या घरट्यात परतत होते आणि मी मात्र माझं घरटं सोडून दूर दिल्लीला जात होतो ... मी निघताना अम्माने डोळ्यांतल्या अश्रूंना महत्प्रयासानं आवरलं ... विरहाचं दुःख हृदयातच कोंडून ठेवलं. ' खुदा हाफिज ' एव्हढेच शब्द तिच्या मुखातून बाहेर पडले. टांगा वळण घेईपर्यंत मी तिच्या उंच

जाडजड आकृतीकडे पहात होतो ...

त्या दिवशी ग्रॅन्ड ट्रंक एक्सप्रेस नेहमीप्रमाणेच उशिरा आली. आल्याबरोबर तिसऱ्या वर्गाच्या स्लिपर कोचमध्ये मी सामान ढकललं आणि माझी जागा पटकावली.

झाशी येईपर्यंत गुडुप अंधार पडला होता ... संपूर्ण झाशी शहर अंधाराच्या पांघरुणाखाली शांतपणे झोपी गेलं होतं. आमच्या कंपार्टमेंटची अवस्थाही तीच होती ... माझा मात्र डोळा लागत नव्हता... भावी आयुष्याची गोड स्वप्नं पाहण्यात मी दंगून गेलो होतो ... तो विमानाचा प्रवास, ते मोठ्या हॉटेलात रहाणं, जेवण, मोठमोठ्या स्पर्धा ... एअरलाइन्समधले इतर खेळाडू जेव्हा त्या आयुष्याची धमाल सांगायचे, तेव्हा आम्हाला त्यांचा हेवा वाटायचा ... आता तेच आयुष्य माझी वाट पहात होतं...

## नशिबानं मला पुन्हा चकवलं...

तांबडं फुटायला आणि दिल्ली यायला एकच गाठ पडली...मोठ्या उत्साहात मी रिक्षा पकडून पार्लमेंटस्ट्रीटवरच्या एअरलाइन्सच्या ऑफिसात गेलो.. तिथे जाऊन पहातो तर दारावर मोठ्ठं कुलूप ! माझा मूर्खपणा माझ्या लक्षात आला. उत्साहाच्या भरात मी भल्या पहाटेच ऑफिसात जाऊन थडकलो होतो.

आता करायचं काय ? बॅग उचलली आणि करोलबागेत 'खानसाहेबांच्या' घरी गेलो...रामपूरचे माजो हॉकीपटू, अमीर अहमदखान हे आमचे खानसाहेब ! खानसाहेबांचं घर म्हणजे दिल्लीला आलेल्या हॉकीपटूंना फार मोठा आधार वाटायचा. 'आओ-जाओ घर तुम्हारा' असा मामला ! दुसरी जागा मिळेपर्यंत कित्येक वेळा हॉकीपटू खानसाहेबांकडेच वस्तीला असत.

आंघोळ वगैरे करून सकाळी बरोबर दहा वाजता मी पुन्हा एअरलाइन्सच्या ऑफिसात येऊन थडकलो. तोपर्यंत मी दाढी करायलाही सुरुवात केली नव्हती. के. पी. रॉयच्या चेंबरमध्ये वेगळंच वातावरण होतं. चक्क काव्यसंमेलन भरलं होतं. के. पी. रॉय हिंदी कविता ऐकवत होते आणि जमलेली मंडळी तल्लीन होऊन ऐकत होती. मीही त्यांच्यात सामील झालो...

'काव्यसंमेलन' आटोपल्यावर रॉय मला इंडियन एअरलाइन्स स्पोर्टस्बोर्डाचे जॉइंट सेक्रेटरी-'प्रसाद' ह्यांच्याकडे घेऊन गेले. प्रसादनी मला तत्काळ ॲपॉइंटमेंट-लेटर दिलं आणि ताबडतोब लखनौला एअरलाइन्सच्या प्रशिक्षणशिबिरात जाण्याचं फर्मान काढलं...दिग्विजय सिंगबाबू त्या वेळी कोचिंग देत होता.

एके काळी बाबूला ड्रिबलिंगमध्ये 'किंग' मानलं जायचं.

बाबूला ड्रिबलिंग शिकवताना पहाताना मला वडलांची याद यायची. माझे वडील एक-एक फुटाच्या अंतरावर विटा ठेवून ड्रिबलिंगचे धडे द्यायचे...बाबूंनी तसं काहीच केलं नाही. त्याची गरजही नव्हती. कारण बाबूच्या आणि माझ्या वडलांच्या शिष्यगणात जमीन-अस्मानाचा फरक होता...माझ्या वडिलांकडे नुकतीच हॉकी शिकायला लागलेली पोरं यायची...बाबूंकडे अनुभवी गुणी खेळाडू होते...

संध्याकाळी सरावाच्या वेळी डॉजिंग करताना बाबू मला अनेक वेळा चकवायचा आणि जवळजवळ प्रत्येक वेळी तो थांबवायचा एक जळजळीत नेत्रकटाक्ष टाकायचा आणि खेकसून म्हणायचा, 'अरे, जर तुला माझ्यासारख्या बुढ्ढ्याला रोखता येत नाही तर तू प्रतिस्पर्ध्यांच्या तरुण, पायांत वेग असलेल्या फॉरवर्डस्ना कसा रोखणार ?'

खरं म्हणजे मी मुद्दामहूनच स्वत:ला चकवून घेत होतो. मोठ्या व्यक्तींचा आदर करायची जी शिकवण माझ्या वडलांनी माझ्या नसानसात भरली होती त्याचा तो परिणाम होता; पण वर्ल्डकप ट्रायलच्या वेळी त्याने माझा खेळ पाहिल्यावर बाबूला ते उमगलं असावं. कारण तो रूपसिंगला म्हणाला, 'ह्या पोराला मी अनेकदा चकवलंय; पण हा आता बेफाट खेळतोय !'

पाकिस्तानच्या दौऱ्यासाठी निवड होऊनही मी पाकिस्तानला जाऊ शकलो नाही...पुन्हा एकदा दुर्दैव आडवं आलं...बरोबर त्याच वेळी अब्दुल हफिज करदार ह्या पाकिस्तानच्या माजी क्रिकेटपटूचा भारतद्वेष उफाळून आला. त्यानं भारतीय संघ तिथे पोहचण्यांआगोदरच भारतविरोधी आंदोलन सुरू केलं...सबब दौरा रद्द झाला! ...

## सिंगापूर-दौऱ्यावर

त्या काळात आणखीही काही घटना घडत होत्या.

इंडियन एअरलाइन्स फॉकर फ्रेंडशिप विमान लाहोरला पळवून जाळण्यात आलं...

तिथे पूर्व पाकिस्तानात, पश्चिम पाकिस्तानच्या जुलमाला कंटाळून मुजीब रहमानच्या नेतृत्वाखाली बांगलादेशचा लढा सुरू झाला.

आणि काही दिवसांतच भारत-पाकिस्तान युद्ध पेटलं...

पण ह्या काळात इंडियन एअरलाइन्सतर्फे विविध स्पर्धा जिंकण्यात आम्ही एव्हढे मश्गुल होतो की, ह्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय घडामोडींकडे आमचं फारसं लक्ष नव्हतं.

आम्हाला युद्ध प्रथम जाणवलं जवाहरलाल नेहरू हॉकीस्पर्धेत ग्रेटब्रिटनविरुद्ध खेळताना ! आम्ही दोन गोलने पुढे होतो आणि जवळजवळ त्यांच्या हद्दीतच ठाण मांडून बसलो होतो. इतक्यात सायरन वाजला..क्षणभर खेळ थांबला पण नंतर खेळ चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला...आणि तो सामना आम्ही पदरात पाडून घेतला.

पाकिस्तानचा माझा दौरा हुकला असला तरी काही महिन्यांतच मला भारतीय संघाबरोबर सिंगापूरला जायचा योग आला. मायकेल किंडोन तार पाठवून मला ट्रायलसला बोलावून घेतलं आणि नंतर माझी निवड केली...

सिंगापूरच्या दौऱ्यावर मी मात्र निव्वळ 'प्रवासी' च ठरलो 'फार लहान आहे', 'अनुभव नाही' वगैरे सबबींखाली मला संघात स्थान दिलं गेलं नाही...त्या वेळी आम्हाला खर्चासाठी दिवसाला तीन डॉलर्स मिळायचे. त्याची बचत करून सिंगापूरहून येताना माझ्या दोन बहिणी आणि अम्मासाठी मी तीन साड्या घेऊन आलो...

येताना मद्रास-विमानतळावर उतरल्यावर आपल्या भारतात प्रांतीयवाद कसा बोकाळलाय ह्याचा मला प्रत्यय आला. दया किसन ह्या इंडियन हॉकी फेडरेशनच्या जॉइंट सेक्रेटरीनं कृष्णमूर्ती आणि इतर मद्रासी खेळाडूंचं सामान कस्टम्सच्या जंजाळातून ताबडतोब सोडवलं...आमचा मात्र प्रत्येक जिन्नस अन् जिन्नस तपासला गेला !

विमानतळावरून आम्ही क्लॅरिजेम हॉटेलात गेलो...ती रात्र तिकडेच काढली. दुसऱ्या दिवशी निघताना बॅग भरायला घेतली आणि लक्षात आलं की, सिंगापूरला घेतलेल्या तीन साड्या 'गुल' झाल्यात. मी माझा रूममेट सेड्रिक परेशला त्याबद्दल बोललो...त्याने तडक आमचा मॅनेजर-उधमसिंगकडे तक्रार नोंदविली...उधमसिंगने सर्वांचं सामान तपासलं आणि बरोबर तशाच तीन साड्या हरमिक सिंगच्या बॅगेत सापडल्या. हरमिकने त्या स्वतः विकत घेतल्या असल्याचा दावा केला...पण उधमसिंगच्या सांगण्यावरून त्याने त्या मला दिल्या.

## आणि 'तो' दिवस आला !

सिंगापूरहून परतल्यावर मी बारदिलिओनाच्या वर्ल्ड कपसाठी जय्यत तयारी सुरू केली. घाम गाळण्यात अजिबात कसूर करत नव्हतो. संघाची निवड झाली आणि पुन्हा दुर्भाग्याची सणसणीत चपराक बसली ! माझं नाव यादीत नव्हतं. काही महिन्यांपूर्वी मी हवाहवासा होतो. आता अचानक माझ्यावर अवकृपा झाली. गोन सालविस, आर. एस् भोला, बलबीरसिंग (ज्येष्ठ) आणि पी. एन् सहानी निवडसमितीत होते. रूपसिंग निवडसमितीचे चेअरमन होते. चार सदस्यांपैकी दोघांनी माझी निवड केली; पण रूपसिंगने

फांदा मारला. त्यांनी कास्टिंग व्होट बलदेवसिंगच्या पारड्यात टाकलं. कदाचित रूपसिंगचं मन साफ नसावं. त्यांनी वारंवार मला सांगितलं, ' निराश होऊ नकोस, ऑलिंपिक्स जवळच आहे ! '

आमचे भोपाळचे विजय गुप्ता मॅनेजर म्हणून गेले. हा माणूस पेशाने वकील आहे; पण माझी केस लढवण्याचा विचारही त्यांना शिवला नाही. त्यातल्या त्यात समाधानाची एव्हढीच गोष्ट होती की, भोपाळच्या शहीदनूरची आउट साइड-लेफ्ट म्हणून निवड झाली.

मी निराश नक्कीच झालो; पण प्रयत्न सोडला नाही. माझी पक्की खात्री होती की, मेहनतीचं फळ मिळणार ! आज ना उद्या निवडसमितीच्या दरवाज्यावर धक्का मारून मी आत शिरणार ! आणि तो दिवस अचानक येऊन ठेपला ! माझी म्युनिक ऑलिंपिक्स-साठी निवड झाली. एव्हढी वर्षं उराशी बाळगलेलं स्वप्न साकार व्हायची वेळ येऊन ठेपली होती. लहानपणी सांधेदुखीनं जर्जर होऊन अंथरुणात पडल्या पडल्याही मी फक्त एकच स्वप्न पाहिलं होतं... वडलांप्रमाणे ऑलिंपियन व्हायचं !

१९३६ साली माझे वडील ध्यानचंदच्या संघातून खेळले होते. बरोब्बर ३६ वर्षांनी ध्यानचंद आणि अहमदशेरखानचे सुपुत्र एकत्र खेळण्याचा योग येऊन ठेपला होता.

योग जरूर येऊन ठेपला; पण जुळून आला नाही. प्रत्यक्ष ऑलिंपिक्समधे ध्यानचंदचा मुलगा खेळला. अहमद शेरखानच्या मुलाला हात चोळत पॅव्हेलियनमधे बसावं लागलं !

सुरुवातीच्या मित्रित्वाच्या सामन्यात मला खेळवण्यात आलं; पण प्रत्यक्ष लढाईच्या वेळी मला बाजूला सारण्यात आलं. माझ्याऐवजी मुखबैनसिंग खेळला. उपांत्यफेरीच्या सामन्यात पाकिस्तानविरुद्ध ह्या मुखबैनने एक–दोन नव्हेत, १७ पेनल्टी कॉर्नर्स वाया घालवले. तो एक जागतिक विक्रमच असावा. आम्ही तो सामना २–० हरलो.

मी अर्थातच निराश झालो होतो; पण निराश होऊन निराशाजनक खेळ पहाणं अधिक वाईट असतं... विशेषतः जी मंडळी निराशाजनक खेळ खेळतायत, त्यांच्यापेक्षा तुम्ही कच्चे आहात म्हणून तुम्हाला बाहेर बसवलंय, हा मुद्दा त्यातून सिद्ध व्हायची जेव्हा भीती निर्माण होते, तेव्हा जास्तच खचायला होतं...

आमचा पराभव दुर्दैवी होताच; पण त्याहीपेक्षा ऑलिंपिक व्हिलेजमधे आमच्या बाजूच्याच खोलीत जे काही घडलं ते जास्त भयानक होतं. ऑलिंपिक व्हिलेजमध्ये अल्फाबेटिकल ऑर्डरप्रमाणे संघाची राहण्याची सोय केली होती. एक दिवशी अचानक बाजूच्या खोलीतून मशिनगन्सचा धडधडाट ऐकू आला. थोड्या वेळाने अकरा इस्रायली खेळाडू रक्ताच्या थारोळ्यात चिरनिद्रा घेताना दिसले. ते दृश्य पहाताना दगडसुद्धा पाझरला असता ! प्रेतं हलवल्यानंतरही कित्येक तास व्हिलेजमध्ये स्मशानशांतता होती. संपूर्ण जग हादरवणारी अशीच ती घटना होती !

ह्या क्रौर्याला पॅलेस्टियन मंडळी जबाबदार होती. बेघर झालेल्या ह्या मंडळीचा अन्याय मी समजू शकतो; पण तो जगासमोर मांडण्याचा हा एकमेव मार्ग नव्हता. शांततेच्या मार्गाने ते अन्यायाला वाचा फोडू शकले असते किंवा खेळात प्राविण्य मिळवून, मिळवलेली पदकं नाकारून जगाचं लक्ष वेधू शकले असते. अमेरिकेच्या निग्रो अॅथलिट्सनी पूर्वी हाच मार्ग अवलंबला होता.

मी स्वतः मुस्लीम आहे; पण निरपराध इस्रायली खेळाडूंची हत्या मी पचवू शकत नाही. त्या दिवशी मी अक्षरशः धाय मोकलून रडलो. ती अशी जमात आहे. ज्यांना परमेश्वराने सौंदर्य, बुद्धी वगैरे गुण छप्पर फाडके दिले आहेत. परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा असणाऱ्यांनीच त्या परमेश्वराच्या लाडक्या लेकरांचीच हत्या केली होती.



निराशाजनक खेळ पाहणं अधिक वाईट असतं– रशिदबरोबर अस्लम

¤

आणि मुख्य म्हणजे तीसुद्धा कुणाची तरी मुलं असतील. त्यांच्या आई-वडिलांनीही त्यांच्यासाठी खस्ता काढल्या असतील. मोठ्या अपेक्षेने त्यांच्या पराक्रमाकडे त्यांचे डोळे लागले असतील. निरपराध खेळाडूंची अशी निर्घृण हत्या मला अजिबात मान्य नाही.

१९७३ साली अॅमस्टरडॅम विश्वचषकासाठी माझी निवड झाली नाही. वर्तमानपत्रांनी त्यासाठी निवडसमितीवर सणसणीत कोरडे ओढले. ज्युनिअर स्टेटस्मन के. एन. मोहलाजीने लिहिलं ' Aslam Sher Khan went to Munich only to twiddle his thumbs on the side lines. ( If they cannot trust him, why was he taken at all ? ) Moreover, Aslan ( whose father onee represented India in Olympics) could have been fried as left half as his natural best is aggression "

त्या वर्षी मी अॅमस्टरडॅमला न जाता वॉशिंग्टनला गेलो. इंडियन एअरलाइन्सचा संघ तिथे जॉन केनडी मेमोरियल हॉकीस्पर्धेत भाग घेत होता. गंगासिंग धिलों हा तरुण भारतीय त्या स्पर्धेच्या आयोजनसमितीत होता पुढे खलिस्तान चळवळीचा मोठा नेता म्हणून तो उदयास आला. त्या वर्षी ती स्पर्धा आम्ही जिंकली आणि नंतर १९७६ ते ७९ पर्यंत आम्ही त्या स्पर्धेवर हक्क प्रस्थापित केला होता.

वॉशिंग्टनमधेच ' स्त्रीमुक्ती ' ( women's lib ) चळवळीचा पहिला धडा मी शिकलो. एक घटस्फोटिता माझ्या मागे लागली. तिथेच राहून तिचा प्रचंड धंदा मी सांभाळावा असा तिने हट्ट धरला.

खरं सांगतो क्षणभर मी बावचळलो. अमेरिकेतलं सुखासीन जीवन मला खुणावायला लागलं. मानहानी सहन करत पुन्हा पुन्हा हॉकीसंघात जागा मिळवण्यासाठी धडपडण्याचा वीट आला होता !

पण मनाची ही दोलायमान स्थिती क्षणभर टिकली. पुढच्या क्षणी हॉकीवरच्या प्रेमाची सरशी झाली !

(क्रमशः)

डॉ. सुभाषचंद्र सारंग

# मोहिमा—खोल सागराच्या तळाशी....

भारताच्या अंटार्क्टिका मोहिमेमुळे सर्व भारतीय लोकांच्या मनात अशा प्रकारच्या मोहिमांबद्दल औत्सुक्य निर्माण झाले आहे. इ. स. १८७२–७६ च्या चॅलेंजर सागरी मोहिमेपासून सागरविज्ञान (ओशनोग्राफी) या स्वतंत्र शास्त्राचा आरंभ झाला असे मानले जाते. तथापि त्यापूर्वी खूपच अगोदर म्हणजे इ. स. १८२९ मध्ये कोको या इटालियन शास्त्रज्ञाने मसीनाच्या सामुद्रधुनीमधील खोल सागरी जीवांचा अभ्यास करून सागरविज्ञानाचा पाया घातला. तसेच १८३९ ते १८४३ या काळात 'इरेबस' आणि 'टेरर' या ब्रिटिश जहाजांनी अंटार्क्टिका–मोहीम पूर्ण केली. सर जेम्स रॉय हे या मोहिमेचे प्रमुख होते. त्या मोहिमेमध्ये रॉस यांना सागरातील ७३० मीटर्स खोलीवरील सजीवांचे नमुने सापडले होते.

एडवर्ड फोर्ब या शास्त्रज्ञाने इ. स. १८४३ मध्ये 'बेकन' या जहाजाच्या सहाय्याने केलेल्या सागर–संशोधनाच्या आधारे खोलीनुसार सागराचे आठ निरनिराळे विभाग निश्चित करण्यात आले. समुद्रामध्ये ५५० मीटर्स खोलीवर सजीवांचे अस्तित्व संपुष्टात येते व त्याखाली जीवरहित पट्टा असतो, हा फोर्बचा विचार पुढे कित्येक वर्षे प्रमाण मानण्यात आला; परंतु डॉ. वॅलिचना 'बुलडॉग' जहाजाच्या सहाय्याने केलेल्या संशोधनात २३०० मीटर्स खोलीवर स्टारफिश आढळून आले आणि जीवरहित सागरी पट्ट्याची कल्पना मागे पडली. ब्रिटिश आरमारी जहाजांच्या सहाय्याने रॉयल सोसायटीने केलेल्या संशोधनानुसार समुद्रातील १८३० मीटर्स खोलीवरील सजीवांचे अस्तित्व स्पष्ट झाले. या संशोधनामुळे खोल समुद्रातील जीवसृष्टीविषयी लोकांची उत्सुकता शिगेला पोहोचली व सर्वत्र खोल सागरी जीवांचा अभ्यास करण्याची मागणी होऊ लागली. सागर-जलाची भौतिक व रासायनिक घटना, सागरतळांची रचना व सागरी जीवांचा अभ्यास समाविष्ट असलेल्या सागर-विज्ञानचे महत्त्व वाढत गेले. चॅलेंजर या ब्रिटिश जहाजाने इ. स. १८७२–७६ च्या मोहिमेत १ लक्ष २८ हजार मैलांचा सागर-प्रवास करून मोठ्या प्रमाणावर सागरी संशोधन केल्यामुळे प्रत्येक युरोपीय देशाला सागरी संशोधन मोहीम हाती घेणे आवश्यक वाटू लागले. त्यामुळे युरोपमध्ये सागरी संशोधन मोहिमांची लाटच निर्माण झाली. जगभर अनेक मोहिमा हाती घेण्यात आल्या. 'अल्बेट्रास' या अमेरिकन जहाजाने तर एकाच फटक्यात ३२२० मीटर खोलीवरील सागरी जीवांचे धवाडच गोळा केले. त्यांचे प्रमाण संपूर्ण 'चॅलेंजर' मोहिमेमध्ये गोळा करण्यात आलेल्या सजीवांच्या कितीतरी पटींनी जास्त होते. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीनेसुद्धा सागरी मोहिमांमध्ये लक्ष घातले; परंतु त्यांचे उद्दिष्ट सागरतळावरील सोने गोळा करण्याचे होते. अशा पद्धतीने सोने मिळविण्यासाठी येणारा खर्च सोन्याच्या बाजारभावापेक्षा जास्त असल्याने तो विचार सोडून देण्यात आला.

इ. स. १८७२ पासून आजपर्यंतच्या वेगवेगळ्या सागरी संशोधनमोहिमांचे चार निश्चित असे टप्पे दिसून येतात. इ. स. १८७२ पासून पहिल्या महायुद्धापर्यंतच्या काळात संशोधनासाठी निघालेली जहाजे जवळजवळ पृथ्वीप्रदक्षिणाच करीत असत. तसेच ती सर्वत्र भटकत असत. इ. स. १८३१ ते ३६ या काळात मोहिमेवर निघालेल्या 'बीगल' या ब्रिटिश जहाजाने द. गोलार्धातून पृथ्वीप्रदक्षिणाच पूर्ण केली होती. कॅप्टन फिट्झरॉयच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पूर्ण झाली असली तरीही त्याच जहाजावरील डार्विन पुढे उत्क्रान्तितत्त्वाचा संशोधक म्हणून प्रसिद्धी पावला. डार्विनचे पहिले लेखन सागरातील प्रवाळबेटांच्या निर्मितीविषयी होते. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळातील सागरी संशोधनमोहिमा समुद्राच्या विशिष्ट भागामध्येच माहिती गोळा करीत असत. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात सागरी संशोधनातील नवनवीन तंत्रांचा शोध लागला व संशोधन अधिक अचूक दिशेने होऊ लागले. इ. स. १९५५ नंतरचे युग म्हणजे सागरी संशोधनामधील आंतरराष्ट्रीय सहकार्याचे पर्व मानले जाते. या काळात काही देशांनी स्वतंत्रपणे सागरी संशोधन मोहिमा आखल्या असल्या तरीही प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय सहकार्याने अनेक मोहिमा यशस्वी करण्यात आल्या.

### काही महत्त्वाच्या सागरी संशोधनमोहिमा

| जहाजाचे नाव | देश | वर्ष | शास्त्रज्ञ | सागर |
|---|---|---|---|---|
| चॅलेंजर | ब्रिटन | १८७२-७६ | वीव्हिल-थॉम्सन | जगप्रवास |
| इन्व्हेस्टिरोटर | ब्रिटन | | | हिंदी महासागर |
| वॅल्डीव्हिया | जर्मनी | १८९८-९९ | कार्लचून | अॅटलांटिक व हिंदी महासागर |
| सिबोगा | हॉलंड | १८९९ | मॅक्सवेबर | इंडोनेशियन समुद्र |
| डॅना | डेन्मार्क | १९२०-२२ १९२८-३० | श्मिट | तीन महासागर |
| विलेब्रार्ड स्नेलियस | हॉलंड | १९२९-३० | | इंडोनेशियन समुद्र |
| महाबिस | ब्रिटन | १९३३-३४ | सेवेल | हिंदी महासागर व तांबडा समुद्र |
| गॅलाथी | डेन्मार्क | १९५०-५२ | ब्रुन | जगप्रवास |
| I. I. O. E. | आंतरराष्ट्रीय | १९६१-६५ | | हिंदी महासागर |

## खोल सागरातील जीवसृष्टी

मानवाला चंद्र, शुक्र, शनी यांसारखे अनेक ग्रह आणि कित्येक प्रकाशवर्षे दूर असलेल्या ताऱ्यांविषयी, अवकाशाविषयी जेवढी माहिती आहे त्याच्या तुलनेने प्रत्यक्ष पृथ्वीवरील महासागरांच्या तळाविषयी फारच थोडी माहिती आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. वस्तुत: सागरांनी पृथ्वीचा २/३ भाग, (५१ कोटी चौ. कि. मी. क्षेत्रफळापैकी २७ ८ कोटी चौ. कि. मी.) वेढलेला आहे. मानवाला अन्नासाठी सागरी भांडाराचा उपयोग करण्याची आवश्यकता भासू लागली आहे. आपल्याला ज्ञात असलेले मासे, इतर सागरी वनस्पती इत्यादी उथळ सागरी भागात तसेच प्रामुख्याने सागरांच्या प्रकाशित भागात असतात. महासागरांच्या तळाशी कशा प्रकारची जीवसृष्टी आहे ? तेथे भूरचना, दाब, प्रकाश, तपमान यांची स्थिती कशी आहे ? याविषयीचे कुतूहल अनेकांच्या मनात असते. महासागरांच्या तळाशी असलेल्या पर्वतरांगा, खोल गर्ता आणि मैदाने इतकी प्रचंड आहेत की, त्यापुढे भूखंडावरील उत्तुंग पर्वत व मोठ्या नद्या म्हणजे नुसते ओरखडेच वाटावेत; परंतु सागरतळावरील ही प्रचंड भू-अरण्ये आपण प्रत्यक्ष पाहू शकत नाही अथवा त्यांची सलग स्पष्ट अशी छायाचित्रे घेऊ शकत नाही. खोल सागरांच्या तळाशी सर्वत्र परिस्थिती थोडीफार सारखीच आहे. सर्वत्र काळाकुट्ट अंधार, तीव्र कडाक्याची थंडी, प्रचंड दाब आणि अन्नाची टंचाई ! अशी प्रतिकूल परिस्थिती असूनसुद्धा महासागरांच्या तळाशी जीवसृष्टी आहे !


समुद्रकिनाऱ्यापासून खोल सागरतळापर्यंत सागराची रचना कशी असते हे पाहणे मनोरंजक ठरेल. समुद्रकिनाऱ्यालगत जमिनीचा जो भाग समुद्रामध्ये गेलेला असतो त्याला समुद्रबूड जमीन असे म्हणतात. त्याची रुंदी खंडाच्या किनाऱ्याच्या स्वरूपानुसार कमी–जास्त असते. किनाऱ्यालगत खंडाचा भाग सपाट असेल तर समुद्रबूड-जमीन जास्त रुंदीची असते. किनारा पर्वतीय असेल तर समुद्रबूड जमीन फारच अरुंद असते अथवा नसतेही. उत्तरसमुद्रालगत समुद्रबूड जमीन १२०० कि. मी. रुंदीची आहे. या भागाचा उतार सौम्य असतो व खोली सागरात जास्त १५० ते २०० मीटर्स असू शकते. त्यापुढे समुद्रबूड जमिनीचा उतार एकदम तीव्र होतो. त्या भागाला खंडान्त उतार म्हणतात. या पट्ट्याची रुंदी १५० कि. मी. पर्यंत असते, तर खोली १५०० ते ४००१ मीटर्स. खंडान्त उतारानंतर सागरतळाचा विस्तृत सपाट भाग असतो. हेच ते सागरी मैदान ! त्याची खोली समुद्रसपाटीपासून ४००० ते ५००० मीटर्स असते. बहुतेक सर्व महासागरांच्या मध्यभागी सागरतळावर पर्वतांच्या रांगा आहेत. त्यांना 'रीज' असे म्हणतात. ॲटलांटिक महासागरातील मीडॲटलांटिक रीज व अरबी समुद्रातील कार्ल्सबर्ग रीज सर्वांच्या माहितीच्या आहेत. सागरी मैदानावरसुद्धा अरुंद व खोल घळया असतात, त्यांना सागरी डोह असे म्हणतात. पॅसिफिक महासागराच्या पश्चिम भागात अनेक सागरी डोह आहेत.. त्यांची खोली समुद्रसपाटीपासून १० हजार मीटर्स आहे. फिलिपाइन्सजवळच्या मरियाना डोहाची खोली ११०० मीटर्सपेक्षा जास्त आहे. तो पृथ्वीवरील सर्वांत खोल डोह आहे. संपूर्ण एव्हरेस्ट शिखर मुळापासून उचलून या डोहात बुडवले तर ते कुठल्या कुठे गडप होईल !

सागरपृष्ठावर पाण्याचे तपमान सामान्यपणे २७.५° सें. ग्रे. (उष्ण कटिबंधात) असते व ते खोलीनुसार हळूहळू कमी होत जाते. सागरपृष्ठभागापासून २० ते २०० मीटर्स खोलीच्या पट्ट्यामध्ये तपमान अत्यंत वेगाने कमी होते व त्या पट्ट्याखाली पुन्हा तपमानातील घट कमी वेगाने होत जाते. सागराच्या तळाशी तपमान ३° सें. ग्रे. ते उणे १.६५° सें. ग्रे. असते. सागर पृष्ठभागावर उणे १.८७° सें. ग्रे. तपमानाला पाणी गोठते. मात्र सागरतळावर पाणी कधीही गोठत नाही !

सागरपृष्ठापासून खोल जावे तसा दाब वाढत जातो. समुद्रसपाटीला दाब १ वातावरण इतका म्हणजे द. चौ. सें. मी. वर १०३३ ग्रॅम असतो. सागरामध्ये तो दर १० मीटर्स खोलीवर १ वातावरण या प्रमाणात वाढत जातो. म्हणजेच सागरी डोहांच्या तळाशी १००० वातावरण इतका प्रचंड दाब असतो. ज्या विशिष्ट यंत्रणेमुळे मनुष्य १ वातावरणाचा दाब सहन करू शकतो त्याच यंत्रणेमुळे म्हणजे देहातील व बाहेरील दाबातील समतोल साधल्याने सागरतळावर मासे जगू शकतात.

## स्टोमॅटाडइस्, हॅचेट, गल्परईल


सागरपृष्ठावर जो प्रकाश पडतो त्यातला काही परावर्तित होतो. काही प्रकाशकिरणे इतस्तत: विखुरतात तर काही सागरजलामध्ये शोषली जातात. प्रकाशकिरणांतील वेगवेगळ्या रंगांचे शोषण कमीजास्त प्रमाणात होते. तांबडे किरण ५० मी.



हॅचेट फिश



ॲंग्लर फिश



ट्रायपॉड फिश



गल्पर ईल

पिवळे १०० मी. आणि निळे किरण २०० मी. पर्यंत पोहोचतात. अतिनील किरणे २०० मी. पलीकडेसुद्धा जाऊ शकतात. सागरांच्या काही विभागात ५०० मीटर्स खोलीवर प्रकाशसंवेदना मानवी डोळ्यांनासुद्धा होऊ शकते, तर संवेदनाक्षम कॅमेऱ्यांनी १००० मी. खोलीपर्यंत प्रकाशकिरणांचे अस्तित्व दाखविले आहे. प्रकाशकिरणांच्या अस्तित्वावरून सागराचे ८० मीटर्स खोलीपर्यंतचा प्रकाशित भाग, ८० ते २०० मी. पर्यंतचा निमप्रकाशित व त्याखाली अप्रकाशित भाग असे तीन भाग केले जातात. प्रकाशित भागात वनस्पतीमध्ये प्रकाश, संश्लेषणक्रिया होते, निमप्रकाशित भागात ही क्रिया परिणामकारक नसते, तर त्याखालच्या पट्ट्यात पूर्ण काळोखच असतो.

काळाकुट्ट अंधार व प्रचंड दाब असलेल्या सागरी तळावर विविध प्रकारचे मासे असतात. नवचित्रकाराच्या स्वैर कल्पनेलासुद्धा सुचणार नाहीत इतके विविध आकार आणि रंग यांचे मिश्रण त्या माशांच्या रचनेत दिसून येते. सागरामध्ये जास्तीत जास्त ७००० मीटर्स खोलीवरील मासे पकडण्यात यश मिळाले आहे तर १०३००० मीटर्स खोलीवर माशांचे अस्तित्व आढळून आले आहे.

निमप्रकाशित अथवा संधिप्रकाशाच्या भागात लॅटर्न फिशच्या सुमारे २०० जाती आढळतात. माशांची लांबी सुमारे १५ सें. मी. असते. या माशांच्या पोटावर सलग अशी प्रकाशबिंदूंची रेघ असते. प्रकाशबिंदूमधून विविध रंगी प्रकाश बाहेर पडतो. नर व मादीमध्ये प्रकाशबिंदूंची संख्या व त्यातून बाहेर पडणाऱ्या प्रकाशाचा रंग यात फरक असतो. ५०० मीटर्स खोलीवर राहणारे लॅटर्न फिशचे थवे मध्यरात्री समुद्रपृष्ठावर येतात. त्यामुळे समुद्रामध्ये हिरवा प्रकाशपट्टा दिसतो. स्टोमॅटाइड जातीच्या माशामध्ये व हॅचेट फिशमध्येसुद्धा प्रकाशबिंदू असतात. खोल समुद्रातील माशांचा रंग गडद नारिंगी अथवा लाल असतो. लाल रंगाच्या प्रकाशलहरी या माशांपर्यंत पोहोचत नाहीत व हे मासे त्यांचे परावर्तन करू शकत नाहीत. त्यामुळे खोल समुद्रात हे मासे काळेच दिसतात. लाल रंगाच्या प्रकाशलहरी खोल समुद्रात पोहोचल्या असल्या तरीही तिथल्या माशांना त्या लाल रंगाच्या दिसल्या नसत्या. कारण या माशांच्या दृष्टिपटलावर शंकू नसतात. त्यामुळे त्यांना रंगाचे ज्ञान होत नाही. उलटपक्षी या माशांचे डोळे अंधुक प्रकाशालाच जास्त संवेदनाक्षम असतात.

खोल समुद्रातील स्टोमॅटाइडस् जातीच्या माशांना तोंडाखाली लांबलचक दाढी असते. दाढीला असंख्य फाटे फुटलेले असतात. सुमारे ३.५ सें. मी. लांबीच्या माशाला त्याच्या दसपट लांब दाढीमिशा असतात. म्हणजे 'मिया मूठभर और दाढी हातभर' म्हणायचे. हॅचेट फिश या माशाचा आकार कुऱ्हाडीच्या पात्यासारखा असतो. हा मासा निळा व लाल प्रकाश बाहेर सोडतो. या माशाचे डोळे द्विकेंद्री असतात. म्हणजेच दूरचे व जवळचे स्पष्ट दिसण्यासाठी या माशाला विशिष्ट प्रकारचे दृष्टिपटल असते. त्यातल्या काही प्रकारच्या माशांना दुर्बिणीसारखे वरच्या दिशेने रोखलेले डोळे असतात व ते खोल खोबणीत असतात. त्यामुळे त्यांना वरच्या बाजूस असलेले भक्ष्य दिसू शकते. व्हायपर फिश या जातीच्या माशाचे अनेक तीक्ष्ण व लांबलचक दात त्याच्या जबड्याबाहेर वेडेवाकडे आलेले असतात. हा मासा आपले तोंड मिटू शकत नाही. गल्पर इल (पेलिकन इल) या माशाची रचना मोठी मजेशीर असते. सुमारे एक मीटर लांबीच्या या माशाला भलेमोठे तोंड व जबडा आणि जबड्याला लागूनच लांबलचक शेपटी असते. शेपटीच्या टोकाशी प्रकाशबिंदू असतो. धड कसले ते नाहीच. मोठ्या जबड्यामुळे हा मासा प्रसंगी आपल्यापेक्षा मोठे भक्ष्यसुद्धा गिळू शकतो. खोल समुद्रातील माशांना अन्नाची टंचाई असल्याने जे समोर दिसेल ते भक्ष्य गिळण्यावाचून पर्याय नसतो. त्यामुळेच ही सोय निसर्गाने केली आहे. चायस्मॉडान नायजेर या जातीच्या माशांना सुरकुतलेले पोट असते व ते ताणल्यावर माशाच्या देहापेक्षा मोठे होऊ शकते. आपल्यापेक्षा मोठ्या आकाराचे भक्ष्य गिळल्यावर ते सामावण्यासाठी ही सोय.

## 'अँग्लर फिश'चा चाणाक्षपणा

सागरतळावर रॅटटेल फिशच्या विविध जाती असतात. हे नाव त्यांच्या लांबलचक निमुळत्या शेपटामुळे पडले आहे. या माशांचे डोके मोठे असून डोळे बटबटीत व संवेदनाक्षम असतात. हे मासे २५ ते ७५ सें. मी. लांबीचे असतात. ब्रोटयूलिडी जातीच्या माशांना डोळ्यांच्या जागी फक्त खाचा असतात. म्हणजे हे मासे चक्क आंधळे असतात. ब्लाइंड ट्रायपॉड फिशच्या पोटाखालील पंखांची दोन टोके व शेपटीच्या पंखाचे खालचे टोक अशी तीन टोके लांबलचक वाढलेली असून ती चिवट असतात. या तीन पायांवर ट्रायपॉड फिश सागरतळावर स्थितप्रज्ञासारखा उभा राहू शकतो.

अँग्लर फिश या १० सें. मी. ते १ मीटर लांबीच्या माशाच्या डोक्यावर एक लहानसे शिंग असते व त्याच्या टोकाशी फुगवटा असून त्यातून नारिंगी प्रकाश बाहेर पडतो. एका परीने मासे पकडायच्या गळासारखीच त्याची रचना असते. या गळाकडे दुसरा मासा धावून आला की, अँग्लर फिश त्याला आपल्या जबड्यात खेचून घेतो.

अतिशय गडद काळोखात सागरतळाशी असलेल्या माशांना आपला जोडीदार नेमका शोधून काढणे ही मोठीच अवघड गोष्ट असते. हा प्रश्न सोडविण्याच्या अनेक सोयी निसर्गाने केल्या आहेत. लॅटर्न फिशच्या जातीचे अनेक मासे प्रकाशबिंदूच्या सहाय्याने व त्यांच्या रंगांवरून आपला जोडीदार ओळखतात. नर अँग्लर फिशचे नाक मोठे व विशेष संवेदनाक्षम असते. त्याला मादीची चाहूल वासावरून लागू शकते. मादी आढळताच नर जबड्याच्या सहाय्याने मादीचा चावा घेतो व घट्ट पकडून ठेवतो. हळूहळू नराचे दात व जबड्याची मादीच्या देहामध्येच वाढ होते व नर कायमचाच मादीच्या देहाला जखडला जातो. मादीच्या देहातूनच त्याला रक्तपुरवठा होतो. नराच्या पुनरुत्पादक अवयवाखेरीज इतर अवयव नाममात्र शिल्लक राहतात. अशा नराचा उपयोग मादी केवळ पुनरुत्पादनासाठीच करून घेते. एका अँग्लर मादीच्या पाठ, पोट अथवा शेपटीपाशी तीन ते चार नर अँग्लर फिशची बांडगुळे कायमची जखडलेली असतात. जोडीदार हुडकण्याचा प्रश्न अँग्लर फिशइतक्या चाणाक्षपणे क्वचितच कुणी सोडविला असेल !

खोल सागरामध्ये परिस्थिती प्रतिकूल असूनसुद्धा अनेक प्रकारचे मासे तेथे अस्तित्वात राहू शकतात याचे मुख्य कारण म्हणजे त्यांची आश्चर्यकारक आनुकूलनक्षमता. सागरतळावरील परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी माशांचे आकार, रंग, शरीररचना व सवयी यामध्ये अनेक प्रकारचे बदल घडून आले आहेत. यापेक्षाही लॅटर्नफिशच्या उदा. वरून सागरतळावरील माशांच्यामध्ये किती उच्च प्रतीची आनुकूलनक्षमता असते ते लक्षात येईल. सुमारे ५०० मीटर्स खोलीवर या माशांचे वास्तव्य असते, त्या ठिकाणी दाब ५० वातावरणाइतका असतो; परंतु रात्रीच्या वेळी हे मासे सागरपृष्ठावर येतात त्या ठिकाणी दाब फक्त १ वातावरण असतो म्हणजेच ५० ते १ वातावरणइतका दाबातील फरक प्रत्येक वेळी सहन करण्याइतके आनुकूलन हे मासे करू शकतात. □